
४२

शब्द रुची

सप्टेंबर २०१७
मूल्य १० रुपये
पृष्ठे ४०

# विंदा

तो जॉगिंग नाही करत
वानप्रस्थाचे बूट भिरकावतो
तळागाळातच रुततो अजून त्याचा पाय
त्याच्या वहाणा करकरतात
तेव्हा पांढरेशुभ्र रस्ते
मान खाली घालतात
तो
अभावांची बंदीष बांधतो
दारिद्र्याच्या मात्रा मोजत
अलगद येऊन ठेपतो
मानवतेच्या समेवर



ब्रह्म दचकून असते त्याला
त्याच्या कापडी बंदाच्या पिशवीत
सहज विसावतो लालभडक सूर्य
त्याच्या आतड्याला
खाचा असतात माधुकरीच्या
तो टक्कर घेतो शिळा होऊन
फेसाळ बेछूट भरतीशी
तो सछिद्र
जांभ्या दगडासारखा
केशरीधम्म देवगड हापूससारखा
झुकतो पुन्हा भुईकडेच
तो उधळून लावतो गडगा
धडकतो बेड्याला
त्याच्या केसाळ छातीवर
फुलपाखरे घिरट्या घालतात अधूनमधून
चिवचिवतात चिमण्याही
तो चिरेबंदी घट्ट
तो वाचत राहतो अंधांना, तो लेखणीबंद तरीही
कवितेच्या ओळीच पाझरतात आतल्याआत
डाव्या डोळ्यातील गरम आसवात
कालपरवा ऐकले
त्याच्या पायरीशी ज्ञानपीठ रटरटते म्हणे!




## खर्चिक हृदयरोग शस्त्रक्रिया करण्याची वेळ येईपर्यंत का थांबा? वेळीच अचूक निदान आणि उपचार करुन घ्या!

हृदयरोग, अँजिओप्लास्टी, बायपास वगैरे शब्द ऐकले तरी मनात धडकी भरते. पण ती वेळ येईपर्यंत थांबायचंच कशाला? माधवबाग क्लिनिकमध्ये आजच कार्डिओ असिस्ट हार्ट चेकअप करुन घ्या. या तपासणीचा तुमचा रिपोर्ट हृदयरोगतज्ज्ञांनी दिलेला असतो. आजच माधवबाग क्लिनिकला भेट देऊन स्ट्रेस टेस्ट करुन घ्या. म्हणजेच अत्याधुनिक तपासणी आणि अचुक निदान!

### कार्डीॲक रिस्क असेसमेंट

तपासणी अंतर्गत:
इ सी जी, ब्लडप्रेशर,
आर बी एस (रँडम ब्लड शुगर)
एस पी ओ 2, बी एम आय

~~₹450~~ फक्त ₹150*

### कार्डीओ असिस्ट असेसमेंट

तपासणी अंतर्गत:
कॉम्प्युटराईज्ड स्ट्रेस टेस्ट, इ सी जी, ब्लडप्रेशर, आर बी एस (रँडम ब्लड शुगर), एस पी ओ 2, बी एम आय

~~₹2400~~ फक्त ₹750*

सोबत एक्सपर्ट डॉक्टर्सचे कन्सल्टेशन आणि डाएट चार्ट

• मुंबई • पुणे • पश्चिम महाराष्ट्र • गोवा • विदर्भ • मराठवाडा • बेळगाव येथील सर्व माधवबाग क्लिनिक्समध्ये ही टेस्ट उपलब्ध

*For detailed information visit goo.gl/UZ1GwN

अपॉइंटमेंटसाठी आजच मिस कॉल द्या:

**022-33494950**

किंवा लॉग-इन करा www.madhavbaug.org

माधवबाग™

व्हॉटएव्हर इट टेक्स

'हृदयस्पर्शी माधवबाग' हे पुस्तक माधवबागच्या सर्व क्लिनिक्समध्ये उपलब्ध त्यासाठी आजच पैसे भरुन नोंदणी करा. मिस्डकॉल नं. **022-67715442**

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

सप्टेंबर २०१७, वर्ष पाचवे
अंक पाचवा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४२ ग्रंथाली

## अनुक्रम

**स्मरणवेळा**
- रामनाथ चव्हाण : भटक्या विमुक्तांच्या सामाजिक स्थितिगतीचे संशोधन करणारा परिवर्तनवादी लेखक / ६
  **अरुण खोरे**

**गौरव**
- साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त 'खारीच्या वाटा' / १०
  **दीपा ठाणेकर**
- माणुसकीला जागृत करणारी कविता / १४
  **मालती हेगडे**

**उद्‌गार**
- जगायचं कशासाठी? / १६
  **डॉ. रावसाहेब कसबे**

**मी आणि माझी कविता** / १८
**विनायक येवले**

**परामर्श**
- संजय पवार यांच्या एकांकिका : दृष्टिक्षेप / २०
  **डॉ. माणिक माधव बगले**
- र.धों.च्या शारदेची लैंगिकता अजूनही बुरख्यातच! / २४
  **साधना गोरे**

- मोदी आणि क्सी जिनपिंग / २८
  **डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
- ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ३३
- ग्रंथपाने – **मेहता पब्लिशिंग हाऊस** / ३४
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ३५ ते ३८

## संपादकीय...

२३ ऑगस्ट २०१७ पासून विंदांची जन्मशताब्दी सुरू झाली. साधारणपणे १९३७ पासून विंदांच्या काव्यप्रवासाला सुरुवात झाली आणि त्यांची कविता वेगवेगळ्या टप्प्यांवर बदलत गेली. ''काव्य जीवनाशी समकक्ष असले पाहिजे आणि मानवी जीवनातील विविधतेचा व व्यामिश्रतेचा वेध कवीने घेतला पाहिजे, असे ते मानत.'' 'ती जनता अमर आहे' या शब्दांत विंदांनी सामान्य माणसांवरचा विश्वास व्यक्त केला. 'तुझी माझी धाव आहे दातापासून दाताकडे' या शब्दांत विविध पातळ्यांवरील शोषणाचे चित्रण त्यांनी केले. 'प्रेम करावे शुद्ध पशुसम' असा निर्भय प्रेमाचा आविष्कार केला.

'पृथ्वीमध्ये पाय रोवून तू अशीच उभी राहा.
मृगाच्या वादळामध्ये उमळून पडणाऱ्या
उद्याच्या कोंबांना तुझ्या श्वासांचा आधार दे'

या शब्दांसह स्त्रीच्या सामर्थ्यावर अदम्य विश्वास ठेवला.

तुझ्यात गेलो, विरलो आणि मेलो
मजला पाजून तुजला गिळलो, प्यालो
मीपण गेले, तूपण आले आले
जीवनसंगीत झाले, जीवन प्याले...

'रक्तसमाधी' या कवितेतून व्यक्त झालेला हा समागमाचा अनुभव. शृंगाराविषयीच्या रम्य कल्पना रंगवणाऱ्या मराठी कवितेच्या दृष्टीने 'रक्तसमाधी'मधला देहनिष्ठ अनुभव वेगळा होता.

संस्कृतीला झाला। नफ्याचा उदर
प्रकाशाचे पोर। कुजे गर्भी

अशा आततायी अभंगातून समाजासमोर आरसा धरला.

बरगड्यांच्या तुरुंगातून मी हृदयाला मुक्त केले
जिथे जिथे धमनी आहे तिथे माझे रक्त गेले...

असे म्हणत विंदांनी जगण्यामध्ये 'ब्रह्मानंद' शोधला. मुक्त सुनिते, अभंग, गझल, विरूपिका, तालचित्र अशा विविध वळणांनी त्यांच्या कवितेची वाट घडली. एकाच एका विचाराच्या जोखडात त्यांची कविता कधी अडकली नाही.

तेरावीत असताना 'स्पर्शाची पालवी' हा विंदांचा ललितलेख संग्रह हाती आला. एम.ए.च्या अभ्यासात विंदांची समग्र कविताच! खांद्याला झोळी अडकवून तेव्हा एकदा वर्गात आलेले विंदा आणि त्यांच्या खास 'कोकणी' ठसठशीत आवाजातल्या कविता, आठवणीत कायमच्याच राहिलेल्या! शिवाय विजया राजाध्यक्षबाईकडून समजून घेतलेल्या त्या कवितांचा आशय... तोही अविस्मरणीय! पुढे मग लेकीसोबत त्यांच्या बालकवितांमध्येही चांगलीच रमले.

परीचा पडला दगडावर पाय
दगड म्हणाला 'आय आय'

परीच्या अधांतरी चालण्याची गोष्ट, तिच्या उन्हाच्या फणीची गंमत, तिच्या केसांमध्ये अडकणारा चांदोबाचा पाय या लोभसवाण्या जगाने मला तिशीतही घट्ट धरून ठेवलं. इंग्रजी माध्यमात शिकवण्याच्या पालकांच्या खुळाला बळी पडलेली मुलं या बालकवितांच्या 'अजबखान्या'पासून दूर राहतायत म्हणून कितीतरी वेळा हिरमुसले. एकूणात काय विंदांच्या कवितेतून मी आजवर बाहेर पडू शकले नाही.

साधारण २००४-२००५ सालातली गोष्ट. तेव्हा मी लोकसत्तेत 'कवितेतलं घर' नावाचं सदर लिहायचे. त्यातून एकदा माझा 'एकटीच्या बळावर उभं विंदांच्या कवितेतलं घर' हा लेख प्रकाशित झाला. त्यादिवशी नेहमीसारखी सकाळी लवकर कॉलेजकरता बाहेर पडले होते. घरी परतेपर्यंत विंदांचे फोन लॅन्डलाईनवर येत राहिले. तेव्हा मोबाईल वगैरे नव्हता माझ्याकडे. घरी परतल्या-परतल्या वाजलेला फोन घेतला तेव्हा पलीकडून विंदा बोलतायत यावर विश्वास बसेना. खरं तर केवढासा लेख पण त्याविषयीचं कौतुक, माझा फोन लोकसत्ताकडून मागून घेऊन त्यांनी केलं. 'एकदा घरी ये मग बोलू भरपूर' म्हणत सहज निमंत्रणही देऊन टाकलं पण समोरासमोर बसून मोकळेपणाने बोलायचा 'विंदायोग' मात्र मी चुकवलाच!

शिक्षणाच्या क्षेत्रातले विंदा हा माझा विशेष जिव्हाळ्याचा पैलू! या क्षेत्रातील भंपकपणाची, तकलादू पुरस्कारप्राप्त 'आदर्श' शिक्षकांची चीड येते. अलीकडे वयाची साठ वर्षं झाली तरी युक्त्या-प्रयुक्त्या करत, ओळखीपाळखी काढत, वशिले वापरत ६२ वर्षांपर्यंत कार्यकाल वाढवून घेण्याची चढाओढ

प्राध्यापकीच्या क्षेत्रात सुरू झालेली दिसते. त्यासाठी कुणी एकमेकांना आव्हान देतात. कुणी वरिष्ठांची जिरवतात किंवा वर्षानुवर्ष अर्धवेळ नोकरी करत, आशा लावून बसलेल्या सहकाऱ्याला हुलकावणी देतात. या सर्व पार्श्वभूमीवर मला विंदांचे खूप कौतुक वाटते. आपल्या तरुण सहकाऱ्यांकरता वेळेआधीच निवृत्ती स्वीकारण्याचा निर्णय त्यांनी किती सहज घेतला. रिसर्च स्कॉलर म्हणून मिरवण्याचा सोस ॲकॅडमिक क्षेत्रात आज सर्वत्र दिसतो. तुलनेने संशोधनाच्या गुणवत्तेची मात्र पर्वा नसते. 'ॲरिस्टॉटलचे पोएटिक्स', 'फाऊस्ट', 'किंगलिअर' ही पुस्तके मराठीत आणणाऱ्या आणि 'अष्टदर्शने' लिहिणाऱ्या विंदांचा व्यासंगच निराळा!

मुलांत मूल होऊन रमणाऱ्या विंदांची आणखी एक गोष्ट मला भारावून टाकते. दादरच्या कमल मेहता अंधशाळेत जाऊन तिथल्या मुलांकरता वाचन करण्याचा आनंद त्यांनी सुमाताईंसोबत कितीदा तरी दिला-घेतला.

विंदांच्या शब्दांतला कुठेतरी वाचलेला एक प्रसंग आठवतो आहे.

''एके दुपारी वाचलेल्या स्वेदगंगेच्या हस्तलिखित बाडातील कविता! आणि तेव्हा तेथील मोलकरणीने रस्त्यात गाठून कानशिलावर मोडलेली कौतुकाची बोटे! तेव्हा छाती अशी फुगली म्हणता! नंतर तिला कोणत्याही पंपाची जरूर वाटली नाही. तो कैफ उतरलाच नाही. त्या बाईला सौंदर्यशास्त्र, समीक्षा यांचा वाराही लागलेला नव्हता. पुढे पुष्कळ जाणकार भेटले, चांगले म्हणणारे पण त्या बाईने साहित्यिक कौतुकांच्या सगळ्या उपाधींतून मला मोकळं केलं.''

हा ज्ञानपीठ विजेता साहित्यिक उपाधींच्या पलीकडचा हे तर खरेच, म्हणून तो सरोज नवानगरवाली, बकी, कावेरी डोंगरे, धोंड्या न्हावी, मथूआले अशा साध्यासुध्या माणसांच्या सुखदु:खाची गाणी समजून घेऊ शकला. 'माणुसकीचा गहिवर' जपणाऱ्या विंदांना त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने 'शब्द रुची'चे अभिवादन. कवी अशोक नायगावकरांनी आवर्जून पाठवलेली विंदांवरची कविता या अंकाच्या मुखपृष्ठावर साकारली आहे.

काही माणसे व्रतस्थपणे आपले काम करत राहतात. पाहता-पाहता ती डोंगराएवढे काम उभे करतात. कुणी त्याबद्दल प्रशंसा करेल, नोंद घेईल अशा अपेक्षांच्या मर्यादेत न अडकता ती आपले जगणे सार्थक करतात. या अंकातला रामनाथ चव्हाण यांच्यावरचा लेख या अर्थाने खूप महत्त्वाचा आहे.

स्मृतिशेष भीमराव गस्ती आणि चंद्रकांत देवताले यांच्या साहित्यविषयक योगदानाला 'शब्द रुची'ची भावांजली.

'शब्द रुची'चा पुढील जोड अंक ऑक्टोबर-नोव्हेंबर अर्थातच 'दिवाळी अंक' असणार आहे. हा अंक दिनकर गांगल, वसंत आबाजी डहाके, साधना बहुळकर, मनस्विनी लता रवींद्र, श्रीकांत बोजेवार, प्रतिमा इंगोले, प्रज्ञा पवार, नीरजा, किरण येले, अशोक कौतिक-कोळी, प्रमोद कोपर्डे, डॉ. अनंत देशमुख इत्यादी मराठीतील महत्त्वाचे लेखक-अभ्यासक सजवणार आहेत.

साहित्यासह चित्रकला, संगीत, चित्रपट अशा विविध कलांची परिमाणे या अंकाला असणार आहेत.

'शब्द रुची'चे वाचक या अंकाचे स्वागत करतील, हा विश्वास आहेच.

**- डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व),
मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar1966@gmail.com

'ग्रंथाली' कार्यालयास व्यवस्थापनासाठी कार्यकर्त्याची तसेच कार्यालयातील दैनंदिन कामासाठी मदतनीसाची, कर्मचाऱ्याची गरज आहे.

संपर्क : सुदेश हिंगलासपूरकर
भ्रमणध्वनी : ९८६९३९८९३४

संपर्कासाठीची वेळ : १ ते ५
दूरध्वनी : २४३०६६२४ / २४२१६०५०

# प्रा. रामनाथ चव्हाण : भटक्या-विमुक्तांच्या सामाजिक स्थितिगतीचे संशोधन करणारा परिवर्तनवादी लेखक

**अरुण खोरे**

अलीकडच्या काळातील दीर्घायुमान पाहता पासष्टीचे वय हे मृत्यूचे कसे म्हणायचे? पण आपल्या निकटवर्ती मित्रांच्या बाबतच नियती अशी कठोर का होते, हे समजत नाही. रामनाथचे निधन हे असेच झाले, हे मनाला आजही पटत नाही. त्याने जे ललित लेखन केले आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे सामाजिकदृष्ट्या जे ग्रंथलेखन केले, ते खूप महत्त्वाचे आहे आणि त्याच्या व्यक्तिम त्वाचे नीट आकलन होण्यासाठी त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

प्रा. रामनाथ नामदेव चव्हाण हे त्याचे पूर्ण नाव. अलीकडच्या दोन-चार वर्षांत त्याचे जन्मदाते आई-वडील लागोपाठ मरण पावले. या दोघांवर त्याचे निस्सीम प्रेम होते. यानंतर रामनाथच काळाच्या पडद्याआड जाईल, हे कुणी कल्पिलेही नव्हते. पण दुर्दैवाने तसे घडले तर.

रामनाथच्या पार्थिवावर (दि. २० एप्रिल, २०१७) पुण्याजवळच्या कात्रज स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडले. त्यावेळी शोकसभेत बोलताना ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांनी अतिशय तळमळीने त्याने केलेल्या सामाजिक लेखनाबाबत वक्तव्य केले आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्याला या संशोधन अभ्यासासाठी डी.लिट. द्यायला हवी होती, असे सांगितले. अर्थात तो ज्या साहित्य आणि नाट्यकलेच्या क्षेत्रात वावरत होता, तेथील अनेकांनीही त्याच्या लेखनाची दखल घेतली नाही, तिथे विद्यापीठ काय करणार होते? तरीही विद्यापीठाच्या 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासना'वर तो जवळपास ८ वर्षे (२००७ ते २०१५) प्रमुख म्हणून काम पाहात होता. विद्यापीठाने त्याला या अध्यासनाची जबाबदारी सोपवून एक प्रकारे सन्मानित केले होते. या काळातही तो आपला अभ्यास आणि भटकंती यात सतत अडकलेला असे. अण्णाभाऊंच्या नावे असलेल्या या अध्यासनाला त्याने दिशा दिली, लोकांचा आणि विद्यापीठाचा संपर्क प्रस्थापित केला, हे श्रेय रामनाथला द्यायलाच हवे.

रामनाथच्या एकूण ग्रंथलेखनाबद्दल आणि विशेषत: सामाजिक संदर्भातील लेखनाबद्दल सांगताना त्याचा एकूण जीवनप्रवास आपण संक्षेपात का होईना, लक्षात घेतला पाहिजे.

''बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन गावी आलेल्या वडील व चुलत्यांमध्ये मोठा बदल झाला. पोतराज म्हणून जन्मापासून डोक्यावर राखलेले केस चुलत्यांनी कापून टाकले. त्यासाठी भावकीचा मोठा विरोध पत्करला. लोक म्हणाले, ''देवाचं झाड डोक्यावर उगवलं तेच नामदेव व खेतर या दोघा भावांनी कापून टाकले. देवी त्यांना बघून घेईल. आयुष्यात त्यांच्या कुटुंबाचं चांगलं होणार नाही...'' वडील व चुलत्यांना पिढ्यान्‌पिढ्या डोक्यावरचे ओझं खाली उतरल्याचे समाधान झाले.

या बदलाबरोबरच दुसराही बदल घरात झाला. भिंतीवर गौतमबुद्ध आणि बाबासाहेबांचा फोटो घरात लावले गेले आणि रोज बुद्ध वंदना घरात होऊ लागली.''

गेल्या वर्षी 'लोकशाहीसाठी समंजस संवाद' या माझ्या नियतकालिकाच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांका'साठी रामनाथ चव्हाण यांनी जो लेख लिहिला होता, त्यातील दोन उतारे मुद्दाम येथे उद्धृत केले आहेत. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली देशातील दलित वर्गाने मोठ्या प्रमाणात बुद्ध धम्म स्वीकारून आत्मसन्मानाचा नवा मार्ग अनुसरला. याच वाटेने रामनाथचे वडील आणि चुलते धम्म दीक्षा घेऊन निघाले. त्यानंतर त्यांना बारामती तालुक्यातील कोऱ्हाळे या गावी विषम समाजव्यवस्थेविरुद्ध जो जाच व त्रास सहन करावा लागला, त्याची कहाणी सांगणारा 'बाबासाहेबांसाठी कोऱ्हाळे गाव सोडावे लागले,' हा लेख रामनाथने लिहिला होता. या लेखाच्या निमित्ताने त्याची दोन-तीनदा भेटही झाली. या लेखातील हा पुढचा उतारा रामनाथची एकूण वाटचाल कशी झाली, याकडे लक्ष वेधतो, तो मुद्दाम येथे देतो-

''स्वत:चं जन्मगाव सोडून वडगाव निंबाळकर येथे आम्ही राहात असलो तरी जेव्हा-केव्हा मी माझ्या गावी जातो, जेव्हा आजोबांनी बांधलेल्या घराच्या अंगणात वडील आणि चुलत्यांनी बांधलेल्या आजोबांच्या छोट्या समाधीसमोर क्षणभर उभा राहतो. नम्रपणे आजोबांना अभिवादन करतो आणि त्यांनी बांधलेल्या त्यांच्या घराच्या समोरच्या भिंतीवर लिहिलेल्या दोन ओळी वाचतो- 'शीघ्र कवी, तमाशा कलावंत सखाराम चव्हाण तथा कोऱ्हाळकर यांचे निवासस्थान'. या ओळी वाचताना भूतकाळातल्या आठवणी पुन्हा जाग्या होतात. त्याचवेळी गावातली एखादी व्यक्ती जवळ येते आणि खांद्यावर हात ठेवून म्हणते - ''त्या टायमाला गाव सोडलं म्हणून तुमचं चांगलं झालं. नायतर




शरद पवार यांच्या हस्ते ग्रंथप्रकाशन

तुमीबी गावगाड्याच्या या चिखलात आजही रुतून बसला आस्ता.''

रामनाथने आत्मचरित्र लिहिण्याचे जवळपास पक्के केले होते. ते त्याने पूर्ण करावे, असा माझ्यासारख्या मित्रांचा आग्रह होता. तथापि, दोन वर्षांपूर्वी उद्‌भवलेल्या आजारपणामुळे त्याचे लेखन आणि भ्रमंती जवळपास थांबली होती. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात राष्ट्रीय बंधुता संमेलनाच्या वतीने भाई वैद्य यांच्या हस्ते पुरस्कार देऊन रामनाथला गौरविण्यात आले होते.

मराठी साहित्यात आपल्या बहुतेक समीक्षकांनी रामनाथच्या उदंड साहित्याची जवळपास उपेक्षाच केली असे मला वाटते. मराठी साहित्यातील दलित प्रवाहाला आशयपूर्ण योगदान देण्यात त्याच्या पुस्तकांचे मोल मोठे आहे. नाटककार, कादंबरीकार, कथा-लेखक आणि अभ्यासपूर्ण संशोधक या विविध स्वरूपात त्याने केलेले लेखन हे आपल्याला डावलता येत नाही किंवा दुर्लक्षिता येत नाही. तथापि, मराठी समीक्षकांनी या सर्व योगदानाकडे पक्षपातीपणाने दुर्लक्ष केले असे म्हणावे लागेल.

रामनाथ चव्हाण यांची ओळख मराठी साहित्याला झाली, ती एका छोट्याशा कथासंग्रहामुळे. 'उजाडलं का?' हा कथासंग्रह १९७९ साली प्रकाशित झाला. दलितांच्या जगण्याचा आणि संघर्षाचा एक प्रवास त्याने आपल्या कथांमधून मांडला होता. याच वर्षी पुण्यात आणि महाराष्ट्रात दलित रंगभूमीच्या संदर्भात काही उपक्रम सुरु झाले होते. या प्रक्रियेतही रामनाथ सहभागी झाला. त्यानंतर त्याच्यातला सामाजिक नाटककार जागा झाला आणि मग काही चांगल्या नाट्यकृती त्याने निर्माण केल्या. यादरम्यान त्याने कादंबरी लेखनही सुरू केले. 'निळी पहाट' आणि 'भंडारा' या दोन कादंबऱ्या त्याने लिहिल्या. दलितांच्या राजकारणाचे चित्रण रामनाथने केले पाहिजे, असे मला सतत वाटत होते. ते मात्र राहून गेले.


देशातील सामाजिक विषमतेच्या प्रश्नांनी घेरलेल्या समाज-समूहांना जे भोगावे लागते, त्याकडे एक लेखक म्हणून रामनाथ पाहात होता. दक्षिण भारतातील मीनाक्षीपुरम येथे काही दलितांनी धर्मांतर केले, त्याची दखल लेखक म्हणून त्याने घेतली. तो तेथे जाऊन आला आणि त्यानंतर 'साक्षीपुरम' हे त्याने लिहिलेले नाटक प्रसिद्ध झाले. यानंतरच्या काळातही त्याच्या नाट्यकृती बहरत होत्या आणि तो लिहीत होता. 'बामनवाडा', 'महात्मा जोतिराव फुले', 'बावरी', 'चक्रवाकी', 'पारध', 'क्रांती निळ्या नभाची', 'सत्यशोधक महात्मा' ही महत्त्वाची नाटके त्याने लिहिली. याखेरीज 'बायको मी देवाची' ही एकांकिकाही त्याने लिहिली होती. 'बामनवाडा'चा प्रयोग ज्येष्ठ समाजवादी नेते व लेखक नानासाहेब गोरे यांनी पाहिला होता आणि जाहीरपणे आपला अभिप्रायही दिला होता.


पददलित आणि शोषित समाजात महिलांचे जे दु:ख विषमतेच्या समाजरचनेमुळे निर्माण होते, त्याकडेही रामनाथ चव्हाण नेहमीच लक्ष वेधतो आणि आपल्या पुस्तकातूनही ते अधोरेखित करतो. बावरी, चक्रवाकी, पारध या नाटकांतून त्याने आपली ही स्त्रीवरच्या अन्यायाची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला आहे.


एकूणच नाटकाचे माध्यम रामनाथला गवसले होते, तथापि, नंतर दलित रंगभूमी क्षीण झाल्यामुळे त्याच्या नाटकाचे प्रयोग फारसे झाले नाहीत.


इथे एक संदर्भ आवर्जून सांगू इच्छितो. दलित साहित्यविषयक संस्थेच्या संदर्भात भारताचे तत्कालीन उपराष्ट्रपती के.आर. नारायणन यांना भेटायला आम्ही नवी दिल्लीत गेलो होतो. त्यांच्या निवासस्थानी रामनाथचा परिचय करून देताना, ''यांनी धर्मांतरावर नाट्यरूपाने लिहिले आहे'', असे मी उपराष्ट्रपतींना सांगितले. त्यावर नारायणन यांनी आवर्जून मीनाक्षिपुरम, साक्षीपुरम याबाबत आस्थेने माहिती विचारली. त्यानंतर आम्ही तिघांनी एकत्र फोटोही काढला. रामनाथ उपराष्ट्रपतींच्या आपुलकीने भारावून गेला होता. हा संदर्भ अशासाठी सांगितला की देशाच्या घटनात्मक पदावर असलेल्या मान्यवरांनाही या विषयाचे महत्त्व लक्षात येत होते, मात्र आमचे मराठी समीक्षक त्याकडे दुर्लक्ष करीत होते. (अपवाद आमचे स्नेही डॉ.वि.भा. देशपांडे, मंगेश तेंडुलकर आणि सुरेशचंद्र पाध्ये यांचा). त्याचे एकूण प्रेम नाट्यलेखनावर अधिक होते, हे आम्हाला जाणवायचे, तथापि, प्रयोग सादरीकरणाच्या पातळीवर मोठ्या प्रमाणात अडचणी असल्याचे तो सांगायचा.

रामनाथने समाजशास्त्रीय भूमिकेतून संशोधन करून जे लेखन केले, ते खूप महत्वाचे आहे. मराठीत त्याच्या या साहित्याचे वेगळेपण आवर्जून नोंदवायला हवे. मुख्यत: भटक्या जाती आणि जमातींच्या समूहात जागृती येत असताना लक्ष्मण माने यांच्यासारखे नेते पुढे येत असताना रामनाथने हे जे लेखन केले, त्याचे मोल मला अधिक वाटते. 'जाती आणि जमाती' या शीर्षकाचे त्याचे पहिले पुस्तक मुख्यत: मुलाखतींच्या आधारे तयार केलेले होते. त्या पाठोपाठ आलेले 'भटक्या-विमुक्तांचे अंतरंग' हे पुस्तकही त्याच स्वरूपाचे होते. या पुस्तकांच्या निमित्ताने त्याने अगोदर पुण्यातील तरुण भारत या दैनिकात या विषयावर नियमित स्तंभलेखन केले होते. हे दैनिक संघविचारांशी निगडित असल्यामुळे साहजिकच रामनाथच्या लेखनाकडेही अन्य मोठ्या वृत्तपत्रांचे दुर्लक्ष झाले होते.








तथापि, रामनाथने आपले लेखन आणि भ्रमंती अतिशय कष्टाने व चिकाटीने सुरू ठेवली होती. या कामासाठी त्याला कोणतीही शिष्यवृत्ती मिळत नव्हती. तो हमाल-मापाडी मंडळात काम करीत होता आणि दर रविवारची सुटी तो मुलाखतीसाठी या भटक्यांच्या पालावर घालवायचा. हे सगळे काम तो जिद्दीने आणि एकट्याने पूर्ण करत होता.

यानंतरच्या काळात सकाळमध्ये रामनाथचे 'घाणेरीची फुलं' हे उपेक्षित बालकांच्या कथा सांगणारे सदर रविवारच्या पुरवणीत प्रसिद्ध होऊ लागले. ते संपल्यावर 'वेदनेच्या वाटेवरून', 'जगण्यासाठी', 'बिन चेहऱ्याची माणसं' अशी अनेक सदरे प्रसिद्ध झाली. या सदरांची पुस्तकेही वाचकांना अतिशय भावली.

मी वर उल्लेख केल्याप्रमाणे समाजशास्त्रीय भूमिकेतून रामनाथ चव्हाण यांनी जे लेखन जवळपास एक तप (साधारणत: २००२ ते २०१४-१५) केले, त्याचे पाच ग्रंथ आज संदर्भाच्या दृष्टीने फार मोलाचे आहेत. समाजशास्त्रीय अशा पद्धतींनी कदाचित या ग्रंथांचे वेगळेपण लक्षात येणार नाही, तथापि, त्या मागची रामनाथ चव्हाणांची अभ्यासाची, संशोधनाची तळमळ लक्षात घेतली तर एका उपेक्षित समाजसमूहाचे अवघे जीवन त्याने कसे समोर आणले, हे ठळकपणे जाणवू शकेल. 'भटक्या-विमुक्तांची जात पंचायत' या शीर्षकाचे एकूण पाच ग्रंथ अभ्यासपूर्ण रीतीने लिहून त्याने ते पूर्ण केले. भटक्या आणि विमुक्तांच्या विविध जातपंचायतीमधून स्त्रीला आणि दुबळ्यांना कसे नाडले जाते, कुप्रथांमध्ये कसे अडकविले जाते आणि त्यातून त्यांचे कायम स्वरूपी शोषण कसे केले जाते यांवर रामनाथने या ग्रंथांमधून प्रकाश टाकला आहे.

'भटक्या-विमुक्तांची जातपंचायत' हा महाराष्ट्रातील सामाजिक संशोधनाचा पाच ग्रंथ असलेला बृहत्प्रकल्प रामनाथ चव्हाण याने अतिशय कष्टाने, अभ्यासाने पूर्ण केला. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील कोणत्याही विद्यापीठातील विद्वान भरपूर शिष्यवृत्त्या अथवा संशोधनवृत्ती असल्याखेरीज असे प्रकल्प पूर्ण करत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच रामनाथचे हे एकूण काम नीट समजून घेतले पाहिजे.

भटक्या विमुक्तांच्या जातपंचायतीच्या या अभ्यासापूर्वी त्याची एक रूपरेखा रामनाथने दोन पुस्तकात काहीशी मांडली होती. त्याचे या विषयावरचे पहिले पुस्तक होते 'जाती आणि जमाती', आणि दुसरे होते 'भटक्या-विमुक्तांचे अंतरंग'. या पुस्तकांतून जे तपशील आले, त्याला अधिक नेमकेपणाने आणि संदर्भग्रंथांच्या सहाय्याने पुढील प्रकल्पात त्याने ग्रंथरूप दिले.

'भटक्या-विमुक्तांची जातपंचायत' (भविजा) या ग्रंथ-प्रकल्पाच्या पाच भागात त्याने भटक्या-विमुक्तांच्या एकूण ४२ जमातींची माहिती दिली आहे. यासाठी त्याने तज्ज्ञांशी चर्चा, संदर्भग्रंथ, प्रत्यक्ष पालावर जाऊन मुलाखती आणि कार्यकर्त्यांचे अनुभव अशा विविध साधनांचा अवलंब केला. रामनाथच्या भाषेत सांगायचे तर ''स्वातंत्र्योत्तर काळामध्ये न्यायव्यवस्था अस्तित्वात येऊनही जातपंचायतीची व्यवस्था ही सुरू राहिली. या पंचायतीची कोठेही लेखी स्वरूपात घटना नाही. प्रथा आणि परंपरेनुसार सर्व गोष्टी चालत. पंचायत ठरलेल्या ठिकाणी एखाद्या झाडाखाली किंवा उघड्या मैदानात भरते.''

साधारणत: २००२ ते २०१२ या दहा वर्षांच्या काळात भविजाचे हे पाच खंड प्रसिद्ध झाले. पहिल्या खंडात रामनाथने ११ जमातींची माहिती दिलेली आहे. शिवाय याच खंडात मुस्लिमांमधील जातिप्रथेचा तपशील देणारे परिशिष्ट समाविष्ट केले आहे. यातच त्याने जातपंचायतीची राज्यातील ठिकाणे आणि भटक्यांच्या देवदेवता यांचे तपशीलही दिले आहेत. या बहुतेक ठिकाणी तो मुलाखतींसाठी आणि जातपंचायतीचे प्रत्यक्ष कामकाज पाहण्यासाठी जाऊनही आला. विशेषत: अहमदनगर जिल्ह्यातील मढी हे भटक्या-विमुक्त पंचायतींचे सुप्रीम कोर्ट आहे, हे त्याचे निरीक्षण त्याने नोंदविले आहे. याखेरीज महत्त्वाची पंचायत पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथे भरते, असे तो नोंदवतो.

भविजाच्या दुसऱ्या खंडात ९ भटक्या जमातींची माहिती त्याने दिली आहे. या खंडाला ज्येष्ठ तज्ज्ञ डॉ. सूर्यनारायण रणसुभे (लातूर) यांची प्रस्तावना आहे. तिसऱ्या खंडात ६ जमातींची माहिती दिली असून, चौथ्या खंडात ७ जमाती आणि उरलेल्या ९ जमातींचा तपशील पाचव्या खंडात आहे. तिसऱ्या खंडाला 'उपरा'कार आणि 'विमुक्तायन' या समाजशास्त्रीय ग्रंथाचे लेखक व संपादक लक्ष्मण माने यांची प्रस्तावना आहे. भटक्या-विमुक्त समाजाच्या १९७० नंतरच्या प्रबोधनात माने यांचे योगदान मोठे आहे. ते रामनाथबद्दल या प्रस्तावनेत लिहितात -

''रामनाथ चव्हाण यांचा हा ग्रंथ म्हणजे भटक्या-विमुक्तांच्या इतिहासाचा दस्तावेज आहे. त्यांच्या ग्रंथाचे आणखी एका अर्थाने महत्त्व आहे, ते म्हणजे भटक्या-विमुक्तांचे सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक जीवन, त्यांची कुटुंबपद्धती, जातपंचायती, त्यांचे दारिद्र्य, उपेक्षा या सर्वांचे दर्शन त्यांनी या ग्रंथातून घडविले आहे.''

भाई वैद्य यांची प्रस्तावना चौथ्या खंडाला आहे. मराठी साहित्यातील भटक्यांचे लेखन, त्याचे एकूण योगदान आणि सामाजिक इतिहासाच्या संदर्भात समाजशास्त्रीयदृष्ट्या रामनाथ चव्हाण यांनी केलेले संशोधनपर ग्रंथलेखन वाकडे भाईंनी

जाणकारांचे लक्ष वेधले असून रामनाथच्या योगदानावर पसंतीची मोहोर उठविली आहे. या चौथ्या खंडात रामनाथने शासनमान्य जमातींची यादी, १९३१ ते १९९१ या दरम्यानच्या काळातील जनगणनेतील भटक्यांची लोकसंख्या याची आकडेवारी जोडली आहे. संदर्भाच्या दृष्टीने हे तपशील अभ्यासक व संशोधक यांना निश्चितच महत्त्वाचे आहेत.

रामनाथचे हे पाचही खंड साधारणतः छापील पृष्ठांच्या संख्येत सांगायचे तर १२०० हून अधिक पृष्ठे भरतात. एक जातपंचायत बघण्यासाठी तो मढीला गेला होता. तेथे एका पारध्याची मुलाखत त्याने घेतली. तो पारधी पारवा सोलता-सोलता म्हणाला की माझी बायको जातपंचायतीच्या शिक्षेमुळे गहाण ठेवली आहे. हे ऐकल्यानंतर सुन्न झालेल्या रामनाथला वाटले की या जातपंचायतीच्या संदर्भातच आपण अधिक संशोधन करावे, लिहावे आणि अधिकाधिक जातीजमातींच्या पंचांना, लोकांना भेटावे. त्यातून हा मोठा प्रकल्प आकाराला आला. या प्रकल्पाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रामनाथ चव्हाण याने रेखाटलेली अनेक रेखाचित्रे. कारण स्वतः चित्रकार असल्यामुळे या सर्वांची रेखाचित्रे त्या त्या प्रकरणात पाहताना लेखकाच्या लेखणीबरोबरच कुंचल्याचेही कौतुक वाटते.

रामनाथच्या प्रवासात अखेरच्या काळात त्याने रुग्णशय्येवरून त्याचे नवे पुस्तक मला दिले, 'गावगाडा-काल आणि आज'. शंभर वर्षांपूर्वी त्रि.ना.आत्रे आणि ब्रिटिश अधिकारी एन्थोव्हेन यांनी लिहिलेले 'गावगाडा' हे पुस्तक विचारात घेऊन बदललेल्या गावगाड्याचे एक अभ्यासपूर्ण निरीक्षण रामनाथने त्याच्या या नव्या पुस्तकात केले. या पुस्तकातील त्याची मांडणी आणि दृष्टिकोन लक्षात घेण्यासारखा आहे.

आत्रे यांनी वर्णिलेला गावगाडा आणि आजच्या बदललेल्या गावगाड्याचे विश्लेषण रामनाथच्या या पुस्तकात आहे. 'बलुतेदार आणि आलुतेदारांचे आजचे स्वरूप' आणि 'आजचा गावगाडा' या दोन प्रकरणात त्याने या वंचित, उपेक्षित वर्गात शाहू महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारामुळे जे परिवर्तन झाले, त्याचा तपशील दिला आहे. आत्रे यांनी एकूण गावगाड्यातील उतरंड आणि विषमता यांची फक्त माहिती दिली आहे. तथापि, त्या पाठीमागची जातीयता आणि धार्मिक दबाव याचा मात्र उल्लेख केलेला नाही, याकडे परिवर्तनवादी चळवळीचा लेखक म्हणून रामनाथ निर्देश करतो. यानंतरच्या काळात गावगाडा आणि लोकसंस्कृतीवर लिहिणाऱ्या अनेक विद्वान लेखकांनी आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे ग्रामीण समाजातील जे परिवर्तन सुरू झाले, त्याकडे डोळेझाक केली असा आक्षेपही रामनाथ नोंदवितो. या व्यापक अर्थाने रामनाथचे हे नवे पुस्तक अतिशय महत्वाचे आणि मोलाचे आहे, असे मला वाटते.

म्हणूनच या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी शरद पवार आणि मुख्यमंत्री यांना आपण बोलावू, असे मी त्याला सुचविले, त्यावेळी त्याची कळी खुलली होती. तब्येत सुधारल्यावर आपण त्यांना भेटायला जाऊ, असेही आमचे बोलणे झाले होते. एकूणच त्याला या पुस्तकाच्या निमित्ताने नवा उत्साह वाटत होता, हे मला जाणवले. शेवटी काळ असतोच, त्याची तारीखही ठरलेली असते. रामनाथने २० एप्रिल २०१७ रोजी आपल्या सर्वांचा निरोप घेतला. मार्च महिन्यात त्याने पासष्टी ओलांडली होती. त्याची तब्येत सुधारेल असे वाटत होते. त्याच्या घरी दोन नातवंडे आली होती, त्याचा आनंदही त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता.

विद्यापीठाच्या अण्णा भाऊ साठे अध्यासनाखेरीज पुण्यातील डॉ. आंबेडकर रिसर्च फाऊंडेशन, नाशिकचे दलित नाट्यसंकुल, पुणे विद्यापीठाची अॅकॅडमिक कौन्सिल, विद्यापीठाचेच प्रौढ शिक्षण अभ्यास मंडळ अशा विविध जबाबदाऱ्या त्याने पार पाडल्या. केंद्र सरकारच्या तत्कालीन नियोजन आयोगाच्या अभ्यास व कृतिगटाचा सदस्य म्हणूनही तीन वर्षे काम पाहिले. या जबाबदाऱ्यांबरोबरच एक लेखक व नाटककार म्हणून काही महत्त्वाच्या संमेलनांचे अध्यक्षपदही भूषविले- नाशिकला भरलेले अखिल भारतीय दलित नाट्य संमेलन (१९९२), अस्मितादर्श साहित्य संमेलन, परभणी (२०१०), दलित साहित्य विचारवेध संमेलन, पुणे (२०१२) इ. याबरोबरच अमेरिकेतील पहिले विश्व मराठी साहित्य संमेलन (२००९), भटकेविमुक्त राज्यस्तरीय चर्चासत्र, कोल्हापूर (२०१०) अशा उपक्रमांतही तो सहभागी झाला. इथे आणखी एक गोष्ट नोंदवितो. गेली दहा-बारा वर्षे रामनाथच्या नाटकांवर आणि अन्य लेखनावर महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांतून संशोधन प्रबंध लिहिले जात आहेत. ही अतिशय आश्वासक अशी गोष्ट आहे.

रामनाथला स्थानिक आणि राज्यपातळीवरचे अनेक पुरस्कार मिळाले. पुणे महापालिका आणि पुस्तकप्रेमी श्याम पानगंटी यांनी दिलेल्या पुरस्कारांपासून ते राज्य सरकारच्या वाङ्मय पुरस्कारापर्यंत अनेक पुरस्कार त्याला मिळाले. तथापि, राष्ट्रीय पातळीवर मराठी ग्रंथांना पुरस्कार देणाऱ्या अनेक मान्यवर संस्थांनी रामनाथकडे मात्र दुर्लक्ष केले. राष्ट्रीय बंधुता संमेलनासारख्या संस्थेने आस्थेने त्याची दखल घेऊन त्याला वारंवार सन्मानित केले. अर्थात एखाद्या समर्पित लेखकाचे मूल्यमापन अथवा गौरव अशा पुरस्कारांनी होतो, अशी भूमिका येथे नाही. तथापि, तुलनेने कमी महत्त्वाच्या लेखक व संशोधकांना अशा संस्था किती वेळा गौरवतात, हे पाहिल्यावर हा मुद्दा मांडावासा वाटला.

पुण्यातील कात्रज परिसरातले त्याचे घर आणि त्यातील रामनाथच्या पुस्तकांचा एक हॉल हे आमचे नेहमीचे भेटीचे ठिकाण. या पुस्तकांचे जतन करणे हे आपले काम आहे. त्याच्या कुटुंबीयांना यासाठी सहकार्य करण्याची गरज आहे. त्याच्याशी या ग्रंथघरात बसून बोलताना अनेक पुस्तकांचे विषय पुढे यायचे. त्याच्या संकल्पातील त्याचे आत्मचरित्र आता राहून गेले आणि संस्थात्मक पातळीवर काम करताना मी त्याला सुचविलेले अण्णाभाऊ साठे यांचे अद्ययावत चरित्र लेखनही होऊ शकले नाही. ही खंत एक रुखरुख म्हणून कायम राहील. विशेषतः त्याच्या आत्मचरित्राची जुळवाजुळव सुरू असतानाच परमात्म्याने त्याला बोलाविले ही त्याचीच इच्छा!

– अरुण खोरे
भ्रमणध्वनी : ९६०४००१८००
arunkhore@gmail.com

# साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'खारीच्या वाटा'

दीपा ठाणेकर

'राजहंस' प्रकाशित ल.म. कडू लिखित 'खारीच्या वाटा' या पुस्तकाला नुकताच साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार प्राप्त झाला. आपल्या लेखनातून, चित्रकलेतून मुलांपर्यंत पोचणारे ल.म. कडू यांनी चाळीस वर्षांपूर्वी 'गमभन' ही प्रकाशन संस्था सुरू केली. या प्रकाशन संस्थेतर्फे जवळजवळ २०० पुस्तके प्रकाशित केली गेली. मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा, प्रोत्साहन मिळावे यासाठी 'गमभन दिनदर्शिका' गेल्या चौदा वर्षांपासून ते प्रकाशित करीत आहेत. मुलांना निसर्गाचा परिचय व्हावा यादृष्टीने पानशेतजवळ सात एकर जागेवर त्यांनी 'विद्याविहार पर्यावरण' हा प्रकल्प सुरू केला आहे, ज्याला हजारो मुलांनी भेट दिली आहे.

'खारीच्या वाटा' या पुस्तकाच्या निमित्ताने साहित्य अकादमीने केलेला ल.म. कडू यांचा सन्मान महत्त्वाचा आहे म्हणून हे पुस्तक वाचायला घेतलं. अर्थात ते सहजासहजी सापडलं नाहीच. पण जेव्हा ते सापडलं तेव्हा एका दमात ते संपवावं असं वाटलं नाही, एखादी आवडती गझल एकदाच ऐकून मन जसं भरत नाही, ती जशी लज्जत घेत घेत पुन्हा पुन्हा ऐकली जाते तसं काहीसं होत गेलं.

पुस्तकाच्या मुखपृष्ठावर 'बैल आणि त्याच्या शिंगावर असलेली इटुकली खारुताई' दिसली. बैलाच्या डोळ्यातील भाव देखणे आणि खारुताईच्या डोळ्यातही एक वेगळी लकाकी जाणवली, खारुताईच्या शेपटीचा झुपका तसा पूर्ण आलेला नसला तरी त्या झुपक्यावरून खारुताईचा तोराही दिसत होता. पुस्तक वाचायला सुरुवात केली.

जिनं माझ्यातलं  
हिरवेपण जपलं त्या  
मावळातल्या  
तांबड्या मातीस...

अशी लेखकाची कादंबरीच्या सुरुवातीची अर्पणपत्रिका वाचली. तेव्हाच जाणवलं की लेखक जे सांगणार आहे ते फक्त त्या बैलापुरतं, खारीपुरतं मर्यादित नाही तर मावळ प्रांत, त्याच्या हिरवेपणाबद्दल आणि त्याच्या तांबड्या मातीबद्दल बोलणार आहे .

प्रथमदर्शनी ही कादंबरी हातात घेतल्यावर प्रश्न पडतो की अरे ही दीर्घ कविता आहे का? कारण त्याचे असलेले मुद्रितरूप हे कवितारूपी वाटते.

दिवस चांगलाच वर आलेला.  
शाळेच्या पटांगणात पोरं हारीनं बसलेली.  
प्रत्येकाच्या पुढ्यात मातीचा ढीग.  
जो तो त्यावर बोटानं अक्षरं काढण्यात गुंतलेला.  
मास्तर मधून फिरत होते.  
त्यांच्या हातातली छडी पोटरीलगत चिकटलेली.  
कधी उपसून कुणाच्या पाठीवर बसेल त्याचा नेम नाही.  
वाकलेल्या माना. थरथरते हात. दबकी खिसफीस.

अशाप्रकारची मुद्रितरचना कादंबरीस देणं हे ह्या कादंबरीचे नावीन्य, वेगळेपण त्यामुळे त्याला काव्यसौंदर्याचा बाज प्राप्त झाला आहे. पण वाचता वाचता जाणवत जातं की ही चौथ्या इयत्तेत शिकत असलेल्या नायकाच्या भावविश्वाशी जोडली गेलेली कादंबरी आहे.

कादंबरीला नायक हा त्याच्या शाळेविषयी, त्याच्या भोवतालच्या परिसराविषयी, त्याच्या मनातील विचारांविषयी, मित्राच्या भावविश्वाबद्दल, आपल्या गावाविषयी, तिथल्या निसर्गाविषयी, सणांविषयी, गावातील घडामोडींविषयी, शेतीविषयी बोलत राहतो.

कादंबरीची सुरुवात होते ती नायकाच्या शाळेतील वातावरणाने. १९५४ साली सुरू झालेली ही बिनभिंतीची शाळा, जिथे एक मास्तर चार चार वर्ग सांभाळत आहेत. देवळात भरणारी बिनभिंतीची उघडी शाळा पण वर्गाच्या जागा मात्र निश्चित ठरलेल्या. नदीकडे तोंड करून बसलेली रांग पहिलीची, देवळाकडं बघणारी दुसरी इयत्ता. तिसरीची पाठ मागल्या आवडाकडं तर चौथीचा वर्ग मारुतीच्या ओढ्याकडं तोंड करून बसलेला. शाळा भरणं सुटणं हे फक्त आजीच्या घड्याळावर अवलंबून. चौथीची परीक्षा पास



होऊन ५८ साली बाहेर पडणारा नायकाचा पहिला वर्ग त्यामुळे शाळेचा निकाल, मुलांचा अभ्यास याबाबत गुरुजी दक्ष असतात. नायकाचा मित्र दिनू हा शाळेत बऱ्याचदा गैरहजर राहणारा म्हणून मास्तर नायकावर त्याला शाळेत आणण्याची जबाबदारी सोपवतात. गुरुजींचा निरोप सांगण्यासाठी दिनूकडे जात असताना नायकाला दिसतं ते एक खारीचं पिल्लू.

ज्याला शाळेतील सगळी मुले त्रास देत असतात. ते पिल्लू उचलून नायक घरी घेऊन येतो, आईची मदत घेऊन नायक त्या पिल्लाची काळजी घेतो. पिल्लाच्या जिवात जीव येतो. मग तिचे नामकरण 'लुकी' असे मायलेक करतात, तिथपासून लुकी आणि नायक यांच्या मैत्रीच्या प्रवासाला सुरुवात होते. ह्या प्रवासात आणखी एक सहचर मिळतो तो म्हणजे दिनू. लुकीच्या वाढण्याच्या काळात होणारे बदल, तिच्या करामती यामुळे या दोन्ही मित्रांचे जग त्या लुकीभोवती गुंफले जाते. हळूहळू नायक, दिनू, लुकी यांची गाढ मैत्री होत जाते. इतर मुलांबरोबर खेळण्यापेक्षा लुकी बरोबर खेळण्यात, तिला काही गोष्टी शिकवण्यात, प्रयोग करण्यात ते दोघे रमून जातात. लुकीच्या हालचाली, तिच्या डोळ्यातील भाव, तिच्या आवाजातील वेगळेपणा यावरून या खारीविषयीची त्यांची समज वाढत जाते. तिला काही गोष्टी शिकवत असताना तिच्या मनातील गुजगोष्टी हळूहळू त्यांना समजू लागतात. हळूहळू लुकी नायकाच्या घरातील गोतावळ्याचाच एक भाग बनून जाते. घरातील भाम्ब्या बोक्याला उंदराची शिकार करण्यासाठी मदत करणं, बारश्या बैलाशी दोस्ती करणं, आपल्या ह्या छोट्या दोस्तांनी शिकवलेल्या गोष्टी अंमलात आणून त्यांना जांभळं, हिरडा, तोरणं, आंबे, काटेसावरीची फुलं आणि इतर रानमेवा शोधायला मदत करणं. काट्याकुट्यांतून रस्ता काढत आपल्या मित्रांना योग्य त्या ठिकाणी पोहोचवणं या सगळ्यातून या तिघांचे एक सुंदर विश्व तयार होत जातं. एकदा तर सापाला शोधण्यासाठी ती स्वतःच्या जिवावर उदार होऊन सापाला शोधते आणि धोंडिबा आणि गावकऱ्यांचा जीव वाचवते. नायक लुकीचा जीव वाचवतो, तिला खाऊपिऊ घालतो, शाळेला जाण्यापूर्वी ती त्याच्यासोबतच जेवायला बसत असे, तरी तिची भाषा समजत असे ती दिनूला. दिनूने दिलेला कापणीचा खाऊ मात्र ती नायकाकडूनच खात असे.

लुकीबरोबरच्या सहवासामुळे या दोन्ही मित्रांचे प्रेम वाढत जाते, मैत्रीत असलेला हक्क, भांडण, खोड्या, समंजसपणा यामधून त्यांची मैत्रीची समज वाढत जाते. गावाभोवतीच्या निसर्गाचा, गावातील खेळांचा, सणांचा, शेतीचा आनंद घेत-घेत तिघेही जण स्वच्छंदपणे जगत असतात पण अचानक गावात एक बातमी घेऊन कराडकर येतो की 'गावनदीवर धरण येणार.' आणि गाव आनंदी होते. गावाला बाहेरच्या जगाची अजिबात धग लागलेली नसते त्यामुळे आपल्या गावात काही तरी होणार असे वाटून सगळे आनंदित होतात. पण हा आनंद फार काळ टिकत नाही कारण धरणासाठी काही गावांना स्थलांतरित होणे भाग असते. आणि त्यासाठीचा पहिला बळी हा नायकाच्या गावाचा जाणार असतो. ह्या भयंकर बातमीमुळे सगळेजण धास्तावून जातात. प्रत्येकाची शेती, उदरनिर्वाहाचा धंदा, घराची जागा सगळ्याच गोष्टी जाणार. अख्खा गाव विभागला जाणार, कुणाला कुठे पाठवले जाईल याची खात्री नाही. सगळंच गाव विस्कटून जातं. त्यात दिनू आणि नायक यांचं निष्पाप आयुष्यही भरडलं जातं. होळी साजरी होते. त्यानंतर धरणाबद्दल कागदोपत्री व्यवहार होत जातात आणि गावात थोराड मशिनी आणल्या जातात. गावातील रस्ते गुळगुळीत होत जातात. त्यातच गावात इंडियन न्यूजसाठी गावाची छोटी फिल्म काढण्यासाठी कॅमेरा युनिट येतं. नायकाच्या घराजवळ हे चित्रीकरण चालू होतं. नायकासकट बऱ्याच मुलांना या चित्रिकरणात सामावून घेतलं जातं पण मुलांकडून काम करवून घेताना त्यांचा आत्मविश्वास पुरता ढासळवला जातो.

मुलं मुकी मुकी होत जातात. हे सगळं नायकाच्या घराजवळ होत असतं कारण नायकाच्या घरासमोरचा परिसर मोठा असतो. काही दिवसात लगेच लगबग होते आणि गावातील सगळ्यांचे अंगठे कागदांवर घेतले जातात आणि गाव सोडायला लागणार याच्या नोटिसा यायला सुरुवात होते. पैसे मिळणार असतात पण गाव सोडायचं सगळ्यांच्याच जिवावर आलेलं असतं. कोणतंही घर आतून सुखी नसतं. बाया, आज्या सगळ्यांचीच कातडे पिळवटून जाणारी परिस्थिती झालेली असते. गावातील हे वातावरण दिनू आणि नायकाच्या मनाला व्याकूळ करणार असतं. पण दोघांच्या घरातील माणसांच्या किंवा त्या दोघांच्याही हातात ते नसतं. दोघेही आतून हलून जातात. कुठे कुणाला कसली जागा मिळेल काहीच सांगता येत नसतं. दोघेही एकाकी होऊन जातात. अगोदरच सगळं निष्पाप भावविश्व पूर्ण उद्ध्वस्त होऊन जातं. ह्याला साक्षी असते ती लुकी. तिलाही गावातील परिस्थितीचा अंदाज येतो. दिनूचे अस्वस्थ होणे, ओक्साबोक्शी रडणे यामुळे नायकही खचून जातो. हळूहळू सगळं गाव रितं होत जातं. दिनू, नायक आणि त्यांचे काहीच शेजारी तेवढे राहतात. नायकाच्या घरातील गुरं शेजारच्या गावातील लोकांना विकली जातात. बैल घरातून नेताना त्यांच्याही डोळ्यांच्या कडा ओलावतात आणि बारशाच्या अंगावर लुकी उडी मारते. तिलाही काहीतरी जाणवते. थोडावेळ त्याच्या अंगावर खेळून ती चिंचेवर जाऊन बसते. नायकाचा वाढही रिता होऊन जातो. माणसं, जनावरं अगदी कुत्र्यांसकट गाव हलून जातो.

अचानक एके दिवशी ट्रक येतो आणि दिनूच्या घरातील सामान घेऊन जातो. दिनू भेटायलासुद्धा येत नाही. आपल्या आईच्या हातून लुकीसाठी कापण्या पाठवून देतो. निरोप घेणं जिवावरच आलेलं असतं. आणि शेवटी नायकाच्या घरासाठी ट्रक येतो. सगळं गाव, निसर्ग, माती, आठवणी सोडून जाताना नायकासकट त्याचे आई बाबा देखील गप्प होऊन जातात. लुकीला ह्या सगळ्याची जाणीव झालेली. ती निरोप देण्यासाठी येते खरी. नायकाला भेटते. नायकाच्या हातावर ती नेहमीप्रमाणे चढते, आणि आपलं तोंड आचके देत मानेवर आपटू लागते. ती रडत असते की काय ते नायकाला उमजत नाही, ते उमजत असतं फक्त दिनूला, पण तो तर अगोदरच निघून गेलेला. लुकी एकवार नायकाकडे पाहते आणि चिंचेच्या झाडावर चढते. तेवढ्यात नायकाची आई लुकीसाठी दिनूने दिलेली कापणीची पुरचुंडी देते. नायक ती चिंचेच्या झाडावर ठेवून येतो आणि ट्रकमध्ये जाऊन बसतो. गाव सोडताना त्याची नजर लुकीवर, चिंचेच्या झाडावर असते. लुकी झाडाच्या शेंड्यावर पोचलेली असते. नायकाचे डोळे भरून येतात तसे ते लुकीचेही आले असतील असा अंदाज घेऊन नायक रडू लागतो. इथे ही कादंबरी संपते.

कादंबरीतील नायकाचा जीव जसा गलबलून जातो तसा वाचकालाही जीव गलबलून जातो. या कादंबरीतून केवळ तीन जिवांची ताटातूट दाखवण्याकरिता ह्या कादंबरीची निर्मिती नाही. तर एखाद्या गावाचा विकास होत असताना तिथली ग्रामसंस्कृती कशी विस्कळीत होत जाते, माणूस निसर्गापासून, आपल्या जनावरांपासून, माणसांपासून कसा तुटत जातो यावर निवेदक वरील कथानकातून नकळत भाष्य करतो.

कादंबरीत खरीखुरी वाचकांच्या मनाला भिडणारी तीनच पात्रे - नायक, दिनू आणि लुकी. कादंबरीत नायकाची आई, बाबा, चंदर, मास्तर, धोंडिबा, बारशा अशी गौण पात्रे येतात. ती या मुख्य पात्रांना पूरक ठरतात. कादंबरीमध्ये बऱ्याच ठिकाणी प्रसंगचित्रण करताना लेखकाने चित्रांद्वारे देखील ते प्रसंग,वर्णन उभे केले आहे. लेखकाने गावातील सणांचे, शाळेचे, गावातील-शेतातील-रानातील घडामोडींचे केलेलं वर्णन तपशीलवार केल्यामुळे त्या त्या प्रसंगाचे, माणसांचे, त्यांच्या कृतींचे, शेतीचे, रानाचे, झाडांचे दर्शन घडते.

झाडावर हिरव्याचा मागमूस नसे.
नुसती लालेलाल फुलांची आरास!
अवघी सावर अंगोपांगी काट्यांनी लगडलेली.

खोडावर अगदी खेटून असलेले असंख्य काटे आम्हा मुलांना फार आवडत. प्रत्येक काट्याखाली छोटासा गोलाकार भाग असतो. वरचा काटा लगेच निघतो. खालचा मांसल भाग आणि तंटणीची दोनतीन चरबरीत पानं ही आमची पानपट्टी असे. कचाकचा चावून झाल्यावर तोंड तुरट तर जीभ लालभडक व्हायची.

सावरीच्या फुलासारखी!

हे काटेसावरीच्या फुलाचे वर्णन करताना निवेदक त्यात अगदी बारकावे देत जातो.

ती नदी ....
तिचा गहिरा डोह ....
काठावरची लेंडी जांभळं ....
लगडलेली उंबरं .... भाताची खलाटी ....
हिरडे ... आंबे ..... रानमेवा ....
सारं... सारं... जगाच्या जागी राहणार.
फक्त आम्ही जाणार......
आता कोणत्या डोहात बुड्या मारायच्या.....?

गावात धरण बांधण्याची नोटीस येते तेव्हाची उदासीनता अशी वर्णिलेली आहे.


निसर्गाच्या बदलत्या मोसमानुसार येणाऱ्या करटलू, शेंडेवेल, घोटवेल, बाघाटी, कुळव, कुर्डू अशा रानभाज्या, पावटा, हरभरा, मूग, चवळी, उडीद, हुलगा, भात, नाचणी या पिकांसोबत फळांचा हंगाम, ती फळे काढताना केलेल्या क्लृप्त्या, त्यांना साठवण्यासाठी केलेल्या घडामोडी, त्या मिळवण्यासाठी केलेली धडपड, गावातील लग्न, त्यात होणाऱ्या गंमतीजमती, गावातील देव, त्यांच्या कथा, शेतीसाठी केली जाणारी कामं, गुरांची राखण करताना येणाऱ्या अडचणी, वातावरणात होत जाणारे बदल, या आणि ग्राम संस्कृतीतील असंख्य बारीक सारीक गोष्टीचे केलेले वर्णन ह्या कादंबरीचा महत्त्वाचा भाग ठरतात. त्या अनुषंगाने येणार शब्दही आपल्या ज्ञानात भर टाकतात (औचिंदा- वेडसर, अचानक) (खेतऱ्या-नकला करणारा) (डवरा-नदीच्या पात्रात वाळूतून पाणी पाझरून पिण्यासाठी केलेला खड्डा) (खोंगा-हाताचा पसा) असे अनेक शब्द वाचकाला परिचित होत जातात.

कादंबरीच्या शेवटी लेखकाने अशा शब्दांची यादी दिली आहे.

या कादंबरीचे वाचन करताना बऱ्याचदा प्रकाश संत यांच्या सुमी आणि लंपन यांची आठवण येत राहते, ती दिनू आणि नायक यांच्या मैत्रीच्या निमित्ताने. तसंच बनगरवाडीमधील गाव, तेथील खेळ, शाळेतील मुले, गावातील घडामोडी याचेही स्मरण होत राहते. अर्थात येथील निवेदक हा किशोरवयीन मुलगा आहे हे विसरता येत नाही.

एका निसर्गरम्य खेड्याचा विकास होत असताना तिथे असलेली समृद्धता, पिकपाणी, रानमेवा, आपल्या निरागस भावविश्वात रमणारी शाळकरी मुलं, आपल्या जनावरांवर जिवापाड प्रेम करणारे गावकरी हे सगळं जग हरवत कसं जातं यावर भाष्य करणारी ही कादंबरी कथानकाच्या नावीन्यामुळे आणि प्रसंग उभे करण्याच्या काव्यसदृश मुद्रित शैलीमुळे प्रशंसनीय ठरते.

**- दीपा ठाणेकर**
भ्रमणध्वनी : ९८२०१६३१२७ /९६६४४८८२८०
deepathanekar73@gmail.com


पुस्तकाच्या कॅनव्हासवर
गुलज़ार सिनेकथा...
१९ तरल भावस्पर्शी पटकथांचा
संमोहित करणारा साहित्यपट...
गुलज़ार
पटकथा
गुलज़ार
अनुवाद
अंबरीश मिश्र
सविता दामले
वसंत पाटील
Book Available
मेहता पब्लिशिंग हाऊस
www.mehtapublishinghouse.com
Email: sales@mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse
500 Marathi books
Available as e-Book
WhatsApp us on 9420594665
E-book available : play.google.com/store/books | m.dailyhunt.in/Ebooks/marathi | www.amazon.in

# माणुसकीला जागृत करणारी कविता

**मालती हेगडे**

**ज्येष्ठ कन्नड साहित्यिक प्रा. डॉ. एच.एस. शिवप्रकाश यांना २०१७ सालचा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. साहित्य अकादमीच्या 'इंडियन लिटरेचर' या नियतकालिकाचे दीर्घकाल संपादन, बर्लिनमधील टागोर केंद्रात तीन वर्षे निर्देशक, आयोवा विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कविता प्रकल्पात सहभाग, विविध देशांमध्ये इंग्रजी व कन्नड साहित्याचे आदानप्रदान असे विविधांगी काम त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या साहित्याचा हा संक्षिप्त परिचय...**

**प्रा.** शिवप्रकाश हे कन्नड साहित्यातील एक महत्त्वाचे नाव आहे. नव्या पिढीतील काव्यरसिकांना त्यांच्या कवितेने एक नवं दालन खुलं करून दिलं. शिवप्रकाश यांचे 'आजानुबाहू' व्यक्तिमत्त्व विशेषत्वाने लक्ष वेधून घेणारे! 'अनुभव' आणि 'अनुभाव' यांच्या संमिश्र बंधाने युक्त त्यांची काव्यशैली कन्नड भाषेतील नावीन्यपूर्ण शैली ठरते. कवी आणि नाटककार म्हणून केवळ कन्नड साहित्यातच नव्हे तर विश्वसाहित्यात त्यांनी त्यांचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

नवकालखंडात जरी त्यांचे लेखन सुरू झालेले असले तरी त्यांच्या मते नवविचारधारा परंपरा नाकारण्यावर आधारित असते आणि ही प्रवृत्ती कोणत्याही तादात्म्यभावाशी विसंगत ठरते. ज्या मार्गाने दर्जेदार मूल्यांकन करण्यास वाव नाही तो मार्ग त्यांनी सोडला आणि जनमानसाच्या धर्मामधील आस्थेचा शोध घेत सामान्य माणसांच्या धर्मविषयक समजुतींना प्रश्न विचारण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला.

बौद्ध धम्म, मार्क्सवाद, सूफी तत्त्वज्ञान अशा अवैदिक परंपरा समजून घेण्यात त्यांना रस निर्माण झाला तेव्हा हे सर्व त्यांनी वाचनातून तर समजून घेतलेच पण अनेक सूफी संतांशी त्यांनी प्रत्यक्ष संवादही साधला. त्यांच्या अनुभवांशी एकरूप होऊन ते स्वत:तही झिरपवून घेतले.

'मिलारेपा' हा १९७७ साली प्रकाशित झालेला त्यांचा पहिला कवितासंग्रह. या कविता म्हणजे भोवतालातील घडामोडींबाबतचे त्यांचे सूक्ष्म निरीक्षण आहे. 'मिलारेपा' या संग्रहातील कविता आकाशातील तारे मोजणारी मुलगी, पाऊस, समुद्र, पर्वत अशा विविध विषयांवर आधारित आहेत.

'मिलारेपा' या शीर्षकाची त्यांची कविता मिलारेपा या बौद्ध संन्याशाचे चित्र उभे करते. या संन्याशाने त्याच्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली लहानपणापासून योगसाधना केली आहे. गुरूंच्या आज्ञेनुसार आपल्या कुटुंबात परतत असताना वाटेत तो एक स्वप्न पाहतो. या स्वप्नात त्याचे मातापिता मृत्यू पावल्याचे आणि त्याचे घर उद्ध्वस्त झाल्याचे त्याला दिसते. गावी पोहोचताच त्याचे हे स्वप्न खरे ठरल्याचे त्याला कळते. त्याचे योगसामर्थ्य न आजमावता तो 'अनित्यवादाचे' जीवनविषयक वास्तव स्वीकारून पुन्हा तपश्चर्येला निघून जातो. या कवितेतून व्यक्त झालेल्या चिंतनपर अनुभवाची रेषा शिवप्रकाश यांच्या पुढील कवितांचा मार्ग अधिक उन्नत करते.

त्यांची 'गौरम्मा' ही कविता स्थितप्रज्ञ वृत्तीने जगणाऱ्या एका स्त्रीचे चित्रण करते. गौरम्मा तिच्या दारुबाज नवऱ्याचा न बदलू शकणारा स्वभाव स्वीकारून जगते आहे. तिच्या नवऱ्याच्या मारण्याचा आवाज आणि गौरम्माच्या स्वयंपाकघरातील संपूर्ण शांतता ऐकून घाबरलेले तिचे शेजारी सकाळीच तिला नेहमीप्रमाणे अंगण झाडताना आणि रांगोळी काढताना पाहतात. पुरुषी अहंकार मिरवणाऱ्या नवऱ्याबद्दल तिच्या मनात आता कोणत्याही भावना नाहीत.

'माले बिद्दा नेलादल्ली' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह १९८३ साली प्रकाशित झाला. त्यांच्या या संग्रहातील कविता क्रांतिकारक विचारांनी भारलेल्या आहेत. या कविता समाजातील प्रतिष्ठित वर्गाच्या धारणांना धक्का देतात. या संग्रहातील काही उत्कृष्ट कवितांपैकी 'समग्र भीमाव्वा' या कवितेत नागलिंगाच्या कथेद्वारे शिवप्रकाश यांनी जातिप्रथेच्या निरर्थकतेचे मर्म उलगडले आहे. अध्यात्माची उत्कट इच्छा असणारा नागलिंगप्पा धारवाडजवळील नवलगुंद या ठिकाणी राहायला येतो. मौनेश्वर नावाच्या मठात तो आश्रय घेतो. तिथे भयंकर रोग त्याला ग्रासतात परंतु चांभार जातीतील भीमाव्वाच्या स्तनांच्या दुधामुळे तो तग धरतो. पुढे नागलिंगप्पा भीमाव्वाचा उल्लेख त्याची आई, गुरू आणि जगदीश्वरीचा अवतार म्हणून करतो.

जो 'अजन्मा' असतो<br>
त्यास कोणतीही जात नसते

या ओळी जातिभेदाची जाणीव ओलांडण्यातील उर्मी

प्रकट करतात आणि मातृत्वाची भावना अधिक व्यापक करतात. त्यांच्या अनेक कविता संवाद आणि स्वगताच्या रूपबंधातून नाट्यात्म चौकट धारण करतात.



''धार्मिक व्यक्तिमत्त्वे आणि धार्मिक वातावरण माझ्या बालपणी मला लज्जास्पद वाटत असे पण मला हेही ठाऊक होते की जे धर्माला विरोध करतील, तेही धर्मावर विश्वास ठेवणाऱ्यांइतकेच अप्रामाणिक आणि दांभिक असू शकतील.'' असे शिवप्रकाश यांनी त्यांच्या एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. धर्माच्या मुळाशी असलेल्या शुद्ध-दूषित नसलेल्या तत्त्वांचा ते वेध घेतात. पावित्र्याच्या लोप पावलेल्या कणांचा मागोवा ते कार्ल मार्क्सच्या विचारांच्या भूमीवर घेतात. शिवप्रकाश स्वत:ला क्रांतिप्रवण गूढगुंजनवादी परंपरेतील कवी मानतात.

'अणुक्षण चरिते' हा शिवप्रकाश यांचा आणखी एक कवितासंग्रह. पावसाळी ऋतू, सावली नसलेला उन्हाळा, आमंत्रण देणारी पण घराचा आधार न देऊ शकणारी शहरे, क्षणात विषमय होणारा मैत्रीचा गोडवा, न संपणाऱ्या सुन्न रात्रीत एखाद्या लहान मुलाला आधार देणारा आश्वासक प्रकाश अशा विविध संकल्पनाभोवती त्यांच्या कवितांची गुंफण झालेली दिसते. वाचक या कवितांतील जाणिवांशी सहज समरस होतो आणि आत्मनिष्ठ अनुभवांचा आनंद घेतो. 'केंपू गुलाबामा' या कवितेत कवी लाल गुलाबाशी संवाद साधतो तर 'चित्ते' या कवितेत फुलपाखरांच्या हालचालींचे वर्णन करतो.

फुलपाखरू बागेत उडत होते
आणि फुलपाखराच्या आतही एक बाग बसली होती.

अशा तरल ओळी निसर्गाची स्पंदनं टिपण्याची कवीची संवेदनशील शैली सूचित करतात.

'सूर्यजाल' या संग्रहातील कविता अवकाश आणि काळाच्या सीमापलीकडील संकल्पनांच्या कथा सांगतात. 'नविलु-नगर काव्य संकलन' हे त्यांचे पुस्तकही कथारूप प्रसंग चित्रित करणाऱ्या कवितांचे संपादन आहे. त्यांच्या अनेक कवितांना लोकसाहित्याची लय लाभली आहे. 'निदुरे मादवने' ही त्यांची कविता अध्यात्म रंगाचा लोकशैलीत आविष्कार करते. त्यांच्या भाषेच्या उपयोजनाचे सौंदर्य कवितांना भावपूर्ण आशय प्राप्त करून देते. कथनात्म रूप संवादात्मक नाट्य, लावणी, अभंग, तत्त्वचिंतनपर पदे अशा विविध रूपबंधांचा प्रयोग त्यांनी केला. विविध रूपकांची समर्पक योजना हे त्यांच्या पदांचे वैशिष्ट्य ठरते. नवकालखंडातील (कन्नडमधील 'नव्य' काव्य) कवी गेय कवितेपासून दूर राहिलेले दिसतात पण शिवप्रकाश यांची कविता याही बाबतीत वेगळी ठरते. आजवर त्यांची ११ नाटके प्रकाशित झाली असून यात 'महाचैत्र' हे त्यांचे महत्त्वाचे नाटकही समाविष्ट आहे. ('महाचैत्र' या त्यांच्या नाटकाला समाजातील काही घटकांचा विरोध झाला. त्यामुळे कन्नड सरकारने त्यावर बंदी आणली होती.) त्यांच्या विविध साहित्यकृती मल्याळम, हिंदी, तमीळ आणि तेलगू भाषेत अनुवादित झाल्या आहेत.

जगभरातील विविध देशांतील आणि विविध भाषांतील कवितांशी शिवप्रकाश जोडले गेले. ज्या कवितांनी त्यांना पुन्हा-पुन्हा साद घातली आणि ज्यांच्याविषयी आत्मीयता निर्माण झाली अशा कवितांचा त्यांनी कन्नडमध्ये अनुवाद केला. हे संकलन 'मारू रूपगानू' या नावाने प्रसिद्ध आहे. अनुवादाच्या कोणत्याही एकाच निश्चित शैलीशी त्यांनी जखडून घेतले नाही. उदाहरणार्थ जपानी हायकू त्यांनी त्रिपदीमध्ये अनुवादित केले तर लल्लेश्वरीची द्विपदी त्यांनी गीतात रूपांतरित केली. दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या घटनांना त्यांच्या अनुवादित कवितांमध्ये स्थान मिळाले. उदाहरणार्थ :

शांत जलाशयातून बाहेर पडणारा बेडूक
सगळं काही ढवळून काढतो आहे
किंवा
नदीचं पाणी आधीच थंड आहे.
चला, त्याचं बर्फ किंवा वाफ होण्याआधी
स्नान करून घेऊ...

आजच्या बदलत्या चंगळवादी जीवनशैलीत भाषांना निर्माण झालेल्या धोक्यांबद्दल जगभरात चिंता केली जाते. अशीच भीती कवितेविषयीही अधूनमधून व्यक्त होत राहते. शिवप्रकाश यांच्या मते चंगळवाद हेच एकमेव कारण नाही. बदलत्या गरजांनुसार कवितेनेही आता नव्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या पाहिजेत असे ते म्हणतात. कविता हा साहित्यप्रकार केवळ बौद्धिक व्यायामाकरता नाही किंवा उदास क्षणी वाचण्यासाठीही नाही. आनंदाच्या क्षणी कविता वाचता वा गाता आली पाहिजे. बदलत्या अपेक्षांशी जोडून घेत कवितेने तिचे रूप, रंग, चेहरा आणि शैली बदलत राहिली पाहिजे.

एका नायजेरियन कवीने प्रा. शिवप्रकाश यांच्याविषयी म्हटले आहे, ''शिवप्रकाश हे केवळ कवी नव्हेत तर ते कालद्रष्टे आणि इतिहासकारही आहेत. त्यांची वाणी माणुसकीच्या आत्म्याला जागे करते. त्यांनी कवितेच्या एकाच एका रूपाशी स्वत:ला बांधून घेतले नाही म्हणूनच विविध प्रकारचा वाचक त्यांच्याकडे वळला. जगभराच्या भ्रमंतीतून लोकज्ञान मिळवल्यामुळे त्यांचे लेखन लोकमानसाचे प्रतिनिधित्व करते.''


**- मालती हेगडे**
धारवाड
भ्रमणध्वनी : ९९८६१४०६३९


(या लेखासाठी राजेश्वरी जोशी यांचे विशेष सहकार्य लाभले.)

# जगायचं कशासाठी?

## डॉ. रावसाहेब कसबे

१९३० पूर्वी चातुर्वण्य मानणारा मोहनदास करमचंद गांधी जसा घडत गेला तसा जर तो घडत गेला नसता तर तो महात्मा झालाच नसता. कर्मठ हिंदू, कर्मठ जातीयवादी, धर्मशास्त्रांचे प्रामाण्य मानणारा गांधी जो नंतर पूर्णपणे जातिभेदांविरोधात उभा राहिलेला, सेक्युलर असा जगाला दिसतो तो घडवण्यात आंबेडकरांचा वाटा मोठा आहे.

**आ**पण जगतो कशासाठी? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाला मिळेलच असे नाही. माणसाचे जगात येणे आणि इथून निघून जाणे हे त्याच्या हाती नाही. त्याने कुणाच्या पोटी जन्म घ्यावा आणि कधी मरावे हे त्याच्या हाती नाही. आपल्या हाती आहे तो आल्यापासून जाईपर्यंतचा अगदी छोटा काळ! या दरम्यान जगण्याची दुर्दम्य इच्छा आणि मृत्यूची टांगती तलवार यात माणूस घुटमळत राहतो. धर्म आणि देव हा या मृत्यूच्या दुःखातून बाजूला सरकण्यासाठी केलेला बहाणा आहे आणि यातून मनुष्यजात वाचण्याऐवजी नष्ट होण्याची शक्यता जास्त आहे, असा धार्मिक संघर्ष आज आपण निर्माण करून ठेवला आहे.

१९२० चे दशक हे डॉ. बाबासाहेबांच्या चळवळींचे दशक होते. बाबासाहेब म्हणत, ''कुठल्याच धर्मात जात व अस्पृश्यता ही भानगड नाही. हिंदूंच्या मंदिरात मात्र काहींना प्रवेश आहे आणि काहींना नाही. हिंदूंना जे अधिकार आहेत ते माझ्या समाजाला नाहीत. मंदिरात प्रवेश नाही. सार्वजनिक ठिकाणी पाणी पिऊ देत नाहीत. सत्तेच्या स्थानांपासून माझ्या समाजाला दूर ठेवले जाते. हे सगळे काय आहे?''

१४ ऑक्टोबर १९३५ रोजी येवले मुक्कामी बाबासाहेबांनी घोषणा केली, ''मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.'' यावर गांधीजींची पहिलीच प्रतिक्रिया अशी होती की, ''धर्म हा कपड्यासारखा नसतो की तो कुणीही वाटेल तेव्हा काढून टाकावा वा बदलून टाकावा.'' गांधीजींना समजून घेणं यासारखी अवघड गोष्ट नाही. गांधीजी अतिशय धर्मनिष्ठ, अत्यंत कडवे वैष्णव! चातुर्वण्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. जातिसंस्थेवर देखील प्रारंभी त्यांचा विश्वास होताच मात्र अस्पृश्यतेस त्यांचा विरोध होता हेही खरे.


गांधीजींना समजून घेणे म्हणजे त्यांच्यातल्या परिवर्तनाला समजून घेणे होय. काल एखादी गोष्ट ते बोलले आणि तीच गोष्ट नंतर चुकीची वाटली तर गांधीजी तिची कबुलीही देऊन टाकत. महापुरुष तेच होतात जे स्वतःला घडवत जातात. गांधीजी असे उत्क्रांत होत जाणारे, स्वतःला घडवत जाणारे महापुरुष होते.

या देशाकरता गांधीजींनी ३ स्वप्ने पाहिली- (१) हिंदू-मुस्लिम ऐक्य, (२) अस्पृश्यता निवारण, (३) या देशातील कुटीर उद्योगांची वाढ, पण तरी गांधीजींचे प्रारंभिक वृत्तपत्रीय लेख पाहिले तर लक्षात येते की या देशातली वर्णव्यवस्था नष्ट व्हावी असे त्यांना वाटत नव्हते. १९३० पूर्वी चातुर्वण्य मानणारा मोहनदास करमचंद गांधी जसा घडत गेला तसा जर तो घडत गेला नसता तर तो महात्मा झालाच नसता.

कर्मठ हिंदू, कर्मठ जातीयवादी, धर्मशास्त्रांचे प्रामाण्य मानणारा गांधी जो नंतर पूर्णपणे जातिभेदांविरोधात उभा राहिलेला, सेक्युलर असा जगाला दिसतो तो घडवण्यात आंबेडकरांचा वाटा मोठा आहे.

जातीपाती दूर करायच्या तर आंतरजातीय विवाह झाले पाहिजेत हे सूत्र आंबेडकरांनी मांडले. प्रेमविवाहांना पाठिंबा देणारे पहिले नाव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. जी संस्कृती समाजातील स्त्रियांना, अर्थात समाजातील अर्ध्या समूहाला शिक्षण देण्याचा अधिकार देत नाही ती संस्कृती की विकृती? असा प्रश्न त्यांनी विचारला. ''जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य जो धर्म देत नाही, जो जातिभेदाचे संस्कार देतो त्याच्यापासून दूर राहा'', असे बाबासाहेबांनी सांगितले आणि पुढे १९४० नंतर गांधीजींनी जाहीर केले की इथून पुढे त्याच लग्नांना हजर राहीन जी लग्ने आंतरजातीय असतील. कुणी केला हा बदल?

१९३५ नंतर गांधीजींनी 'हरिजन सेवक संघ' काढला व ठक्करबाप्पांना कामाला लावले. नाशिकच्या गद्रे यांना सहभोजनांचे कार्यक्रम घ्यायला लावले. अस्पृश्यता हा या देशाचा राष्ट्रीय प्रश्न झाला. बाबासाहेबांच्या एका धर्मांतराच्या घोषणेने हे घडले आणि यानंतर हिंदू धर्माचे जे प्रबोधन झाले त्यात बाबासाहेबांची भूमिका मोठी होती. या दृष्टीने पुढे गाडगेबाबांनी फार मोठे योगदान दिले. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर गाडगेबाबांनीही या जगाचा लवकरच निरोप घेतला.





सबंध जगाची पुनर्रचना करण्याचे तत्त्वज्ञान बाबासाहेबांचा धम्म सांगतो. त्यात पुनर्जन्माची साखळी नाही. हा धम्म ईहवादी दृष्टिकोन मांडतो. बाबांचा बुद्ध हा पूर्ण समाजवादी बुद्ध आहे. 'Budha & His Dhamma' या ग्रंथात अशी गोष्ट येते की बुद्धाने शेतात कष्ट करणारा माणूस पाहिला आणि आईला प्रश्न विचारला, ''हा माणूस किती कष्ट करतो आहे. मग त्याची फळे कोण खातो?'' आई उत्तर देते, ''त्याची फळे जमीनमालक खातो.'' बुद्धाच्या तोंडच्या या वाक्याचा संदर्भ त्रिपिटकात सापडत नाही. बाबासाहेबांचा बुद्ध वेगळा आहे. तो व्यवस्थेच्या विरोधात उभा राहणारा आहे. धर्म हे विश्व कसे आहे ते सांगतो तर धम्म हे विश्व कसे बदलायचे ते सांगतो.

हिंदू धर्म सोडून बौद्ध धम्म स्वीकारायचा निर्णय बाबासाहेबांनी घेतला आणि नंतर बनारस विश्वविद्यापीठात दंगा सुरू झाला. त्यावेळी तिथे डॉ. राधाकृष्णन् कुलगुरू होते. त्यांनी प्रत्यक्ष बाबासाहेबांनाच तिथे बोलावले. विद्यार्थ्यांच्या घोषणा सुरूच होत्या तेव्हा बाबासाहेब त्यांना म्हणाले, ''हा पारंपरिक बौद्ध धर्म नाही. हा 'नवयान' धम्म आहे. यात ईश्वर नाही. कर्मकांड नाही. हा धर्मनिरपेक्षतेवर आधारित आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये जपणारा आहे.''

बाबासाहेबांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला, ''जर मनुस्मृती श्रेष्ठ असेल तर धर्मशास्त्रात स्वातंत्र्य, समता, बंधुता का नाही? समाजात जातिभेद का? समाजाचा अर्धा घटक असलेल्या स्त्रियांना मनुस्मृतीने का बदनाम केले? राज्यघटनेत मी मांडलेल्या मूल्यांचा मागमूसही मनुस्मृतीत का नाही? तुम्ही स्वप्न पहाल तसाच देश घडेल. एका काखेत मनुस्मृती आणि दुसऱ्या काखेत राज्यघटना घेऊन तुम्हाला इथून पुढचा प्रवास करता येणार नाही.''

अजूनही आपला निर्णय होत नाही. आपण दोन्ही गोष्टी काखेत घेऊन चाललोय. जेव्हा हा निर्णय होईल तेव्हा भारतात क्रांती तरी होईल किंवा प्रतिक्रांती!

आज आपण एसी रूममध्ये बसून मुलांच्या भवितव्याचा विचार करतो. भ्रष्टाचार स्पर्धेतून येतो आणि स्पर्धा भांडवलशाहीतून निर्माण होते. पैसे कमवायच्या शर्यतीत आज आपण रेसचा घोडा होऊन धावतो आहोत. आपण इतक्या वेगाने धावतो आहोत की आपण आपले माणूसपणही गमावले आहे. ते कमवायचे तर समाजव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन झाले पाहिजे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर आधारित चळवळ उभी राहिली पाहिजे.

जगण्याचे प्रयोजन काय? हा प्रश्न मी सुरुवातीला विचारला होता. इतर प्राणी जगण्याकरता जगतात पण माणूस जगण्याला अर्थ देण्यासाठी जगतो. तो जगण्याला केवळ अर्थच देत नाही तर जगणे अतिशय सुंदर करतो. रंगांनी नटवतो, सजवतो. मग त्याच्या मनात मृत्यूची भीती राहत नाही. त्याला ईश्वर व धर्माची आवश्यकता वाटत नाही. तो आतून माणूस बनतो. मृत्यूचा सहज स्वीकार करतो.

(अमर हिंद मंडळ, दादर येथील वसंत व्याख्यानमालेतील व्याख्यानाचा अंश, २८ एप्रिल २०१७)

– **डॉ. रावसाहेब कसबे**
भ्रमणध्वनी : ९८५०५४७५७८

# मी आणि माझी कविता

**विनायक येवले**

> कविता क्षणभर विरंगुळा म्हणून लिहिली जात नाही. तो एक अनिवार्य हस्तक्षेप असून समन्यायासाठी केलेली भूमिकानिष्ठ कृती आहे असे मी मानतो.

**बो**लणे-लिहिणे ही जशी व्यक्तीची जैविक गरज आहे, तशीच त्या बोलण्या-लिहिण्याची एक रेषा सामाजिक जाणिवांनाही स्पर्शून जाते. जी आपले सत्त्व जपणारी, एक माणूस म्हणून भरणपोषण करणारी असते. अस्तित्वाचे अनवट कंगोरे उलगडून जगण्याच्या धडपडीला ती आकार देते. सन्मानाने जगण्यासाठीचे स्रोत आणि मार्ग निर्धारित करते. कविता लिहिणे ही अजून पुढची पायरी आहे. कविता क्षणभर विरंगुळा म्हणून लिहिली जात नाही. तो एक अनिवार्य हस्तक्षेप असून समन्यायासाठी केलेली भूमिकानिष्ठ कृती आहे असे मी मानतो. कविता जाणिवांचे उत्खनन करते आणि तिच्यातूनच आपले सामाजिक अस्तित्व ठळक होत राहते. कविता लेखनाच्या मुळाशी सामाजिक उत्तरदायित्वाचा अंश अपरिहार्यपणे विरघळलेला असतो. कुठलाही संवेदनशील माणूस स्वतःसहित भोवतालाला समजून घेण्याचा प्रयत्न करतो. मला स्वतःकडे जाण्याचा मार्ग कवितेने दाखवला शिवाय ती मला शोषित, अभावग्रस्तांच्या दारातही जाणिवेने घेऊन गेली. मला कवितेने एक विधायक उच्चार दिला जो मला माझ्या माणूस असण्याकडे घेऊन जाणारा होता. म्हणूनच माणसामाणसात संवादसेतू बांधणारी कविता मला अधिक जवळची वाटत आली आहे. त्यातूनच कवितेचं बोट धरून आत्मशोधाची वाट चोखाळणारा माझ्यातला माणूस उत्तरोत्तर समृद्ध होत गेला. हीच माझी सगळ्यात मोठी उपलब्धी आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते.

एक व्यक्ती म्हणून आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडणारा एक लेखक म्हणून जे काही अंतर्बाह्य दाब असतात ते आतले आणि बाहेरचे दाब कविता लिहिण्यासाठी मला प्रेरित करतात. जागोजागी आकर्षक चकवे असलेल्या आजच्या काळात मला कवितेचा आधार मोलाचा वाटतो. स्वप्नांचा गर्भपात घडवून आणणारा वेताळ काळ मानगुटी बसलेला असताना, कविताच शाश्वत आधार वाटत आली आहे. आजचे समाजपर्यावरण प्रचंड विरोधाभासाने, भयावहतेने व्यापलेले असताना भूमिका घेऊन बोलणे-लिहिणे धाडसाचेच ठरत आहे. विचार दुय्यम ठरवले जाऊन पैसा व प्रतिष्ठेची भाषा मुजोर बनत आहे. जातीय, धार्मिक अस्मितांच्या नावाखाली कृत्रिम तापमानवाढीचे सूत्र समाजमनावर बिंबवून हिंसेला प्रवृत्त करणाऱ्या शक्ती सर्वत्र सक्रिय झाल्या आहेत. या विध्वंसक मानसिक तापमानवाढीचा खोलवर परिणाम समाजमनावर आणि त्यांच्या दैनंदिन जगण्यावर होताना दिसतो. अशावेळी त्याची निश्चित अशी कारणमीमांसा करणेही कठीण होऊन बसते. गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या सामान्य माणसांच्या कृती आणि दैनंदिन व्यवहारांना नियंत्रित करणाऱ्या, जखडून टाकणाऱ्या राजकारणाच्या मोहक शाखा प्रभावी ठरत असताना लेखक, कवींनी आपली लेखणी शस्त्रासारखी परजावी असे मला वाटते. सामाजिक उत्तरदायित्वाचा जयघोष करताना फसव्या मुखवट्यांना उघड करून शोषित, वंचित, अभावग्रस्तांच्या बाजूने ठाम उभे राहण्याला कवींनी, लेखकांनी प्राधान्यक्रम द्यायला हवा. निसर्गाच्या कृत्रिम वर्णनांच्या बोन्साय मानसिकतेत आणि आत्मकोषाचे पापुद्रे उकलण्यात रममाण होणारा कवी, लेखक आवश्यक ती सामाजिक भूमिका पार पाडू शकत नाही. आत्मलुब्धतेच्या खुरट्या मानसिकतेतून बाहेर पडून भोवतालाकडे तटस्थ नजरेने पाहणे गरजेचे आहे.

आज सभोवताल निरनिराळ्या व्याधींनी ग्रासलेला आहे. दुष्काळ, सरकारची धोरणं शेतकऱ्यांच्या गळ्याभोवतीचा फास अजून घट्ट करताहेत. अस्मितांच्या नावाखाली तीव्र केले जाणारे जातीय, धार्मिक संघर्ष, सत्ताधारी राजकीय पुढाऱ्यांची या अनागोंदीला असलेली गुप्त फूस, जातीय वर्चस्वातून घडवून आणले जाणारे शक्तिप्रदर्शन मेळावे, सामान्यांच्या डोळ्यांत धूळ फेकून गैरमार्गाने लाटली जाणारी धनमाया, कायमस्वरूपी समस्या निराकरणाऐवजी तात्कालिक उपचारांचे पळसपान सामान्यांच्या तोंडाला फासणारे सत्ताकारण, समाजमाध्यमांचे राजकीय आखाड्याशी असलेले सख्य, स्त्रियांवरील बलात्कार आणि त्यांचे शोषण, या सर्व सामाजिक, राजकीय गोंधळाचे आणि भौतिक सुखाच्या पाठीमागे धावणाऱ्या पांढरपेशांच्या नैतिक अधःपतनाचे वास्तव अधोरेखित करण्याचे कर्तव्य कवी, लेखकाने निष्ठेने पार पाडायला हवे. मी आणि माझी कविता त्यासाठी सदैव कटिबद्ध आहे.

**॥ नवी दवंडी ॥**

मी भगवा टिळा लावला
मला रामनामवाले भेटले
मी निळा सदरा घातला
जयभीमवाल्यांच्या कळपात
माझी वर्णी लागली
मी हिरवा पोषाख पहेनला
मला आदाब अर्ज मिळाला
मी पांढरा रंग चढविला अंगावर
मला गॉड जिझस मिळाला
मी पिवळ्या रंगाची
पगडी बांधून पाहिली
मला जय सतश्री अकाल मिळाला
रंगात धुंद अस्मितांची वटवाघळं
मेंदूच्या पेशीपेशींना लटकलेली
थकलो, पाय गळाले,
घसा कोरडाठाक पडला
डोळे विझत गेले
पाणी प्यावे तर पाण्यालाही
रंगवाद्यांनी करणी केलीय
या रंगांवर मालकी सांगणारे बुजगावणे
भेटत राहिले सगळीकडेच
माणूस म्हणून हात दाखवणारा
तोंडी लावायलाही गवसला नाही
सगळेच रस्ते दुतर्फा रंगून
गेलेत चिरकाळीच्या रंगांनी
सगळ्यांच्या डोक्यात साचत चाललीये
अस्मितेची हिंसक शाई
प्रत्येकजण लिहितोय इथे
आपापल्या जात, धर्माची रुबाई
रांगणारे हुंदके पोचतच
नाहीत कानांपर्यंत
कुठल्या रंगाची कुपी
माणसाचं चित्र रेखाटेल बरं?
ज्याचा रंग अंगोपांगी लावून घेता येईल
असा कुठं भेटेल माणूस ?
तो भेटावा या अपेक्षेने उंबरठे झिजवतोय
शहर, गाव, वाडीवस्ती धुंडाळतोय
या रंगांवर मालकीहक्क न सांगणारा जोपर्यंत भेटणार नाही, तोपर्यंत माणूस नावाची प्रजाती पृथ्वीवरुन लुप्त झालीये अशी दवंडी पिटावी म्हणतोय.

**॥ ओढली नाही एकही रेष ॥**

बाईच्या दुःखाची त्याने
हुबेहूब कविता लिहिली
बाईच्या अस्तित्वाला
विहिरीची उपमा बहाल केली
तिच्या तळखोलात डुबकी
घेऊन कडेकपारी धुंडाळल्या
डुबकीगणिक तिच्या भोगवट्याचे सांगाडे
काढत राहिला शब्दांचे गळ टाकून
शब्दांनीच मोळ्या बांधीत राहिला
तिच्या मूक वेदनांच्या
बाईच्या सोसण्याला त्याने भूमी संबोधले
तिच्या भेगाळल्या आयुष्याला
जबाबदार आकाशीच्या सूर्याला दूषणं दिली
उपमान-उपमेयादी अलंकारांनी
तिच्या सर्जकतेचा उदोउदो केला
तिसऱ्या स्त्री गर्भाचा
निर्ममपणे गळा घोटल्याचा
इतिहास उमटला नाही
त्याच्या दगडी डोळ्यांत...
तिच्या कष्टण्याला मुंगीच्या
रूपकात बांधले त्याने
कुटुंबासाठी झिजण्याला
चंदनाच्या प्रतिमेत गुंफले
तिच्या ममतेला गाईच्या
डोळ्यातल्या कारुण्यात तोलले
पृथ्वीशी नाते जोडून
तिचे हृदय विशाल असल्याचे नोंदवले...
नदीच्या मिथकात तंतोतंत बसवून
ती निर्मळ असल्याचे दाखले दिले
इतिहासाचा संदर्भ देऊन
तिच्यातले गूढ देवत्व शोधले
संस्कृतीची आधारशिला म्हणून
गौरविले तिला
तिच्या घुसमटीने तो मनोमन
ठिबकत राहिला कविताभर
काल बायकोच्या पाठीवर उमटवलेले
वळ मात्र तो सपशेल विसरून गेला
तिच्या दिसण्यापासून
असण्यापर्यंत सगळ्या शक्यता
तपासल्या त्याने मुळाबर
तिच्या अंतःस्तराच्या
लुप्त भुयारांची वर्णनं
केली यथायोग्य
पण तिच्या `माणूस' असण्याची
एकही रेष ओढता आली नाही
त्याला सबंध कवितेत.

**- विनायक येवले**
भ्रमणध्वनी : ९०९६९९९८६५
yewalevinayakgmail.com

# संजय पवार यांच्या एकांकिका एक दृष्टिक्षेप

डॉ. माणिक माधव बागले

लेखन, दिग्दर्शन, चित्रकला, जाहिरात, सामाजिक चळवळी अशा विविध क्षेत्रात स्वत:ची ओळख निर्माण करणारे महत्त्वाचे नाव संजय पवार. त्यांनी त्यांच्या नाट्यलेखनाचा प्रारंभ एकांकिका लेखनाने केला. एकांकिका लेखनाला कोणत्याही विषयाचे वावडे नसते. ती काव्यमय, चर्चात्मक, तत्त्वचिंतनपर, प्रहसनात्मक किंवा रहस्यकथेसारखी असू शकते. अशा एकांकिका या साहित्यप्रकाराच्या विविध शक्यता संजय पवार यांच्या लेखणीने आजमावल्या. सामाजिक वास्तवावर कधी तिरकस भाष्य करत तर कधी अंतर्मुख करत त्यांच्या एकांकिका तुमच्या-आमच्याशी सहज संवाद साधतात. मानवकेंद्री भूमिका घेत वास्तवाला निर्भीडपणे भिडतात.

संजय पवार यांच्या 'चाळ कमेटी' या एकांकिकेतील कमेटी म्हणजे सदस्यांनी विचारविनिमय चर्चा करण्यासाठी, मते मांडण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी तयार झालेली आहे. 'चाळ कमेटी' औपचारिकरित्या तयार झालेली नसूनही नित्यनियमाने संडासाबाहेर भेटणारी माणसे आहेत. चाळीतील माणसांची समस्या म्हणजे एवढ्या मोठ्या चाळीला फक्त दोनच संडास. बदलत्या जीवनशैलीनुसार प्रत्येकाला घाई, रोज त्याच चर्चा, निर्णय काहीच नाही. फक्त एकमेकांत कुरकुर करावी आणि चूप राहावे. अशा मनस्थितीतील माणसांची समस्या प्रामुख्याने प्रस्तुत एकांकिकेत मांडली आहे.

बदलत्या काळानुसार मुंबईसारख्या शहरात गगनचुंबी टॉवर्स उभे राहतात. तरी महानगरातील चाळी आणि त्यांच्या समस्या कधीच संपणार नाहीत. असंघटित चाळकरींची 'कमेटी' ही संडासपुढील रांगेपुरतीच मर्यादित असणार हे कटू सत्य संजय पवार 'चाळ कमेटी' या एकांकिकेतून मांडतात. चाळीचा मालक शेठ असूनही चाळीला सुविधा पुरविण्याची त्याला इच्छा नसते. घर आणि माणसं यांच्या हिशेबात संडास नेहमी कमी असतात. म्हणून तेथील व्यक्ती वैतागलेल्या स्थितीत असतात. समाजातील कनिष्ठ मध्यमवर्गीय चाळीत राहतात. उद्योग व नोकरीच्या व्यापामुळे संघटना आणि संघर्ष त्यांच्या मनोवृत्तीतच नाही. संडासबाहेर ताटकळत रांगेत उभे राहून शिवराळ भाषेत त्यांचा एकमेकांवरचा राग व्यक्त होत असतो, त्यापलीकडे त्यांची धाव नाही. बदलत्या जीवनशैलीशी हा समाज निगडित असल्याने सकाळचा नैसर्गिक विधी आटोपला की, पोटाची खळगी भरण्याचा संघर्ष सुरू होतो.

'पांडुरंग' या एकांकिकेत मध्यमवर्गीय कौटुंबिक संघर्ष आहे. दोन पिढ्यांतील अंतर आणि बदलत्या आर्थिक परिस्थितीतून निर्माण होणारे नैराश्य या एकांकिकेत पवार यांनी पकडले आहे पांडुरंगचे वडील नारायणराव साठीच्या वयात आहेत. पोस्ट ऑफिसच्या नोकरीतली निवृत्ती जवळ आलेली. अशा वेळी मुलाने स्वत:च्या पायावर उभे राहावे ही स्वाभाविक अपेक्षा प्रत्येक मुलाच्या बापाची असते. त्यांचे आयुष्य मुळात कष्टाचे, कारण वयाच्या सोळाव्या वर्षापासून पोस्टाच्या कमी पगाराच्या नोकरीत राहून संसार उभा केलेला. मुलगा वय वर्षे पंचवीसमध्ये पोहोचलेला, तरीही सातव्यांदा परीक्षेत नापास होतो.

मुलाचा जन्म एकादशीला झाला, म्हणून पाच बारकन्यांना जेवण घालून मुलाचे नाव 'पांडुरंग' ठेवले. त्याने शिक्षण घेऊन मोठं व्हावं ही धडपड करूनही नारायणराव अपयशी ठरले. पांडुरंगच्या वृत्ती-प्रवृत्ती, उपद्रवी आहेत. टवाळ, व्यसनी, टारगट, असंस्कृत मुलांच्या सोबत त्याचेही संस्कार पुसले गेले आहेत. त्याची भाषा शिवराळ, उद्धट आणि निर्लज्ज आहे. बापावर पोलीस केस करण्याची तो धमकी देतो, बापाविषयीचा आदर, प्रेम, जिव्हाळा, कणव, ऋण या गोष्टी त्याच्या खिजगणतीत नाहीत. बाप मुलांच्या भांडणात जिची कुतरओढ होते, ती पांडुरंगची आई पुत्रप्रेमामुळे दोघांत समन्वय घडवण्याचा आटोकाट प्रयत्न करते. नारायणरावांसारखे तिला कठोर होणे शक्य नाही. बाप-मुलातील संघर्षाचे बीज नारायणरावांच्या विचारात आहे. सर्वसामान्य मध्यम वर्गीयाचे एकमेव स्वप्न म्हणजे मुलाने पदवीधर होणे. पदवीधर झालेला मुलगाच यशस्वी होऊ शकतो. असा त्यांचा समज आहे. मुलाची आवड-निवड या गोष्टीला त्यांच्या विचारात स्थान नाही. पांडुरंगला नाटकात काम करायला आवडते त्याने नाट्यस्पर्धेत बक्षीस मिळवले. त्याचे कॉलेजात कौतुक झाले. नारायणरावांनी मात्र त्याला सुनावले, ''आधी नीट शिका! मग नाटक करा.'' नारायणराव व पांडुरंग यांच्यात संघर्ष नसून परिस्थितीतून निर्माण

झालेला दुरावा आहे.

दोन पिढ्यांतील अंतर अधोरेखित करणारी आणखी एक एकांकिका म्हणजे 'बाप बिप बाप'. कुटुंबसंस्था, कुटुंबप्रमुखाचे स्थान, आशा-आकांक्षा, यातून रक्ताच्या नात्यात येणारा दुरावा, एकेमकांच्या भावना समजून घेण्यातील अपयश अशा अंगांनी या एकांकिकेतले नाट्य घडत जाते. थोडक्यात, 'जेव्हा जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' तसे 'बाप झाल्याशिवाय बापाला समजून घेणे अवघड.' दुसऱ्याच्या भूमिकेत जाऊन त्याला समजून घेतले तर मानवी नात्यांमधला संघर्ष टळू शकतो ही जाणीव या एकांकिकेतून सूचित होते.

'अल्झायमर्स' ह्या एकांकिकेचा विषय इतर एकांकिकेपेक्षा वेगळा आहे. रिनाला अल्झायमरचा अटॅक आल्यानंतरचे संभाषण, रिनाचा शेवटचा अटॅक, तिच्या होणाऱ्या यातना हृदय पिळवटून टाकतात. कथानकाची पार्श्वभूमी देखील वेगळी म्हणजे सिनेमाक्षेत्राची आहे. सिनेमाक्षेत्रातील ग्लॅमर, भपकेबाजपणा वास्तव चित्रण या एकांकिकेत आहे. पुरुषविरहित एकांकिका असा उल्लेख असला तरी कथानकात शीलादेवीचा पती व रिनाचे वडील सुरेशचा उल्लेख आहे. शीलादेवीच्या आयुष्यात घडलेल्या घटनांना व रिनाच्या मानसिक-शारीरिक परिस्थितीला पुरुष आणि पुरुषी वृत्ती जबाबदार आहे.

१९४८ साली दंगलीत उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबाची कथा '४८ पानांची दीड मीटर कहाणी' या एकांकिकेत आली आहे. एकांकिकेचे शीर्षक वैशिष्ट्यपूर्ण आहे. दिगंबर भट हा कापड दुकानात काम करतो म्हणून दीड मीटर शब्दाचा उपयोग केला आहे. खेरीज दीड मीटर कापड आपल्या देहासाठी लागते म्हणून दीड मीटर! दिगंबराचे वय वर्षे ४८ वर्षे आणि प्रत्येक वर्षाचे एक पान असे दिगंबरचे एक मीटर आयुष्य तर त्याच्या मुलीचे अर्धामीटर आयुष्य, अशी ही बाप-मुलीची कहाणी. व्यभिचार आणि व्यसनातून अध:पतन आणि शेवटी दारुण शोकांतिका असे या एकांकिकेचे स्वरूप आहे.

हिंदू-मुस्लिम तणाव, हिंसा, अहिंसेची चर्चा '१९४७ ते एके ४७' या एकांकिकेत येते. १९४७ हे वर्ष सुवर्णाक्षरांनी नोंदवले गेले. देशाला स्वातंत्र्य मिळून सत्तेचं हस्तांतर झाले. इंग्रजांच्या हातातली सत्ता जाऊन काळ्या भांडवलदारांच्या हाती आली. स्वातंत्र्यानंतर येथील समाज सुखाने नांदेल, सर्वत्र सुखशांती येईल, अशी अपेक्षा प्रत्येकाने मनात बाळगली होती. मात्र देशातील स्वार्थी संकुचित राजकारणाने जनसामान्यांच्या आशा-आकांक्षांना लवकरच सुरुंग लावला. सत्तेचं पान कायमस्वरूपी आपल्याच हाती राहावं यासाठी गोरगरीब जनतेचे गटागटात विभाजन केले गेले. ते कधीच एकत्र येणार नाहीत याची कायमस्वरूपी तरतूद केली गेली.

'१९४७ ते एके ४७' या एकांकिकेचे शीर्षक आकर्षक, सूचक आणि आशयाला पूरक असून उत्सुकता वाढवणारे आहे. प्रस्तुत एकांकिकेत संजय पवार यांनी समाजाच्या कोणत्या दु:खाच्या भागावर बोट ठेवले आहे आणि समाजाच्या कोणत्या समस्येवर भाष्य केले आहे याची उत्कंठा वाढविणारे हे शीर्षक आहे. निर्मला भावे नामक डेडिकेटेड सोशल वर्कर आणि गांधीवादी विचारसरणीच्या महिलेचे घर आणि रात्रीच्या वेळी तेथे अचानक आलेला अनाहूत पाहुणा. एक अहिंसावादी महिला तर अलिप्त पाहुणा हिंसावादी. एक शांत, अविचल तर दुसरा अशांत. हातात एके ४७ असूनही असुरक्षित. एक माणूस तर दुसरा सैतान!


भारतीय समाजात धर्माच्या, जातीच्या, प्रांताच्या, भाषिक अस्मितेच्या नावाखाली कायम विद्वेषाची आग पेटत ठेवली गेली. विकासाचं सर्वसामान्यांच्या हिताचं राजकारण सोयीस्करपणे बाजूला सारत धर्म, जातीचं, स्वार्थी राजकारण सुरू झाले. ही एकांकिका या समकालीन भीषण समाजवास्तवाची प्रखरपणे जाणीव करून देते. हिंदू-मुस्लिम संघर्ष हे येथील एक कटू पण न नाकरता येणारं समाजवास्तव आहे. स्वातंत्र्याची ७० वर्ष साजरी केल्यानंतरही हिंदू-मुस्लिमांमधील ही संघर्षाची दरी बुजवण्यात आपण अपयशी ठरलो आहोत. काही मूठभर समाजवादी, गांधीवादी विचारसरणीवर निष्ठा असणाऱ्यांनी समाजवास्तव बदलण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला. एकांकिकेतील विनायक पटवर्धन हा राजकारणाचा बळी ठरलेला आहे. मुस्लिम समाजाविषयी त्याच्या मनात विष पेरले गेले आहे. मुस्लिमांमुळे देशांत अशांतता आहे. त्यांचा खातमा केल्याशिवाय देश सुखी होणार नाही अशी त्याची भावना आहे. शिवाय या मुस्लिमांना राजकारणी पाठीशी घालतात असेही तो म्हणतो. निर्मलाताईच्या गांधीवादी व अहिंसावादी विचारांनी हिंसक विचाराच्या या तरुणात परिवर्तन होते, अशी मांडणी या एकांकिकेतून केली आहे.

'फ्लाईंग क्वीन' या एकांकिकेत संजय पवार यांनी 'स्त्रीचे समाजातील स्थान' हा मध्यवर्ती विषय घेऊन स्त्रीजीवनाची कहाणी अत्यंत मार्मिकपणे चितारली आहे. गौरी, सानिया, उर्मिला या मध्यमवर्गातील स्त्रिया आहेत. एकांकिकेचं शीर्षक समर्पक व सांकेतिक आहे. पंचतारांकित हॉटेलमध्ये माशा कशा असणार? लेखकाने माशी या पात्राचा प्रतीकात्मक उपयोग करून घेतला आहे. माशी आणि एकांकिकेतील स्त्री, पुरुष पात्रे यांच्यात एक समान प्रवृत्ती आहे. ती म्हणजे चंचलता. एका जागी स्थिर न राहणे, सदैव घोंघावत राहणे. साध्या माशांमध्ये राणीमाशी नसते, तरीही लेखकाने शीर्षकात 'क्वीन्स' हा शब्दप्रयोग सहेतुकपणे केला आहे.

एकांकिकेतील स्त्रियांनी सामान्यपणे संसार केला आहे. जीवन जगल्या आहेत, प्रपंच अनुभवला आहे. परंतु एक ना अनेक कारणांनी उबग येऊन त्यांनी विवाहबंधनातून सुटका करून घेतली आहे. मुक्त जगण्याची सुप्त इच्छा पूर्ण करण्याची धडपड करून त्यांना आनंद व सुख शोधायचे आहे परंतु भूतकाळातून पूर्ण बाहेर पडणे त्यांना शक्य होत नाही कारण स्त्रीसुलभ भावना त्यांना तसे करू देत नाहीत. पंचतारांकित विश्व खरे तर त्यांचे नाही. त्यांच्या वागण्यात, बोलण्यात अतिरेकी बंडखोरी असली तरी दारुच्या प्याल्यात बुडून मेलेल्या माशीसारखी त्यांची बंडखोरी संपूनही जाईल. पुरुषी अहंकार, स्त्रियांची छेड काढणाऱ्यांविषयी

राग, स्वकेंद्रित पुरुष, स्त्री कमावती असली, उच्चशिक्षित असली, तरी तिचे दुय्यम स्थान, तिच्या भावभावनांकडे-अपेक्षांकडे दुर्लक्ष. यामुळे माशांचे घोंघावणे जसे अखंड असते. तसे या स्त्रियांचे आतल्या आत धुमसणे सुरू असते.

'ऐन आषाढात पंढरपुरात' एकांकिकेत समाज, अध्यात्म, धर्मव्यवस्था हे घटक केंद्रस्थानी आहेत. यावरून आषाढात फक्त विठ्ठल, चोखोबाला भेटण्याची आस्था भक्तांना वाटते. समाजातील राजकीय व्यवस्थेचेही तेच आहे. ज्यावेळी मतांचे राजकारण होते. तेव्हाच राजकीय नेत्यांना जाग येते. म्हणून आज जी व्यवस्था राजकीय लोकांची आहे तीच अवस्था त्याकाळी देवाची होती. यामध्ये सर्वसामान्य बहुजन समाज भरडला जात होता. त्यासाठी स्वत:चं अस्तित्व चोखोबा विठ्ठलाला नाकारायला लावतो. चोखोबाने विठ्ठलाला केलेल्या प्रश्नांची उत्तरं अनुत्तरितच राहतात. समाज परिवर्तनासाठी चोखोबा विठ्ठलाला साकडे घालतो आहे. पण आजही जीवनशैली काळानुसार बदलत असताना समाजव्यवस्था मात्र तीच आहे.





'मान्यतेच्या झग्याखाली' या एकांकिकेत लेखकाने साहित्यातील-नाट्यक्षेत्रातील गढूळपणावर प्रकाश टाकत, दांभिक नैतिकतेचा बुरखा फाडला आहे. प्रायोगिक रंगभूमीचा 'मान्यतेचा झगा' घालून, कलावंत रंगभूमीवर यश, प्रतिष्ठा, लोकप्रियता प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो आहे. रंगभूमीवरील कलाकार म्हणून स्वत:वर शिक्का मारून घेण्यासाठी वाटेल ते काम करण्यासाठी तो तयार आहे. मान्यतेचा झगा मिरवून प्रसिद्धी मिळविण्यासाठी लेखक-निर्मातेही मागे नाहीत. देशी, परदेशी दौरे करायचे आहेत आणि आपल्या अंगावर मान्यतेचा झगा घालून त्यांना फिरायचे आहे. म्हणून एकांकिकेतील रघू म्हणतो, ''माफ करा देशमुख, पण आजकाल त्यालाच डिमांड आहे. नाटकाचे प्रयोग आपल्या देशात कमी झाले तरी चालतील पण परदेशात प्रयोग व्हायला पाहिजेत! मग रंगभूमी तुमच्याकडे आदराने पाहते! वयाची सत्तर वर्षे, गावोगाव भटकत बारा गावचे पाणी, मिसळ खात, ढेकणांनी भरलेल्या लॉजवर रात्र काढत शरदराव, निळूभाऊ नाहीतर बापूसाहेब यांच्यासारखी माणसं आजही रस्त्यावरून चालताना दिसतात. कालपरवाच स्पॉट बघितलेली पोरं, विमानाने पंचवीस देश फिरून हवेत चालताना दिसतात ना तेव्हा वाटतं यांना सांगावं, ''अरे! दुसऱ्याच्या घामानं वाढलेल्या टेस्ट ट्यूब बेबींनो, आमच्या पेशीपेशीत नांदीचा धूप आहे रे... करा, देशमुख साहेब... नाटक करा. आमच्या अंगावरचे हे रंगभूमीवरच्या खाजेने चढवलेले कपडे काढा नि तुमचा तो मान्यतेचा झगा घाला आमच्यावर, आत नागडे का असोत आम्ही'' (मान्यतेचा झगा', पृ. क्र. २०) नाट्यक्षेत्रातील हा तकलादूपणा नाटकाच्या स्वतंत्र विकासाला, प्रगल्भतेला धोकादायक आहे. हे समकालीन नाट्यक्षेत्रातील वास्तव लेखकाने सजगपणे 'मान्यतेच्या झग्याखाली' या एकांकिकेतून मांडले आहे.

''मुखवट्यांच्या जगात मुखवट्यांचीच इतकी गर्दी झाली की चेहरे सापडताना कठीण!'' असं संजय पवार यांच्या एका लेखातले वाक्य आहे. त्याची इथे आठवण होते. वेळोवेळी आपल्या भात्यातले बाण संजय पवार यांनी अचूकपणे वापरले आहेत. त्यांच्या एकांकिकाही याला अपवाद नाहीत.''

– डॉ. माणिक माधव बागले
भ्रमणध्वनी : ९४२३४०३२४६

॥ग्रंथाली ॥




**दु:खाची स्वगते – डॉ. संजय कळमकर**

सदर ग्रंथात संजय कळमकर यांनी दळवी यांच्या लेखनाचा, त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा शोध घेऊन त्याचे यथायोग्य मूल्यमापन उत्तम प्रकारे केले आहे. सोबतीने त्यांच्या लेखनाच्या कुतूहलाचे, आस्थेचे स्थानांकन आणि निर्णयन देखील तटस्थ दृष्टीतून केले आहे. दळवींच्या लेखनाची वैशिष्ट्ये- त्यांच्यातला अंधार-उजेड, दु:ख, एकाकीकरण, कामभाव, वेड अशा आस्थाविषयांसकट- समजावून घेऊन त्यांचा नेटका परामर्श संजय कळमकर यांनी इथे घेतला आहे. हा ग्रंथ साहित्याच्या अभ्यासकांसाठी दुनियेत शिरण्याचे कुतूहल वाढविणारा आहे.

**मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.**

# ललित

**दिवाळी २०१७ । ५४ वे वर्ष**

**साहित्यविश्वातील वाङ्‌मयीन घडामोडींची बित्तंबातमी देणारे**
**चोखंदळ वाचकांचे आवडते मासिक**

या अंकाचे मानकरी

**पर्यावरणीय रंगभूमी** (विलास खोले), **वसंतराव वैद्य यांची कविता** (अनंत देशमुख), **न्यूज स्टोरीचा सिक्वेल** (ह. मो. मराठे), **परीकथांच्या राज्यात** (मीना वैशंपायन), **बाशो : हायकूचा संत** (विजय पाडळकर), **भाषा : मनाचे दर्पण की फक्त अर्थकारण** (संजीवनी खेर), **पुस्तक संग्राहकांच्या कथा** (जयप्रकाश सावंत), **जीवनशैली आणि 'डिझाईन'** (दीपक घारे), **जी. ए. कुलकर्णी पुन्हा** (वसंत आबाजी डहाके), **आशयाचा अनुबंध** (मधुकर धर्मापुरीकर), **गोष्टीच्या प्रारंभाची गोष्ट** (प्रवीण दशरथ बांदेकर), **गजानन माधव मुक्तिबोध** (चंद्रकांत भोंजाळ), **आठवणी लेखकांच्या** (मिलिंद बोकील), **डॅन ब्राऊन** (विवेक गोविलकर), **विद्याव्रती दुर्गा भागवत** (अंजली कीर्तने), **पंजाबी कवी तापीर यांची कविता** (नीलिमा गुंडी), **मैत्रीचा अविस्मरणीय बंध : जोसेफ ब्रॉडस्की आणि तात्याना तोलस्ताना** (अरुण नेरूरकर), **कालिदास आणि चित्रकला** (पंकज भांबुरकर), **विस्मृतीतले वि. भि. कोलते** (रणधीर शिंदे), **अणुबॉम्बचा पिता व गीता रसज्ञ : रॉबर्ट ओपनहायमर** (डॉ. अनंत लाभसेटवार), **पुण्यस्मरण एका गांधीवाद्याचे** (श्रीराम शिधये), लीला दीक्षित आणि नंदिनी आत्मसिद्ध

**मराठी साहित्यात नागर जीवनाचे चित्रण ओसरले आहे काय? (लेखमाला)**

१९६०-७० पर्यंत मराठी साहित्यात नागर जीवनातील अनुभवांचे चित्रण मोठ्या प्रमाणात होत असे. नागर जीवनातील व्यक्ती, त्यांच्या समस्या, समकालीन प्रश्नांच्या संदर्भात व्यक्त होणाऱ्या त्यांच्या प्रतिक्रिया, सामाजिक-राजकीय पर्यावरण इत्यादी घटक त्यांच्या लेखनातून प्रगट होत. गेल्या पंचवीसेक वर्षांत नागर जीवनचित्रणाचे प्रमाण अधिकच ओसरले आहे. मराठी साहित्यात नागर जीवन साकार करणारे लेखक तुलनेने कमी कमी होत चालले आहेत.

पालटलेल्या जीवनसंदर्भात व साहित्यनिर्मितीच्या संदर्भात नागर अनुभवचित्रणाला ओहोटी का लागावी याविषयीचे मान्यवर साहित्यिकांचे चिंतनशील लेखन.

**संपादक : अशोक केशव कोठावळे**

**मुखपृष्ठ आणि सजावट : सतीश भावसार**

**पृष्ठे : अंदाजे २०० । मूल्य : १५० रुपये**

विक्रेत्यांनी आगाऊ पैसे पाठवून मागणी नोंदवावी.

**व्यवस्थापक : ललित मासिक**

३०८ फिनिक्स, ४५७ एस.व्ही.पी. रोड, गिरगाव, मुंबई-४००००४.

दूरध्वनी : २३८२६२२५/२३८७३५०२

E-mail : majesticph@gmail.com ■ lalit@majesticprakashan.com

# र.धों.च्या शारदेची लैंगिकता अजूनही बुरख्यातच!

साधना गोरे




**१५ जुलै १९२७ या दिवशी रघुनाथ धोंडो कर्वे यांनी 'समाजस्वास्थ्य' या मासिकाचा पहिला अंक काढला अन् नोव्हेंबर १९५३ ला या मासिकाचा शेवटचा अंक निघाला. ज्या लैंगिकता या विषयाला हे मासिक वाहिलेलं होतं त्याबाबतची आपल्या समाजाची समज आजच्या इंटरनेटच्या युगातही म्हणावी अशी वाढलेली दिसत नाही. या मासिकाला यंदा नव्वद वर्षं पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर काही समकालीन कलाकृतीतील अद्याप न बदललेल्या वास्तवाचा आढावा घेत र.धों.च्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व सांगणारा हा लेख...**




नुकताच लिपस्टिक अंडर माय बुरखा' पाहिला. पाहताना सतत 'विरंगी मी विमुक्त मी' या कादंबरीचे संदर्भ मनात येत राहिले, नंतरही मन त्यांतली संगती लावत राहिले. अन् ही कादंबरी वाचत असताना 'योनीच्या मनीच्या गुजगोष्टी' हे नाटक आठवत होतं. हे नाटक पाहताना त्यातले काही ठसे वैयक्तिक अनुभवांशी सहजच जोडले गेले. अन् आता या तीनही कलाकृतींचा समग्र विचार करताना लक्षात येतंय की माझं या कलाकृतीतल्या अनुभवांशी जोडलं जाणं बाई म्हणूनच होतं.

शाळेतून कॉलेजमध्ये जायला सुरुवात केल्यावर वाचायचा नाद लागला. नवंनवं ऐकायचा तर आधीच होता. पण कॉलेजच्या त्या पहिल्या काही वर्षांत स्त्रीवाद नावाचं अधनंमधनं सतत काही कानावर पडायचं, वाचनात यायचं. तेव्हा त्यातलं किती कळायचं माहीत नाही. पण माझ्यासकट माझ्या आईचं, नात्यातल्या, आजूबाजूच्या बायकांचं जगणं मी न्याहाळायला लागले. वाचनाशी ताडून पाहायला लागले. मला मुळातच मोजक्या असणाऱ्या मैत्रिणींशी त्यावर बोलत राहिले.

विद्यापीठात एम.ए. करायला लागल्यावर अर्थातच वाचनाचा जास्तच नाद लागला. स्त्रीवाद अभ्यासाला होताच. सीमॉन द बोव्हारच्या 'द सेकंड सेक्स'मधली तात्त्विकता कळायला आजूबाजूला मुबलक उदाहरणं होती. अभ्यासात असं सगळं वाचून की माझा मूळ स्वभाव म्हणून मला माझं बाईपण जिथं कुठं आड येऊ शकतं असे अनुभव घ्यायचे असं भन्नाटबिन्नाट काही मनात यायचं. त्या भन्नाटमधलं एक म्हणजे मला रात्री मुंबई हिंडायची होती. अन् आणखी एक तीव्रतेने वाटायचं, ते म्हणजे संध्याकाळी नाक्यानाक्यावर पोरांचं टोळकं खिदळतं तसं खिदळायचं होतं. दुसऱ्या भन्नाटचे प्रयोग फक्त विद्यापीठाच्या कॅम्पसमध्येच करता आले, ज्याला खरंतर वासूनाका म्हणता येणार नाही. पण पहिलं भन्नाट मी माझ्या एका मैत्रिणीला सांगितलं. अर्थात तिनं पहिल्यांदा हसून मला उडवून लावलं. माझी ही मैत्रीण गणपतीची मोठी भक्त होती. दरवर्षी गणेशोत्सवात गणपती पाहायला जायची. तिचे हे भक्तीचे किस्से तिनं मला अनेकदा सांगितले होते. मग मी तिला म्हटलं, 'आपण पण गणेशोत्सवात रात्री मुंबई फिरायला जाऊ, पण गणपती नाही पाहायचे. फक्त फिरायचं.' गणपती पाहायला घरातून परवानगी मिळणं सहज शक्य होतं. पण मैत्रिणीचं भक्तमन तिला टोचत राहिलं. म्हणाली की, 'असं कसं गणपतीच्या नावाखाली नुसतं हिंडायचं?' 'तू म्हणतेस तर पाहू एखाद-दुसरा गणपतीही!' म्हणून तिला तयार केली. आम्ही फक्त दोघीच जाणार आहोत हे अर्थातच घरी सांगितलं नाही. सगळ्या मैत्रिणी आहोत सांगितलेलं. रात्री आठ-नऊला घर सोडलेल्या आम्ही सकाळी सहा वाजता घरी आलो. अर्थात मला ज्याप्रकारे मुंबई फिरायची होती, तशी जरी फिरता आली नाही, तरी गणपतीच्या झगमगाटात आम्ही जमेल तसं फिरलो. नंतर आठवडाभर आई गाल फुगवून बसली. असं रात्री हिंडून आम्ही विशेष काहीच केलं नाही. पण ती रात्र आमच्यासाठी अविस्मरणीय होती.

खरंतर वर उल्लेख केलेल्या बाईपणाशी निगडित तीनही कलाकृती मला वाटलेल्या या साध्यासुध्या भन्नाटबद्दल नाहीतच, तर त्या बाईचं लैंगिक जग भन्नाट मांडणाऱ्या आहेत. पण बाईनं कुठे, कधी, कसं, कुणाबरोबर काय करायचं यविषयी जिथंतिथं एवढी बंधनं असताना तिला या साध्या इच्छाही सहज पुऱ्या न करता येणं हेही अप्रत्यक्ष तिच्यावरील लैंगिक बंधनांशीच निगडित असतं, हे कुणीही मान्य करील.




'योनीच्या मनीच्या गुजगोष्टी' हे वंदना खरे यांनी अनुवादित केलेले नाटक, जे मूळ इव्ह एन्सलर या स्त्रीवादी कार्यकर्तीच्या 'द व्हजायना मोनोलॉग्स' या नाटकावर बेतलेले आहे. स्त्रियांच्या लैंगिक इच्छा अन् त्या इच्छांच्या सातत्याने होणाऱ्या दमनाविषयी नाटकात अत्यंत मोकळेपणाने भाष्य करण्यात आले आहे. 'बिरंगी मी! विमुक्त मी!' ही अंजली जोशी लिखित बेटी डोडसन या अमेरिकेतल्या चित्रकार स्त्रीच्या आयुष्यावर बेतलेली कादंबरी. स्त्री-स्वातंत्र्याचा खरा पाया लैंगिक स्वातंत्र्यात आहे. 'लैंगिक स्वातंत्र्य वगळलं तर मुक्तीही कित्येक योजनं दूर राहील', असं धाडसाने प्रतिपादन करणारी आणि आयुष्यभर त्याचा पाठपुरावा करणारी एक झुंजार चित्रकार म्हणजे बेटी. चित्रकलेचा तिचा प्रवास म्हणजे तिनं स्वतःची अन् एकूणच बाईची लैंगिकता तपासण्याचा केलेला प्रवास म्हणता येईल.

काहीशी अशीच पार्श्वभूमी असलेला 'लिपस्टीक अंडर माय बुरखा' हा चित्रपट नुकताच येऊन गेला. बाईचा पोशाख, तिची व्यसनं, तिनं आर्थिकदृष्ट्या सक्षम असावं की नाही, गर्भपाताची अन् गर्भधारणेची तिची इच्छा, अविवाहित स्त्रियांच्या कामेच्छा असा बाईच्या लैंगिकतेला कवेत घेणारा एक व्यापक पट दिग्दर्शिका अलंकृता श्रीवास्तव यांनी साकारला आहे. यातील बुवा हे पात्र आपल्या कामतृप्तीसाठी पिवळी पुस्तकं वाचते. त्या पुस्तकांत रोझी हे पात्र आहे. चित्रपटांत साकार झालेल्या चार स्त्री व्यक्तिरेखांच्या व्यथा या केवळ 'बाईच्या' म्हणजे रोझीच्या बनून आपल्या समोर येतात. या तीन कलाकृतीतील सौंदर्यस्थळे शोधण्याच्या अंगाने इथे विवेचन करण्यात आलेले नाही तर बाईची लैंगिकता हे त्यातील समान सूत्र लक्षात घेऊन त्यातील साम्यस्थळे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बाईच्या स्वतंत्र होण्यात आर्थिकदृष्ट्या तिचं स्वतःच्या पायावर उभं असणं महत्त्वाचं मानलं गेलं. तसं ते आहेच. पण तेवढं आणि तितकंच नाही. किती कमावत्या स्त्रिया कामक्रीडेत मिळणाऱ्या किंवा न मिळणाऱ्या ऑरगॅझमबद्दल आपल्या लैंगिक जोडीदाराशी मोकळेपणाने संवाद साधत असतील? बेटीचा मित्र ग्रँट म्हणतो तसं, खोट्या ऑरगॅझमचा आव आणणाऱ्या किती जणी असतील? बाईचा हा आव तिच्या जोडीदाराला खूश करत असला तरी तिचा हा फुकाचा आव तिला स्वतःला तृप्त करू शकत नाही, हे तिच्या लक्षात कसं येत नाही?

लैंगिकतेच्या या सुखाला केवळ शहरी स्त्रिया चटावलेल्या आहेत, लैंगिक सुख ही गोष्ट फक्त त्यांनाच गरजेची वाटते आहे अन् गावातल्या बायकांना जगण्याचे इतर अनेक प्रश्न महत्त्वाचे असल्याने त्यांना या सुखाची काही पडलेली नाही, असाही काहींचा लैंगिक दळिद्रीपणा असू शकतो. बाई शहरातली असो नाही तर गावातली, लैंगिक सुख ही शरीराची प्राथमिक गरजातली एक गरज असेल तर त्याचा आनंद कुठल्याही स्तरातल्या बाईला देताघेता येतच असतो. पण ग्रामीण भागात जिथे अनेक ठिकाणी आंघोळीलाही पुरेसा आडोसा नाही तिथे वस्त्रांचाच आडोसा करण्याची कला आत्मसात केलेल्या या बायका अंगातल्या वस्त्रानिशीच अंघोळ करताना दिसतात. अशा उरकलेल्या आंघोळीत या बायकांना स्वतःचं सबंध शरीर पाहायची संधी कधी मिळत असेल का? पण बंद दाराच्या एकांतातही किती स्त्रिया आपल्या शरीराचं, लैंगिक अवयवाचं दर्शन मोकळेपणाने घेत असतील? किती स्त्रिया इच्छा असूनही केवळ जोडीदाराला आपण चवचाल वाटू नये म्हणून कामक्रीडेत पुढाकार घेण्याचं टाळत असतील? लैंगिक आनंद देणाऱ्या योनी या अवयवाइतकाच किंबहुना त्याहूनही अधिक संवेदनशील अशा शिस्निका (clitoris) या अवयवयाच्या उत्तेजनाबद्दल किती स्त्रियांना माहिती असते? शिस्निकेला उत्तेजित करून स्त्रीला पुरुषाशिवायही तितकाच ऑरगॅझम मिळवता येऊ शकतो, याचा अनुभव किती स्त्रियांनी घेतलेला असतो? बाईच्या लैंगिकतेविषयी या अन् यासारख्या प्रश्नांचे अनेक अंगांनी आलेले तपशील हे 'योनीच्या मनीच्या गुजगोष्टी', 'बिरंगी मी, विमुक्त मी', 'लिपस्टीक अंडर माय बुरखा' या तीनही कलाकृतीतील समान सूत्र म्हणता येईल. सगळं जग बाईकडे 'बाई' म्हणून पाहतं, पण स्वतः बाई मात्र स्वतःला आई, ताई, मुलगी, बायको या नात्यांनी चहूकडून जखडून घेते. लैंगिक अवयवांसह असलेलं स्वतःचं बाईपण ती कधी न्याहाळत नाही, तृप्त होऊन अनुभवत नाही, हेच तीनही कलाकृतीत विविध




तपशीलात साकारलेलं दिसतं.

भुकेइतकीच कामेच्छाही नैसर्गिकच! पण पाकशास्त्रावर ज्या हिरिरीने अन् मोकळेपणाने बोलतो, प्रात्यक्षिकं करून दाखवतो, शिकवण्या घेतो. तसं कामशास्त्रातल्या ज्ञानाचं आपण काय करतो? पुरुषानं बाईबरोबर रत व्हायचं, यात काय शिकवायचं? ते ज्याचं त्याला जमतंच की! अशीच तर आपल्या बहुतेक सगळ्यांची धारणा असते. पण हे आनंददायी करायचं तर एकमेकांना कशाने सुख वाटतं ते शोधलं पाहिजे, त्यात प्रयोग करत राहिलं पाहिजे असं बेटी म्हणते. नुसती म्हणून थांबत नाही तर स्वतःच्या प्रणयक्रीडांचं न्यूयॉर्कमध्ये प्रदर्शन भरवते अन् स्वतःवर पॉर्न आर्टिस्ट हा शिक्का मारून घेते. शृंगार ही मनाला मुक्त करणारी कला आहे. तिचा आनंद घ्यायचा आणि द्यायचा असेल तर ती विकसित करावी लागते, असं बेटी म्हणते.

लहानपणापासून आपल्या योनीत दोष असल्याची भावना उरी जपलेल्या बेटीला तिच्या मित्राने – ग्रँटने दाखवलेल्या स्त्री जननेंद्रियाच्या चित्रांतून कळतं की तिच्या योनीच्या रचनेत कुठलीही उणीव नसून तो केवळ योनीचा एक प्रकार आहे. बाईच्या शरीराविषयी तिच्या लैंगिक जोडीदाराला जेवढी माहिती असते तितकीही तिला असत नाही याचे दर्शन 'योनीच्या मनी...'मध्येही पाहायला मिळते. स्वतःच्या योनीचा तिरस्कार करणाऱ्या स्त्रीला तिचा प्रियकर जेव्हा 'तुझी योनी सुंदर आहे' असं सांगतो तेव्हा ती आपल्या या अवयवाला जपायला लागते.

बेटीसारख्या लग्नाच्या नवऱ्याकडूनही शरीरसुख मिळू न शकणाऱ्या कित्येक बायका कधीतरी नवरा मेहरबान होईल या आशेवर तगमगत राहतात. संभोगापूर्वीची कामक्रीडा, जी बाईचे लैंगिक अवयव चेतवण्यासाठी आवश्यक असते ती करणे म्हणजे वेळ दवडणे अशी धारणा असलेला पुरुष सगळ्याची घाई असल्यागत बाईच्या आत एकदाचं वीर्य सांडून मोकळा होण्यासाठी उतावीळ असतो. 'लिपस्टीक...'मधल्या शिरीनच्या नवऱ्याच्या अशा आवृत्त्या ज्या स्त्रियांच्या वाट्याला आल्या असतील त्यांच्यासाठी कामक्रीडेचा आनंद हा मृगजळच ठरत असणार. वॅक्सिंग करताना शिरीनच्या डोळ्यांत आलेले अश्रू पाहून तिची पार्लरवाली मैत्रीण विचारते की, ''क्या हुआ दिदी, भाई यहाँ कभी छुते नही ना!'' त्यावर ''जानती हो तो पूछती क्यों हो?'' हे शिरीनने दिलेले उत्तर म्हणजे कित्येकींची दुखरी नसच म्हणावी लागेल.

बायकांच्या गप्पांमध्येही स्त्रिया आपल्या लैंगिक अवयवांचा स्पष्ट उल्लेख करायचं टाळतात. 'योनीच्या मनी...'मध्ये सुरुवातीलाच प्रेक्षकांनाही योनीचा उच्चार करायला सांगितला जातो, तिथेच हे नाटक समाजात या शब्दाभोवती अन् लैंगिकतेबद्दल असणारं वर्तुळ भेदताना दिसतं. या नाटकातलं 'च्यूत बाई च्यूत'ही 'किस बाई किस'च्या धर्तीवर येतं तेव्हा त्यातलं गुप्ततेचं आवरण गळून पडलेलं असतं.

'स्त्रीच्या लैंगिक मुक्तीचा केंद्रबिंदू हस्तमैथुन आहे' हे बेटीचं विधान वादग्रस्तही ठरू शकेल. पण ज्या स्त्रियांना पर्यायच नाही अशा विधवा, अविवाहित स्त्रियांची तरी हस्तमैथुनाची गरज समाज किती समजून घेतो. लिपल्टीकमधली 'बुवा' हे पात्र अशा स्त्रियांचं प्रतिनिधित्व करताना दिसतं.

बाईच्या लैंगिकतेबद्दल प्राजंळ आणि ठाम मते असणाऱ्या

बेटीने विवाहसंस्था, लग्नसंस्था याविषयी भाष्य केलं नसतं तरच नवल होतं. बेटी म्हणते, ''विवाहसंस्था म्हणजे स्त्री-पुरुषांचं सहजीवन कायद्याच्या कक्षेत आणणं. नेमका याच गोष्टीला माझा विरोध आहे. नैसर्गिक ओढीमुळे स्त्री-पुरुषांना एकत्र राहायचं असेल तर त्यांना विवाहासारख्या बाह्य बंधनांची गरजच काय? विवाहसंस्था नसली तरीही ते राहू शकतात की! उलट त्यांचं सहजीवन कायद्याच्या कचाट्यात आणल्यामुळेच समस्या निर्माण होतात. त्याहीपेक्षा कामतृप्ती कशी करावी हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. दोन प्रौढ व्यक्ती जर स्वखुशीने कामसंबंध ठेवत असतील तर ती त्या दोघांची खाजगी बाब आहे. त्यामध्ये कायद्याने नाक खुपसण्याचं कारण नाही. त्यासंबंधी कायदे करणं म्हणजे मूलभूत व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आहे. आणि समाजस्वास्थ्यासाठीही ते तितकंच हानिकारक आहे. समजा एकमेकांची ओढ ओहोटीला लागली असेल पण केवळ कायद्याच्या बंधनामुळे स्त्री-पुरुष एकमेकांशी भांडत, धुसफसत सहजीवन व्यतीत करत असतील तर त्यात समाजाचा फायदा काय? त्यांच्या अपत्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठीही ते हानिकारकच ठरणार नाही का?'' याही पुढे जाऊन या कादंबरीत पुढे असंही विवेचन येतं की, विवाहसंस्थेचा पायाच मुळी भुसभशीत आहे. स्त्री-पुरुषांनी आयुष्यभर एकमेकांशी लैंगिक एकनिष्ठता दाखवली पाहिजे, हे विवाहसंस्थेच्या मुळाशी असलेलं गृहितकच मुळी अवास्तव आहे.

बेटीचा जन्म १९२९चा, अमेरिकेतल्या कॅन्सस या राज्यातल्या विचिटा या लहानशा गावातला. तिची चित्रकलेतील कारकीर्द आणि स्त्रीचळवळीतील सहभाग हा तिच्या वयाच्या विशीनंतर टप्प्याटप्प्याने होत गेला असे म्हटले तर बेटीच्या वरील मतासारखीच मते आपल्याकडे र.धों. कर्वे यांनी १९२७ मध्ये समाजस्वास्थ्य हे मासिक सुरू करून अत्यंत धाडसाने मांडली. सुरुवातीला संततीनियमनाचे उद्दिष्ट समोर ठेवून सुरू केलेल्या या मासिकातून र.धों. कामप्रेरणा, समागम, स्त्री-पुरुष संबंध आणि समाज व्यवहार, विवाहसंस्थेची आवश्यकता या विषयावरही आपली मते तत्कालीन समाजाचा रोष पत्करून मांडत राहिले. र. धों.च्या लेखनाचे एखाद-दुसरे उदाहरण पाहिले तरी त्यांचे विचार काळाच्या किती पुढचे होते हे जाणवते. गो. ग. आगरकर यांचा एक लेख तत्कालीन मराठीच्या अभ्यासक्रमात घेतला होता. त्या लेखावर घेतलेले आक्षेप र.धों.च्या वाचनात आल्यावर आपल्या रोखठोक शैलीत त्या आक्षेपांचा समाचार घेताना र. धों. म्हणतात, ''हे गृहस्थ १५ -१६ वर्षालाच अल्पवय समजतात आणि इतक्या अल्पवयात ऋतुप्राप्तीसारख्या अश्लील गोष्टीची माहिती असणे योग्य नाही हे खरेच! बहुतेक मुलींना १४ व्या वर्षाच्या आतच ऋतुप्राप्ती होत असली म्हणून काय झाले? 'व्यभिचार' शब्दाचा अर्थ मुलींना कळू नये असे म्हणणारे पालक बहुधा पातिव्रत्य हा शब्ददेखील अश्लील समजतील, कारण पातिव्रत्याचा अर्थ काढल्यास संभोगाचाही कळला पाहिजे. आणि मग जबरी संभोगात न कळायचे काय राहिले? तेव्हा पुस्तक लिहिणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की सीता, द्रौपदी वगैरे संबंधी गोष्टीही त्यांनी लिहू नयेत. किंवा निदान लिहिल्या तर त्यांना 'पतिव्रता' म्हणू नये. कारण अशा अश्लील शब्दाची फोड करणे शक्य नाही. 'परपुरुषाला स्पर्श न करणारी' असे सांगून शिक्षक वेळ मारून नेतील, पण मग त्याचा अर्थ असा होईल की, मुंबईसारख्या शहरात एकही पतिव्रता असणे शक्य नाही. कारण तेथे परपुरुषाचा स्पर्श नको असल्यास नेहमी घरात बसून राहिले पाहिजे. अशा अश्लील शब्दांची संख्या इतकी आहे की ते टाळायचे म्हणजे कठीण काम आहे. पुस्तक लिहिणाऱ्याचे हाल आहेत झाले.'' र.धों.ची ही विधाने आजच्या पाठ्यपुस्तकांना आणि समाजालाही तितकीच लागू पडताना दिसतात. ('विमुक्त मी...'मध्ये ग्रँटनेही त्याच्या महाविद्यालयात अभ्यासक्रमाविषयी असलेला पढिक प्राध्यापकांचा दांभिकपणा काहीसा याच शब्दात व्यक्त केला आहे.)

'व्यभिचाराचा प्रश्न' या आपल्या लेखात र.धों.नी मुक्त लैंगिकतेचा पुरस्कार केल्याबद्दल सनातन्यांनी त्यांच्यावर खटला भरला. पण र.धों. आपले विचार मांडत राहिले. 'आधुनिक कामशास्त्र' या आपल्या पुस्तकामध्ये त्यांनी कामवासनेचे महत्त्व, कामवासनेचे मूळ, कामवासनेचे नैसर्गिक व कृत्रिम उद्दीपन, समागमाची पूर्वतयारी, वधूवरांची निवड, रतिक्रियेतील अडचणी, वंध्यत्व, संततिनियमन अशा वेगवेगळ्या विषयावर भरगच्च शास्त्रीय माहिती दिली आहे. र.धों.चे अभ्यासक डॉ. अनंत देशमुख म्हणतात, ''या पुस्तकामध्ये त्यांनी स्त्रीपुरुषांच्या जननेंद्रियांची घातलेली चित्रे मराठीत बहुधा प्रथमच इतक्या रेखीव स्वरूपात नि त्यांच्या कार्याविषयीच्या विस्तृत परिचयासह प्रसिद्ध झाली होती.''

'समाजस्वास्थ्या'च्या वाचकांशी, विशेषतः स्त्री वाचकांशी या बाबतीत संवाद साधण्यासाठी र.धों.नी १९३१ मध्ये 'शारदा' नावाची ('शारदेचे पत्र' नावाचे सदर सुरू केले.) एक काल्पनिक व्यक्तिरेखा निर्माण केली. ही शारदा आपल्या लैंगिक स्वातंत्र्याचा केवळ जाहीर उच्चार करत नाही तर, तर ती त्याचा पुरेपूर आनंद भोगते. विवाहबाह्य संबंधांनाही तिची आडकाठी नाही. एकाहून अधिक पुरुष तिला आवडले, तर द्रौपदीप्रमाणे राहायचीही तिची तयारी आहे. घरी असताना संपूर्ण नग्नावस्थेच राहणं तिला आवडतं. कुठल्या क्रांतिबिंतीची वाट न पाहता, स्त्रियांनी आपलं लैंगिक स्वातंत्र्य उपभोगावं असं तिचं सांगणं आहे. 'लिपस्टीक'मधल्या सगळ्या रोझी, 'योनीच्या मनी'मधल्या सगळ्या योन्या, अन् 'विरंगी मी' मधली बेटी या शारदेचंच तर म्हणणं पुन्हा नव्या तपशीलात सांगतायत असं वाटतं. पण र.धों.च्या 'समाजस्वास्थ्या'ला नऊ दशकांचा काळ उलटला तरी अजूनही त्यांच्या शारदेचं सार्वत्रिकीकरण होऊ शकलं नाही. मग मनात येतं की, अजून किती दिवस आपण शारदेला बुरख्यातच ठेवणार आहोत...?

**– साधना गोरे**
भ्रमणध्वनी : ९९८७७७३८०२
Sadhanagore82gmail.com

# मोदी आणि क्सी जिनपिंग

**डॉ. अनंत लाभसेटवार**

इंडिया ही जगातली सर्वात मोठी लोकशाही तर चीन तेवढ्याच मोठ्या लोकसंख्येचा साम्यवादी देश. त्या लाल देशानं मोठ्या कौशल्यानं भांडवलशाहीचे चांगले गुण साम्यवादाची चौकट ढिली न करता आपल्या राज्यप्रणालीत पेरले आणि जगातलं दुसऱ्या नंबरचं अर्थकारण निर्माण केले. चीनमध्ये राजकीय, अभिव्यक्ती व महाजालीन स्वातंत्र्य नाही. पण त्या देशात भारतापेक्षा जास्त आर्थिक स्वातंत्र्य आहे. त्यामुळे आपल्या देशापेक्षा जास्त परदेशी गुंतवणूक त्या देशानं आकर्षित केली. ही त्याला पोषक ठरली.

मोदी व क्सी पदावर येऊन आज तीन वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला. म्हणून त्यांचं कर्तृत्वमापन करणं आवश्यक आहे. त्यांनी आपापल्या देशांना कुठल्या दिशा दिल्या, किती प्रगती केली व काय बदल केले यांचा तौलनिक आढावा घेतल्याचं मी यापूर्वी बघितलं नाही. त्यापासून आपल्याला बरंच शिकता येईल असं वाटतं. खंडीय शेजारी दोन नवीन नेत्यांच्या नेतृत्वाखाली कसे बदलले हे लक्षात घेणं उद्बोधक ठरेल.

एकेकाळी चहा विकणाऱ्या मोदींनी भारताचं डावं धोरण डावलून ते मध्याच्या उजवीकडे नेलं व जगाचं लक्ष वेधून घेतलं. त्यांच्या ट्विटर अकाउंटवर ट्रंप सोडले तर जगात सर्वात जास्त नावं आहेत. एवढं त्यांचं जगाला आकर्षण आहे. त्यांनी देश बाजाराभिमुख केला. त्यामुळे अर्थवाढ वाढली. पूर्वीच्या सरकारच्या राजवटीत ती ६.४% असे. मोदी गादीवर येऊन एक वर्ष लोटलं आणि ती २०१५ मध्ये ७.१% वर गेली. पण हल्ली ती मनमोहनसिंगच्या सरकारपेक्षा कमी झाली. २०१७च्या पहिल्या तिमाहीत वाढदर ६.१% वर घसरला. ही उतरण तीन महिन्यांपुरता मर्यादित की अर्ध्वदिशेनं जाणारा आलेख हे सध्या सांगणं कठीण. काही लोक हा निश्चलनीकरणाचा अनिष्ट परिणाम समजतात. या फसलेल्या योजनेमुळे भारताची जागतिक प्रतिमा काळवंडली. पण देशातील मतदारांवर त्याचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. तरी पण आपला देश कुठलीच मोठी योजना यशस्वीपणे तडीस नेऊ शकत नाही असा जो समज असे तो यामुळे दृढमूल झाला. २०१० मध्ये भारतात संपन्न झालेले राष्ट्रकुल सामने देशाचं प्रतिमासंवर्धन करण्यास असमर्थ ठरले. यात जुलै १, २०१७पासून सुरू झालेल्या वस्तू व सेवाकरामुळे जी घालमेल झाली ती अभिमानास्पद नव्हती. निश्चलनीकरणाप्रमाणे या योजनेसाठीही आपण पुरेशी तयारी केली नव्हती.

आपल्या वाढदराचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे ते रोजगारविरहित आहेत. अगोदरच जग आपल्या नेत्रदीपक वाढदराविषयी शंकित आहे. तो आकडा ज्या माहितीवर अवलंबून आहे ती माहितीच देशात उपलब्ध नाही. ही पोकळी काही गृहितकांनी भरून टाकावी लागते. त्यात बदल केला की वाढदर उर्ध्वदिशेनं जाऊ शकतो. म्हणजे हा वाढदराचा आकडा वास्तवाबरोबरच काही अंशी कल्पनेवरही अवलंबून असतो. हे चीनच्या बाबतीतही खरं आहे. पण हा विश्वासार्हतेचा प्रश्न क्षणभर बाजूला सारला तरी आपल्या वाढदरानं रोजगारनिर्मितीशी कट्टी फू का केली हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हा बांझोटा दर फारसा हितकारक नसतो. याचा अर्थ खासगी कंपन्या रोजगारनिर्मिती करीत नाही कारण त्यांना सरकारी धोरण पोषक वाटत नाही. आता तर अनेक कंपन्यांनी भारताऐवजी परदेशात भांडवली गुंतवणूक करून देशाबाहेर जास्त नोकऱ्या पैदा करण्यास सुरुवात केली. इंफोसिस, कॉगनिझंट, टी.सी.एस. या कंपन्यांनी ट्रंपच्या बदलत्या धोरणाला उत्तर म्हणून अमेरिकेत हजारो चांगल्या पगाराच्या नोकऱ्या निर्माण केल्या व देशांतर्गत कामावर मर्यादा घातल्या.

जी काही रोजगारनिर्मिती होत आहे ती एकतर सरकारी नोकऱ्यात किंवा सरकारनं पायाभूत सुविधा बांधण्यास उत्तेजन दिलं म्हणून. सडका बांधण्यास भरपूर मजूर लागले. भूपृष्ठ वाहतूक मंत्री गडकऱ्यांनी रस्त्यांचं जाळं देशभर विस्तारित केलं. अलीकडे या रोजगारनिर्मितीवरही दुसरी गदा पडली. ज्या शेतकऱ्यांनी विकासकामांसाठी जमीन विकण्यास नकार दिला त्यांना मुख्यमंत्र्यांनी जून २०१७ मध्ये ३४,००० कोटी रुपयांची कर्जमाफी देऊन तिजोरी रिकामी केली. अगोदरच ४ ट्रिलियन रुपयांपेक्षा जास्त कर्ज अंगावर असताना हे औदार्य दाखवण्यास बरंच धाडस लागतं. पण त्यामुळे विकासकामांना कात्री लावावी लागेल. अनेक राज्यात असंच झाल्यामुळे भविष्य उज्ज्वल दिसत नाही. आपल्या देशात तर दर महिन्याला १० लाख नवीन गरजू



लागणारं संसदीय बळ व राजकीय भांडवल त्यांनी उत्तर प्रदेशाच्या निवडणुकीत कमावलं. याचा ते उपयोग करू शकतील.

मजूर कायद्यामुळेही देशात गुंतवणूक करण्यास कंपन्या भितात. कुठलीही शंभरपेक्षा जास्त नोकरवृंद असलेली कंपनी सध्या निम्नस्तरीय मजूरवर्गात कपात करू शकत नाही. हा कायदा या मजुरांच्या संरक्षणासाठी अंमलात आणण्यात आला. पण त्याच वर्गाला तो घातक ठरला कारण कंपन्या अशा मजुराला कामावर ठेवत नाहीत. त्या शिक्षित पदवीधरांना नोकऱ्या देतात. नाहीतर करारबंद मजूर (contract labour) वापरतात. टाटा ही भारतातली सर्वात मोठी बहुदेशीय कंपनी. ती अर्ध्यापेक्षा जास्त नफा परदेशात कमावते. पण देशांतर्गत ७०% करारी मजूर वापरते. हे रोजगारांच्या दयनीय स्थितीविषयी बोलकं नाही का? मजूरप्रधान उद्योगात कुठलाच शहाणा उद्योजक भारतात गुंतवणूक करणार नाही. याविषयी 'इकॉनॉमिस्ट' या साप्ताहिकानं प्रकाशित केलेली आकडेवारी डोळे उघडणारी वाटते. आपल्या देशात वार्षिक १२५ दशलक्ष डॉलरचा खप असलेल्या २७० कंपन्या आहेत. त्यात देशातील फक्त १०% मजूरवर्ग काम करतो. तुलनेनं अशा कंपन्यांची संख्या चीनमध्ये ७६८० तर ब्राझिलमध्ये १२९५ आहे. मजूर कायद्यामुळे आपल्या कंपन्या उद्योगविस्तार करण्यास भितात व परदेशी कंपन्या देशात येण्यास कचरतात हे उघड आहे.

फ्रान्समध्येही आपल्यासारखे कठोर मजूर कायदे आहेत. उलट शेजारच्या जर्मनीत 'हायर अँड फायर' हे धोरण पाळण्यात येतं. याचे अर्थकारणावर काय परिणाम झाले? फ्रान्समध्ये बेरोजगारीचं प्रमाण १०% व बाढदर शून्यवत तर जर्मनीत पुरेसं मजूर मिळत नाही आणि जर्मनीचं अर्थकारण युरोपमध्ये सर्वोत्कृष्ट समजण्यात येतं. तो असा एक देश आहे की जिथे चालू खात्यात (Current Account) त्रुटी नसून शिल्लक आढळते. अमेरिकादेखील असा स्वर्ग निर्माण करू शकली नाही. पण युरोपशी तुलना करण्याची जरुरी नाही. शेजारच्या चीनमध्ये बघा. साम्यवाद मजूर कल्याणाला वाहिलेला. पण त्या लाल देशात 'हायर अँड फायर' धोरण सापडतं.

'मेक इन इंडिया' ही मोदींची स्वाक्षरी योजना. पण ती फलित होण्यासाठी लागणारी परिस्थिती आपण गेल्या तीन वर्षांत निर्माण करू शकलो नाही. हे नवीन उद्योग सुरू करण्याच्या निर्देशांकावरून सिद्ध होतं. या बाबतीत मोदी गादीवर आले तेव्हा जगातील १८९ देशांमध्ये आपला १३१ वा नंबर लागत होता. २०१७ मध्ये तो १३० वर गेला. याला प्रगती म्हणता येईल का? जून २०१७ मध्ये मोदींनी अमेरिकेची पाचव्यांदा वारी करून व्हाईट हाऊसचं मोटेल केलं. तिथे ते प्रथमच ट्रंप यांना भेटले. पण तत्पूर्वी

नोकऱ्यांसाठी बाजारपेठेत शिरतात. एवढी रोजगारनिर्मिती होत नसल्यामुळे मनुष्यबळाचा कितीतरी अनावश्यक व्यय होतो हे उघड आहे. एकदोन वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशाच्या शासनानं 'ड' वर्गातल्या १० निम्नस्तरीय नोकरांसाठी अर्ज मागवण्याचं पाप केलं. त्यासाठी अक्षरशः पोत्यानं अर्ज आले. त्यात २५० डॉक्टरेट होते. अशी भीषण परिस्थिती जगात कुठे सापडत नसेल. मोदींच्या तीन वर्षांच्या कारकीर्दीत तो प्रश्न सुटला नाही.

अर्थकारणाची वाढ होण्यासाठी परदेशी भांडवलाची आत्यंतिक गरज आहे. हे ओळखून मोदींनी उद्योगस्नेही धोरण आखण्याचं जगाला आश्वासन दिलं. त्यामुळे परदेशी संस्थात्मक व थेट गुंतवणूक वाढली. पण किती रोजगारनिर्मिती झाली हे कुणालाच ठाऊक नाही. त्यात अमेरिकेचं योगदान मर्यादित आहे हे विशेष. २०१६ मध्ये त्या देशानं आपल्या देशात फक्त २.३८ अब्ज डॉलर म्हणजे ५.५% गुंतवले असं वॉल स्ट्रीट जर्नल म्हणतो. असा संकोच का? अमेरिकन कंपन्या नुसत्या आश्वासनांवर गुंतवणूक करीत नाही. त्यांचा विश्वास फक्त कृतीवर. या बाबतीत दोन कृतींची वानवा जाणवते - भूमीसंपादन व मजूर कायदे. यात अजून पुरेसे बदल न झाल्यामुळे अमेरिकन कंपन्या भारत हे उत्पादन केंद्र नसून एक बाजारपेठ समजतात.

जून २०१७च्या पाचव्या अमेरिकन भेटीत मोदींनी गुंतवणूकदारांसमोर घोषणा केली की गेल्या ३ वर्षांत त्यांच्या सरकारनं ७००० सुधारणा (reforms) केल्या. पण यात भूमीसंपादन व मजूर कायद्यांचा समावेश होत नाही हे दुर्दैव. अजूनही नवीन कारखान्यासाठी जागा संपादन करणं कठीण आहे. त्यामुळे अनेक योजना रखडल्या आहेत. यात मुंबई-नागपूर द्रुतमार्गाचा समावेश होतो. इतर देशात व्यवस्थेपुढे व्यक्ती दुय्यम ठरवण्यात येते. आपल्या देशात उलटे आहे. तिथे व्यक्ती व्यवस्थेपेक्षा वरिष्ठ समजण्यात येते. मोदींनी हे बदलणं आवश्यक आहे. त्यासाठी

२१ मोठ्या कंपन्यांच्या मुख्याधिकाऱ्यांशी भारतीय उद्योजकांनी संवाद साधला व 'गुंतवणूक करा' म्हणून पुन्हा आव्हान दिलं. खरं म्हणजे अशा आमंत्रणाची जरुरी नसते. गुंतवणूकयोग्य वातावरण देशात असेल तर परदेशी भांडवलाचे लोंढे पाणी उताराकडे वळतं तेवढ्या सहजतेनं देशात येतील. चीन अशा वाऱ्या कुठे करतो? त्यांचे अध्यक्ष एकदाच अमेरिकेला आले आणि ते देखील परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी नव्हे तर परदेशी धोरण ठरवण्यासाठी. तरीही भारतापेक्षा जास्त भांडवल त्या देशात जातं.

याबाबतीत सर्वच नकारात्मक नाही. मोदींच्या कष्टांना थोडी फळं आली आहेत. लॉकहिड-मार्टिन ही अमेरिकेतली सर्वात मोठी संरक्षण साहित्य निर्माण करणारी कंपनी (वार्षिक खप : ४६ अब्ज डॉलर, नफा : ३.६ अब्ज डॉलर). ती कंपनी लढाऊ विमानं बनवण्यात निष्णात. मोदींच्या 'मेक इन इंडिया' या धोरणामुळे लॉकहिड-मार्टिन आता F-16 नावाचं लढाऊ विमान भारतात तयार करणार. त्यामुळे आपल्या देशात चांगल्या पगाराच्या व कौशल्यवान नोकऱ्या निर्माण होतील. पण चतुर्थ वर्गातील नोकरगणतीत फारशी भर पडणार नाही. हा वर्ग प्रशिक्षित करून नोकरीयोग्य करणं शक्य आहे. याची सुरुवात 'ॲपल' कंपनीनं नुकतीच भारतात केली. आता आयफोनची जुळणी भारतात होत आहे. हे पाऊल पाण्यात उडी मारण्यापूर्वी अंगठा बुडवण्यासारखं असलं तरी महत्त्वाचं आहे कारण भारतात ॲपलच्या फोनचा बाजारहिस्सा ५% पेक्षा कमी आहे. भारताएवढी जगात चीनशिवाय दुसरी बाजारपेठ नसल्यामुळे 'ॲपल'ला भारतात फोननिर्मिती करणं अपरिहार्य आहे.

मोदींचं 'मेक इन इंडिया' व ट्रंपची 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या धोरणात उपजत द्वंद्व आहे. त्यामुळे अमेरिकन कंपन्या ट्रंपना खूश करण्याऐवजी परदेशाऐवजी स्वदेशात गुंतवणूक करून नोकऱ्या निर्माण करीत आहेत. यात आपल्या संगणक कंपन्यांनी देखील भाग घेतला. त्यामुळे भारतात गुंतवणूक करून निर्माण झालेलं उत्पादन अमेरिकेला निर्यात करण्यास काही कौशल्य व बरंच धाडस लागतं. ते फोर्ड कंपनीनं दाखवलं. ती कंपनी भारतात बनवलेल्या गाड्यांची २०१८ पासून अमेरिकेला निर्यात करणार आहे. हे बल्लारशाला कोळसा नेण्याचं काम मोदींच्या धोरणामुळे शक्य झालं असं म्हणण्यास हरकत नाही.

तरी पण गेल्या तीन वर्षातील मोदींची देशप्रवर्तक प्राप्तव्य कोणती? याचं उत्तर इकॉनॉमिस्टनं जून २०१७ मध्ये पंतप्रधानांनी अमेरिकेला भेट दिली त्याच आठवड्यात दिलं. त्यांच्यावर मुखपृष्ठ लेख लिहून मुखपृष्ठावर व्याघ्रारूढ मोदींचं रेखाचित्र छापलं. या साप्ताहिकाच्या मते मोदींची कर्तबगारी मिणमिणती असून ती दोन क्षेत्रापुरतीच मर्यादित आहे. एक म्हणजे त्यांनी दिवाळखोरीच्या कायद्यात बदल करून तो सुलभ केला. त्यामुळे विजय मल्ल्यासारखे कर्जबुडवे वर्षानुवर्षे बँकांना झुलवत ठेवू शकणार नाहीत. पण हा कायदा वास्तवात किती परिणामकारक ठरेल हे सांगणं कठीण. तो अजून न्यायालयीन मुशीत तावून निघाला नाही. अगोदरच आपली न्यायव्यवस्था मोडीत आली आहे. सर्व कोर्टात २.४ कोटी खटले स्थगित आहेत. त्यातले १०% एका दशकापेक्षा जास्त प्रलंबित आहेत.

मोदींचं दुसरं प्राप्तव्य म्हणजे जुलै १, २०१७ पासून सुरू केलेला वस्तू व सेवा कर. पूर्वीचे अनेक राज्यस्तरीय व केंद्र पातळीवरील विविध कर रद्द होऊन एक देशव्यापी मूल्यवर्धक कर आकारण्यात आला. त्यामुळे आंतरप्रांतीय व्यापार सुलभ झाला. या एकसूत्रीपणामुळे देशाच्या वाढदरात २% भर पडून राष्ट्रीय ढोबळ उत्पन्न ४० अब्ज डॉलरनी वाढेल असं अर्थतज्ञ म्हणाले. पण आपल्या नोकरशाहीप्रिय शासनानं वस्तूंचं व सेवेचं ५ गटात वर्गीकरण करून कमालीची गुंतागुंत निर्माण केली. अन्नधान्य, भाज्या, निरोध व आरोग्यसेवा सध्या तरी या जाळ्यातून सुटली. वाहनं, शीतपेट्या व पंचतारांकित जीवनशैलीला लागणाऱ्या वस्तूंवर व सेवेवर उच्चत्तम म्हणजे २८% कर लादण्यात आला. श्रीमंतांना धुवून काढल्यानं गरिबांचं हित होतं अशा भ्रमाखाली वावरत असलेली आपली समाजवादी प्रवृत्ती शेवटी घातक ठरणार असं तज्ज्ञ म्हणतात. या वर्गीकरणामुळे दबावगट निर्माण होतील व नोकरशहांना भ्रष्टाचार करण्यास संधी मिळेल. त्यामुळे वाढदरात फक्त ०.८% भर पडेल असं म्हणतात. म्हणजे २४ अब्ज डॉलरच्या उत्पन्नवाढीला फोडणी बसणार. देशातल्या सर्व अंबानींना, टाटांना आणि बिर्लांना १००% धुवून काढलं तरी एवढं नुकसान होईल का? अर्थातच नाही, कारण देशात तेवढे करोडोपती नाहीत. असा कर जगातल्या १५० देशांत आकारण्यात येतो. पण प्रत्येक राष्ट्रात एकच करदर. मग आपल्या राजकारण्यांनी व बाबूंनी मनूच्या वर्णापेक्षा जास्त वर्ग काढण्याचा शहाणपणा का दाखवला? कारण कुठलीही गोष्ट सुलभ करण्याऐवजी ती जास्तीतजास्त गुंतागुंतीची व म्हणून भ्रष्टाचारप्रवण करण्याचं तंत्र आपल्या डीएनएमध्येच आहे. म्हणून मोदींचं हे प्राप्तव्य सुरू होण्यापूर्वीच ढासळलेलं आहे असं म्हणावं लागेल. शिवाय त्याचं सर्व श्रेय त्यांना जात नाही. त्याची चर्चा १९९१ पासून सुरू होती.

हे लक्षात घेऊन 'इकॉनॉमिस्ट'नं मोदी देशसुधारक नसून एक प्रशासक आहे असं संबोधून उपेक्षा केली. त्यामुळे आपण विचलित होण्याचं कारण नाही कारण या १७५ वर्षीय साप्ताहिकाला भारतातील कुठलीच गोष्ट कौतुकास्पद वाटत नाही. शिवाय त्याची मतं नेहमीच खरी ठरत नाही. ब्रेक्सिटच्या वेळी ब्रिटननं युरोपी राष्ट्रसंघातून बाहेर पडू नये म्हणून त्यानं हंबरडा फोडला होता. तसंच हिलरीवर त्यांचा भारी जीव आणि ट्रंपवर आग पाखडणं ते सेवाभावी कर्तव्य समजतं. ब्रिटिश जनतेनं व अमेरिकन मतदारांनी या डाव्या साप्ताहिकाला कुठे भीक घातली? तरी पण त्यानं जो शेरा मारला त्यामुळे आपण अंतर्मुख होणं आवश्यक आहे. कुठे चुकतं का हे आजमावलं पाहिजे कारण चीनशी तुलना केल्यावर या तीन वर्षातील आपली प्राप्तव्यं निष्प्रभ ठरतात.

### क्सी जिनपिंग



एकेकाळी गोठ्यातलं शेण गोळा करणाऱ्या चीनच्या अध्यक्षांची मोदींअगोदर जवळजवळ १ वर्ष पदावर नेमणूक झाली. आपले पंतप्रधान निवडून आले. त्यांच्या कामांची यादी लांब आहे. त्यांचं पहिलं महत्त्वाचं प्राप्तव्य म्हणजे 'वन बेल्ट, वन रोड' नावाचा ३० मध्य आशिया खंडातले देश जोडणारा नवीन रेशीम रोड. जुन्या काळी या रस्त्यावरून उंटावर माल युरोपमध्ये पाठवण्यात येई. पण स्वस्त जलमार्ग उघडल्यावर हा भूमार्ग अव्यवहार्य ठरला व बंद पडला. २०१३ मध्ये तो बांधण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला व २०१६ मध्ये पूर्ण झाला. त्या भूमार्गाबरोबरच रेल्वे, तेल व वायू वाहिन्या बांधण्यात आल्या. त्यासाठी लागणारा बराचसा पैसा नव्यानेच स्थापन केलेल्या एशिया इंफ्रास्टक्चर बँकेकडून उसना घेण्यात आला. अमेरिका सोडून जगातले सर्व मोठे देश या बँकेचे संस्थापक-सभासद आहेत. भारतानं तर त्यात १० अब्ज डॉलर बीजभांडवल ओतलं. ३० देशांशी वाटाघाटी करून कुठलीही योजना आखणं व राबवणं देशांतर्गत सुधारलेली शहरं उभारण्यापेक्षा कितीतरी कठीण. मग मोदींच्या १०० स्मार्ट शहरं बांधण्यात व नवीन रेशमी रोड सुरू करण्यात काय फरक आहे? दोन्ही योजना जवळजवळ एकाच वेळी सुरू झाल्या. आपला प्रकल्प अजून आखण्याच्या अवस्थेत आहे तर रेशीम रोड सुरू झाला. आज चीनच्या पश्चिम सरहद्दीवरील मागास भागात असलेल्या अलुशँकाऊ या ३२,००० लोकवस्तीच्या गावावरून रोज ३७०० मालवाहू गाड्या युरोपकडे जातात. त्यामुळे या गावाचंच नव्हे तर पश्चिम चीनचं पुर्नज्जीवन होऊन त्याला आर्थिक मोक्ष मिळाला.

आपण गेल्या तीन वर्षात कुठल्या १०० शहरांना 'डोकेबाज' (Smart) करायचं हे देखील ठरवलं नाही. जून २०१७ पर्यंत फक्त ९० शहरंच निवडण्यात आली. पण त्या पलीकडे फारशी प्रगती झालेली नाही. 'स्वच्छ भारत' या योजनेसाठी आपण हातात झाडू तरी घेतली होती. यावेळी फावडे देखील उचलले नाही. या १०० शहरांसाठी सरकारनं अर्थसंकल्पात १.५ ट्रिलियन रुपये (२३ अब्ज डॉलर्स)ची तरतूद देखील केली. पण पैसे अजून कुणी बघितले नाहीत! तेवढेच पैसे राज्यसरकार उभे करणार आहे. हे फाईलीत जरी टीपटॉप दिसत असलं तरी महाराष्ट्र शासनाकडून (व अनेक प्रांतांकडून) ही रक्कम वसूल करणं म्हणजे दगड पिळून पाणी काढण्याएवढं कठीण होईल कारण शेतकऱ्यांना ३४,००० कोटी रुपयांची कर्जमाफी केल्यापासून महाराष्ट्राच्या तिजोरीत ठणठणाट झाला आहे. इतर राज्यांची स्थितीही तशीच असल्यामुळे शतशहरी योजना पावसाळ्यात उठवणीला आलेल्या गाईसारखी अपंग होणार असं वाटतं. आज बेजिंगमध्ये विणलेलं स्वेटर किंवा बांधलेले जोडे लंडनला मुंबईवरून गडचिरोलीला पाठवलेल्या मालापेक्षा लवकर व स्वस्त दरात जातात. याप्रमाणे आपण नुसतं बोलतो, फायली प्रसवतो व पुढे ढकलतो तर चिनी कृती करतात. आपण प्रक्रियाकेंद्रित तर चिनी कृतिप्रवण. आपण साध्यापेक्षा साधनं महत्त्वाची मानतो. पण ते नेहमीच खरं नसतं हे चीननं जगाला दाखवून दिलं. हा विलंब जरी स्वीकारला तरी या तीन वर्षात आपण देशात ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्येपेक्षा जास्त लोक पैदा केले त्याचं काय? म्हणजे ही शतशहरी योजना इतर योजनांप्रमाणे सुरू होण्यापूर्वीच कालबाह्य होईल. म्हणून हा विलंब घातक आहे. तसंच भाववाढीमुळे अंदाजपत्रक विस्कळीत होईल.

क्सींची दुसरी महत्त्वाची, आंतरराष्ट्रीय प्रतिमा उजळणारी, अमेरिकेला शह देणारी व पूर्ण झालेली योजना म्हणजे एशियन इंफ्रास्ट्रक्चर बँक. या बेजिंगस्थित आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थेने दीड वर्ष पूर्ण करून आशिया खंडातील अनेक देशांना पायाभूत सुविधा बांधण्यासाठी कर्ज दिलं. याचा मुख्य लाभार्थी म्हणजे पाकिस्तान. या नवीन रेशीम रोडचा काही भाग पाकशासित काश्मिरमधून जात असल्यामुळे भारतानं विरोध केला व अंग काढून घेतलं. ही नवीन वित्तसंस्था आंतरराष्ट्रीय बँक (World Bank) व आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी (International Monetary Fund) यांच्याशी स्पर्धा करते. पण या दोन पाश्चात्य वित्तसंस्थांवर अमेरिकेचं प्रभुत्व तर एशियन बँकेवर चीनचं. क्सींनी ती बँक पहिल्या तीन वर्षात स्थापन करून आपल्या देशाचं जागतिक वजन वाढवलं व महासत्ताक होण्याच्या मार्गावरचं एक मोठं पाऊल उचललं.

क्सींनी त्याच काळात केलेलं धाडसी काम म्हणजे साऊथ चायना सीमधील बेटं एकमेकांना जोडून बांधलेल्या लष्करी छावण्या. त्याला अमेरिकेनं जरी मान्यता दिली नसली तरी या प्रभुत्व विस्तारामुळे तिथले इतर लहान देश (जपान, तैवान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, बोर्निओ) घाबरले व त्यांची अमेरिकेवरची निष्ठा प्रश्नांकित झाली.

याशिवाय क्सींनी अनेक देशांतर्गत योजना नुसत्या आखल्या नाहीत तर पूर्ण केल्या. भ्रष्टाचाराला लगाम लावून लाखो बाबूंना रस्ता दाखवला. आपल्या भव्य लष्कराचं आधुनिकीकरण केलं. आपण तसंच करीत आहोत पण दोन देशात त्याविषयी मोठा फरक आहे. चीन जवळजवळ सर्व लष्करी सामग्री देशांतर्गत पैदा करतो तर आपण ती आयात करतो. जगात सर्वात मोठा लष्करी साहित्य आयात करणारा देश म्हणून आपली सध्या ओळख झाली आहे. त्यामुळे आपली 'डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन' ही संस्था व त्याच्या ५२ प्रयोगशाळा फायली पुढे ढकलण्याशिवाय दुसरं काय करतात हा प्रश्न आहे. तिथे ५००० शास्त्रज्ञ काम करतात. पण त्याचं अंदाजपत्र फक्त २.१ अब्ज डॉलर. तुलनेने आपण डिसेंबर २०१६ मध्ये फ्रान्सवरून ३६ लढाऊ विमानं (Rafale) ८.७ अब्ज डॉलर खर्चून विकत घेण्याचं जाहीर केलं. यावेळी मोदी ट्रंपना भेटण्यास आले तेव्हा त्यांनी २ अब्ज डॉलर्सचे ड्रोन्स (Drones) विकत घेण्याचा करार केला.

मोदींनी भारताला दिशा दिली, देशाला चैतन्यमय केलं, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ७००० सुधारणा केल्या व वाढदर उंचावर ठेवला. हे सगळं स्तुत्यच आहे. पण ते एकटे जगन्नाथाचा रथ ओढू शकत नाहीत त्यासाठी नागरिकांचं सहाय्य लागतं. रस्त्यावर कचरा फेकण्यापासून देश स्वच्छ ठेवण्यासाठी व पर्यावरण रक्षणासाठी जनता बरंच सहाय्य करू शकते. पण याविषयी आदरापेक्षा उपेक्षाच देशात जास्त आढळते.

चीनशी तुलना करणं आवश्यक का आहे? त्याशिवाय आपण जगात कुठे उभे आहोत हे कळायला मार्ग नाही. या तुलनेत आपण किती मागे पडतो व त्यासाठी पुढे जाण्यास किती प्रयत्न करायला पाहिजे याची अशा तौलनिक अभ्यासावरून कल्पना येते. चीनपुढे आपण निष्प्रभ ठरण्याचं कारण तो देश साम्यवादी तर आपला लोकशाहीवादी असं कारण नेहमी दिलं जातं. पण वापरून वापरून गुळगुळीत झालेली ही सबब खरी नसून ती आपली निष्क्रियता लपवून ठेवण्यास समर्थनीय ठरते. लोकशाही जर प्रगतीच्या आड येत असेल इतर लोकशाहीवादी देश पुढे कसे आले? यात अमेरिका व युरोपचाच समावेश होत नाही तरी दक्षिण आशिया खंडातले अनेक देश अनुस्यूत करावे लागतील. म्हणून दोन देशातील फरक राज्यप्रणालीधिष्ठित नसून दुसऱ्या काही खोल कारणांमुळे आहे असंच म्हणावं लागेल. विद्वत्तेचा अभाव हे याचं कारण नाही. तसंच पैशाचं दुर्भिक्ष्यही त्यामागे नेहमीच नसतं. मोडकळीस आलेली शिक्षणपद्धती, भ्रष्टाचाराचा भस्मासूर, सर्व जबाबदारी सरकारवर सोपवून स्वत: भागीदाराऐवजी बघ्याची भूमिका पत्करण्याची प्रवृत्ती, लालफितीचा कारभार, वाढती लोकसंख्या व तदजन्य प्रदूषण व संसाधनांवर पडलेला बोजा अशी अनेक कारणं देता येतील. कुठल्या एका कारणावर बोट ठेवता येणार नाही. म्हणजे कळ दाबली की खोली प्रकाशित होते तसं प्रगतीसाठी एक बटन अस्तित्वात नाही. थोडक्यात म्हणजे आपल्याला सर्व डीएनएच बदलावा लागेल. ते काम सोपं नाही.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
latalabh@aol.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)

ग्रंथाली




**अमेरिका : दशा व दिशा – डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

अमेरिकेत राहण्याचं भाग्य लाभलं की त्याला पहिली ठेच बसते. अतिस्पर्धेच्या युगात त्याला रात्रंदिवस काम करावं लागतं, कुटुंबाची हेळसाड होते आणि भौतिक ऐश्वर्य लाभलं तरी मानसिक शांतता आकाशातल्या चंद्राप्रमाणे दूरच राहते. आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे कंपन्या सारख्या कार्यक्षमता व उत्पादनशक्ती वाढवण्यासाठी आकाशपाताळ एक करतात. त्यांना सारखी पुनर्रचना करावी लागते. यात अनेकदा नोकरी भरडली जाते आणि नवीन शोधावी लागते. जीवनातल्या अस्थैर्यामुळे तो या स्वप्नवत देशाकडे जरा करड्या नजरेनं बघू लागतो. त्यानंतर तो ठिकठिकाणी चिकित्सक दृष्टी वापरतो. चकाकणारं सर्वच सोनं नसतं याची त्याला खात्री होते. इतर देशांप्रमाणे या देशातही खाचखळगे, चढउतार, अन्याय व भ्रष्टाचार आहे याची त्याला जाणीव होते आणि मानसिक उत्क्रांतीची शेवटची पायरी तो चढतो. तिथून त्याला दिसतं ते सर्वच जादुई नसतं. आता तो अमेरिकेविषयी प्रगल्भ झालेला असतो.

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

## पुस्तकप्रकाशन वृत्तांत

# 'रानवीचा माळ' संस्कृतीबदलाची कहाणी : रंगनाथ पाठारे

बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जगभर धुडगूस घातला आहे. आपल्या स्वार्थासाठी या कंपन्यांनी कोणत्याही थराला जाऊन माणसाच्या माथी अनेक गोष्टी मारल्या आहेत. ज्यामुळे नीतिमूल्यांचा ऱ्हास होत आहे. भारतातही हा धुडगूस पहावयास मिळतो. या मल्टिनॅशनल कंपन्यांमुळे निर्माण झालेल्या नव्या संस्कृतीमुळे जुनी मूल्य, प्रामाणिकपणा, एकमेकांबरचे प्रेम कमी झाले. अनेक सामाजिक प्रश्न या कंपन्यांनी बदललेल्या संस्कृतीमुळे निर्माण झाले आहेत. परिणामी जग विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहे. हाच धागा अभिजित हेगशेट्ये यांच्या 'रानवीचा माळ' कादंबरीतून दिसून येतो, असे प्रतिपादन ख्यातनाम लेखक, कादंबरीकार रंगनाथ पठारे यांनी केले.

ज्येष्ठ पत्रकार तथा लेखक अभिजित हेगशेट्ये यांच्या 'रानवीचा माळ' या कादंबरीच्या प्रकाशनानिमित्त नगर वाचनालय, रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमादरम्यान ते बोलत होते.

रंगनाथ पठारे हे कादंबरीबाबत म्हणाले की, ''कादंबरी म्हणजे लेखकाने केलेली एक सजीवाची निर्मिती असते. कादंबरीत शब्दांच्या माध्यमातून जिवंत होणारी गोष्ट असते.''

यावेळी 'ग्रंथाली'चे विश्वस्त दिनकर गांगल यांनी आपल्या मनोगतात हेगशेट्ये यांच्या कादंबरीचा आढावा घेतला. त्यात त्यांनी एका संस्कृतीवर दुसऱ्या संस्कृतीच्या आक्रमणाचा संघर्ष असल्याचे सांगत या कादंबरीकडे मी एक वृत्तांत कथा म्हणून पाहतो. यासाठी हेगशेट्ये यांनी सुमारे दहा वर्षे खूप परिश्रम घेतले. त्यातील लेखनात त्यांनी बोलीभाषांचा सुंदर वापर केल्याने कादंबरी अत्यंत वाचनीय आणि प्रवाही झाली आहे. या कादंबरीच्या कथानकात अनेक कादंबरीची बीजे पेरली गेली आहेत. डॉक्युमेंट्री म्हणून ही कादंबरी फार महत्त्वाची आहे, असे सांगितले.

अनुभवाच्या निराकार सावलीला साकार करतो तो लेखक अशी कवी अशोक बागवे यांनी लेखकाची व्याख्या केली. शल्य कळल्याशिवाय कौशल्य येत नाही तसेच व्यवस्था व अवस्था या गोष्टी माणसाचे आयुष्य घडवत असल्याचे ते म्हणाले. जी.ए. कुलकर्णी यांच्या कथेचा संदर्भ देताना 'रानवीचा माळ' ही कादंबरी एक ऐतिहासिक दस्तऐवज असून मराठी साहित्यात ती एक महत्त्वाचे पाऊल ठरेल असे त्यांनी सांगितले.


आपल्या खुमासदार शैलीत 'रानवीचा माळ' या कादंबरीतील अनेक घटनांचा मार्मिक शब्दात उलगडा केला. यावेळी त्यांनी एन्रॉन प्रकल्पाच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाच्या संघर्षाची कथा मांडली गेली असल्याचे सांगितले. कोकणाच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यासारख्या सर्वसामान्य लोकांची असल्याचे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी लेखक अभिजित हेगशेट्ये यांनी दिनकर गांगल हे आपले गुरू असून त्यांच्यामुळेच मला लिहिण्याची मला प्रेरणा मिळाली. पत्रकार असताना रानवीच्या माळवर घडलेल्या घडामोडीचा मी प्रत्यक्ष साक्षी होतो. विस्थापितांच्या संघर्षाची व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. लिहिण्याची ताकद आणि वारसा मला माझ्या आईकडून मिळाला असे नमूद केले.

यावेळी कादंबरीकार रंगनाथ पठारे यांच्या हस्ते कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'ग्रंथाली'च्या धनश्री धारप, आभारप्रदर्शन सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. प्रकाश नाईक यांनी केले.

या प्रकाशन सोहळ्याला माजी न्यायमूर्ती भास्कर शेट्ये, अरुण नेरूरकर (विश्वस्त, कोमसाप), ज्येष्ठ चित्रकार केशव कासार (मुंबई), श्रीधर पाटील (नगरसेवक, बदलापूर), राजन इंदुलकर, आत्माराम मेस्त्री, दीपक गद्रे (उद्योजक), महेंद्र जैन, वासुदेव तुळसणकर, मदन हजेरी, डॉ. दिलीप पाखरे, रश्मी कशेळकर, राहुल पंडित (नगराध्यक्ष, रत्नागिरी) आदी मान्यवर उपस्थित होते.


॥ग्रंथाली॥




**रानवीचा मळा – अभिजित हेगशेट्ये**

एकविसाव्या दशकाच्या अखेरीला जागतिकीकरणाचे भव्यदिव्य स्वप्न देशाला पडले. देशाच्या विविध प्रांतातील जमिनी शासनाच्या माध्यमातून काबीज करू लागल्या आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे विकासक रोजगाराची स्वप्ने दाखवू लागले. बहुराष्ट्रीय कंपन्या सर्वसामान्य जनतेचा तारणहारच आहे, असे वाटू लागले. पण बहुराष्ट्रीय कंपन्याचे आगमन हे फक्त आणि फक्त कमावण्यासाठी आणि त्यासाठी विविध मार्गाने भूमिपुत्रांच्या जमिनी हडप करायच्या. बलाढ्य मल्टिनॅशनल कंपन्यांसमोर आपल्या पिढ्यान्‌पिढ्या जमिनीच्या तुकड्याच्या अस्तित्वासाठी चिवटपणे लढणाऱ्या भूमिपुत्रांची कथा म्हणजे रानवीचा माळ ही कादंबरी.

**मूळ किंमत ४०० रुपये सवलतीत २५० रुपये**

## गुलज़ार यांच्या पटकथा मराठीत : एक अपूर्व योग

गुलजारांनी १९७१ साली त्यांचा पहिला सिनेमा दिग्दर्शित केला. हा पहिला सिनेमा होता, ज्याची पटकथा आणि दिग्दर्शन दोन्ही गुलजारांनी केलं होतं. यानिमित्तानं बॉलीवूडमध्ये एका तरल भावस्पर्शी कथांच्या चित्रपटांचा पटच सुरु झाला. गुलजारांच्या लेखनीतून १९ पटकथा अवतरल्या, ज्यांना पडद्याचा दृश्यरुपी आयामही स्वतः गुलजारांनीच दिला. या कथांमध्ये निव्वळ रुपेरी पडद्यावरचं नाट्य नव्हतं, तर त्यात प्रगल्भ साहित्यमूल्य होतं. पटकथा' हा शब्द आपण चित्रपटाच्या संदर्भात ऐकत आलो आहोत; पण पटकथा आपण लिखित स्वरूपात अनुभवलेली नाही. हा अपूर्व योग मेहता पब्लिशिंग हाऊसनं 'गुलज़ार पटकथा' या पुस्तकाच्या माध्यमातून मराठी वाचकांसाठी जुळवून आणला आहे.






बॉक्स ऑफिसच्या गणितांचा विचार न करता, आपल्या प्रतिभेशी कुठेही तडजोड न करता पटकथा लिहिणं या वैशिष्ट्यामुळे गुलज़ार यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतःचं स्वतंत्र आणि अढळ असं स्थान प्राप्त केलं. (कवी, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक म्हणूनही त्यांचं हे वैशिष्ट्य आहे आणि त्याही बाबतीत त्यांचं स्थान स्वतंत्र आणि अढळ आहेच.) वरवर साध्या वाटणाऱ्या, पण मानवी मनाला आणि जीवनाला आरपार भिडणाऱ्या या पटकथा आहेत. पडद्यावर आपण त्या अनुभवल्या आहेत; पण आता लिखित स्वरूपात त्या अनुभवताना आपण परत एकदा गुलज़ार यांच्या तरल भावविश्वात सहभागी होणार आहोत.

गुलज़ार यांनी स्वतः त्यांच्या पटकथांचं दिग्दर्शन केल्यामुळे (काही अपवाद वगळता) त्या पटकथांतील संवेद्यता, तरलता ते पडद्यावरही अबाधित ठेवू शकले. किंबहुना, पटकथा लिहिताना हे दृश्य आपण पडद्यावर कसं चित्रित करणार आहोत, याचा विचार त्यांच्या मनाशी पक्का असावा, असं म्हणायला वाव आहे; कारण त्यांच्या चित्रपटांच्या प्रत्येक फ्रेम'मधून हे जाणवत राहतं.

गुलज़ार यांनी त्यांच्या पटकथांमधून विविध विषय हाताळले आहेत. शरदचंद्र यांच्या 'पंडित मोशाय' या कादंबरीवर आधारित 'खुशबू' ही एक आगळीवेगळी प्रेमकहाणी आहे. एका खेड्यागावातील डॉक्टर वृंदावन आणि त्याच गावातील तरुणी कुसुम यांची. वृंदावनच्या दारातून कुसुमची डोली परत आली आहे. त्यानंतर कारणवश वृंदावनला एका दुसऱ्या मुलीशी लग्न करावं लागतं. त्यांना एक मुलगाही होतो...चरण. कुसुम मात्र मनोमन वृंदावनला आपला पती मानत असते. वृंदावनच्या बायकोचा मृत्यू होतो आणि कुसुम चरणला आईच्या मायेने सांभाळायला लागते; मात्र वृंदावनने सन्मानाने आपल्याला स्वतःच्या जीवनात प्रवेश द्यावा, हा तिचा हट्ट असतो. कुसुमच्या स्वाभिमानाची आणि वृंदावनच्या संयमाची ही कहाणी ग्रामीण पार्श्वभूमीवर घडणारी. ही पटकथा वाचणं, हा एक आनंदानुभव ठरावा.

सुधा, महेंद्र आणि माया यांच्या प्रेमाचा त्रिकोण हा 'इजाज़त'चा विषय. अत्यंत तरल आणि अस्वस्थ करणारा. महेंद्र आणि माया यांच्यातील प्रेम विवाहात परिणत होण्याआधीच महेंद्रला आजोबांच्या सांगण्यावरून सुधाशी लग्न करावं लागतं. महेंद्र सुधाला मायाबाबतची वस्तुस्थिती सांगतो. तरीही सुधा त्याच्याशी लग्न करते. तिच्याशी जुळवून घ्यायला महेंद्रला वेळही देते; महेंद्रही सुधाला आपलं म्हणायचा प्रयत्न करत असतो; पण माया स्वतःला महेंद्रपासून दूर ठेवू शकत नसते. अर्थात त्यात फक्त निखळ प्रेम असतं. सुधाविषयी कटू भावना नसते. सुधा समजूतदारपणे महेंद्रच्या जीवनातून निघून जाते. सुधा, महेंद्र आणि माया या तीनही व्यक्तिरेखा मनाला भावणाऱ्या आणि या पटकथेला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या आहेत.

'किनारा' ही कथा आहे इंद्र आणि आरतीची. भूतकाळाला उराशी कवटाळून बसलेल्या आरतीला इंद्र कसा वर्तमानात आणतो, त्याची ही हृद्य कहाणी. तर 'लेकिन'मध्ये समीरला रेवाच्या निमित्ताने आलेल्या अमानवी अनुभवांचं चित्रण आहे. निम्की, मिठ्ठू आणि चिंकी या तीन बहिणी, त्यांची आई जुगनी यांच्या भावविश्वाला असुरक्षिततेची, वेदनेची झालर आहे. त्यांच्या या भावविश्वात गेरुलाल या तरुण ट्रक ड्रायव्हरचा प्रवेश होतो आणि त्यांच्या जीवनात, घरात त्याच्या रूपाने चैतन्य येतं. या तीन बहिणी, त्यांची आई आणि गेरूलाल यांचं भावविश्व व्यामिश्रतेने साकारलंय 'नमकिन'मधून.

पन्नास वर्षांत राजकारण्यांचा बदलत गेलेला चेहरा आणि तरुणाईला त्याचे भोगावे लागणारे परिणाम, हा विषय आहे 'हुतूतू'च्या पटकथेचा. पंजाबमधील तरुणांच्या ऐंशीच्या दशकातील धगधगत्या जीवनावर भाष्य करणारी पटकथा आहे 'माचिस.'

'मीरा', 'अंगूर', 'मेरे अपने', 'कोशिश' या हृदय पटकथाही अविस्मरणीय आहेत. गुलाजारांच्या पटकथांचा मनोरंजक आणि अंतर्मनाला आवाहन करणारा प्रवास सहा पुस्तकांमधून साकारला आहे.

या पटकथांबरोबरच गुलज़ार यांची दीर्घ मुलाखत, त्या त्या चित्रपटाच्या पटकथेविषयी त्यांनी केलेलं भाष्य, त्या चित्रपट चित्रिकरणाच्या प्रसंगीची छायाचित्रंही या पुस्तकांमध्ये समाविष्ट केली आहेत. अंबरीश मिश्र, सविता दामले आणि वसंत केशव पाटील यांनी या पटकथांचा अनुवाद केला आहे.


**– अंजली पटवर्धन**

**गुलज़ार पटकथा**
अनुवाद : वसंत केशव पाटील, सविता दामले, अंबरीश मिश्र
पृष्ठ संख्या : १३१२, संचाची किंमत : १४९५ रुपये
**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत १२०० रुपये**

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

**रानवीचा माळ**
**अभिजित हेगशेट्ये**




'महाराष्ट्र औद्यागिक महामंडळाला औद्योगिक विकासासाठी आवश्यक असणारी जमीन ताब्यात घेण्यासाठीच्या अधिकाराखाली कलम १९६१ अन्वये २ अ ची भूसंपादनाची नोटीस रानवीच्या माळावरील काही घरात येऊन थडकली आणि एक थंड कळ पठार चिरत थेट दाभोळच्या खाडीत दूरवर पोहोचली. रानवी अणि कातळवाडीच्या माळावर एकच कालवाकालव झाली.' कथानकाची सुरुवात होते ती इथून. १९९१ साली जागतिकीकरणाच्या नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारताचे द्वार मुक्त करण्यात आले. अनेक कंपन्यांनी त्यांना सोयीचा ठरेल असा भूभाग निवडण्यास सुरुवात केली. त्यापैकी बहुचर्चित आणि प्रचंड व्याप असलेली एन्रॉन कंपनी भारतात दाखल झाली. तिने निवडलेला भूभाग म्हणजे दाभोळचा किनारपट्टा, रानवी, कातळवाडीचा माळ. तिच्या आगमनापासून ते तिचे गमन करण्यापर्यंतचा जो लपंडावाचा खेळ खेळला गेला, त्याचे स्मरण करून देणारी कादंबरी म्हणजे 'रानवीचा माळ'. अभिजित हेगशेट्ये या पत्रकाराने या खेळाचा जो प्रत्यक्ष अनुभव पत्रकार म्हणून घेतला, घडलेल्या घटनांना जवळून पाहिले, अनुभवले, त्याचे चित्रण कादंबरीच्या रूपात त्यांनी चितारलेले आहे.

एन्रॉन वीजप्रकल्प रानवीच्या माळावर आकार घेऊ लागला, तशी त्या परिसरात अस्वस्थता पसरली. प्रकल्पात जाणारी जमीन हा कळीचा आणि भावनिक प्रश्न. जयवंत सालीम हा तरुण या प्रकल्पाला विरोध करू पाहतो ते त्याची जमीन ताब्यातून जाणार या भितीतून; पुढे ती परत मिळावी म्हणून त्यासाठी गावकऱ्यांना एकत्रित करणे, त्यांच्या सभा घेणे, मोर्चा काढणे अशा अनेक स्तरावर लढा देत राहतो. गावकरीही त्याला तितक्याच तीव्रतेने साथ देतात. स्थानिक आमदार डॉ. लिमये, पत्रकार तारी आणि मोरे हेही प्रकल्पाविरोधात वातावरण धगधगत ठेवण्याचा प्रयत्न करतात. देशभर या प्रकल्पाला विरोध होतो, त्यात प्रदूषण, टेंडर न मागवता प्रकल्पाला दिलेले आमंत्रण, छुपा व्यवहार अशी अनेक कारणे आहेत. यात वीज मंडळाची भूमिका विरोधाची आहे, त्याला कारण न परवडणारा वीजदर. त्यांची कामगार संघटना लढ्याची भूमिका घेते, ही एक बाजू, तर दुसऱ्या बाजूला प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी मोठ्या तयारीने उतरलेली रिबेका मार्क, केनेथ ही प्रकल्पप्रमुख मंडळी. त्यांनी सर्व अधिकार प्रदान केलेला विशेष अधिकारी, राजीव चाणक्य हे दुसऱ्या बाजूला. आणि या सगळ्याकडे राजकीय भांडवल म्हणून पाहणारी, त्याचा आपापल्या परीने उपयोग करून घेणारी राजकीय यंत्रणा, ही तिसरी बाजू. अशा तीन स्तरावर आपापल्या ताकदीनिशी कसा लढा दिला जातो, याचा संघर्ष या कादंबरीत आहे. उभा राहात असलेला प्रकल्प एका टप्प्यापर्यंत येतो आणि थांबतो, हा विरोधकांचा आंदोलकांचा विजय ठरतो. प्रकरण कोर्टापर्यंत जाते. आणि पुन्हा राजकीय हालचाली सुरू होतात, समुद्राखाली सागर शांत नसतो तशा. आणि पुन्हा त्याला जीवदान मिळते. हे कसे घडले, हा तर या कादंबरीचा कळसबिंदू.

राजकारण म्हणजे काय, हे समजून घ्यायचे तर यातील प्रत्येक राजकीय व्यक्तिरेखेकडे संदर्भ म्हणून पाहता येईल. पक्षनिष्ठा आणि व्यक्ती या एकाचवेळी ऊन्नसावलीसारखी कशी रूपे बदलतात, त्यांचे वर्णन अतिशय उत्तमपणे आलेले आहे. तीच गोष्ट पत्रकारांची. तेही भूमिकेत कसा बदल करतात, याचेही वर्णन यात आहे. चाणक्य हा कार्पोरेट जगताचा प्रतिनिधी ठरतो. अधिकार आणि हुशारी एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला ऐषोराम यांचे उदाहरण म्हणजे चाणक्य. चाणक्य ही यातली मध्यवर्ती व्यक्तिरेखा असेही म्हणता येईल. आपला अंमल कायम राहील यासाठी तो ज्या ज्या क्लृप्त्या काढतो, प्रसंगानुरूप वागतो, इतरांना वाकायला भाग पाडतो, आणि उंचे लोग उंची पसंद याचा पुरेपूर फायदा घेतो, त्यावरून उच्च पदस्थांच्या प्रतिमा स्पष्ट होतात. असे असले तरी येणारा मानसिक ताण देखील कमी नसतो, याकडेही लेखकाने अवधानाला जागृत ठेवलेले आहे. लढत राहणारी जयवंत सालीम सारखी माणसे अनेक आहेत. ती सरळ, भाबडेपणाने, तळमळीने आपला लढा देत राहतात. तर काही स्थानिक काही प्रलोभनांना बळी पडून आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करताना दिसतात. स्वप्ना सावे, अनिता काळसेकर, स्वाती तिच्यासारख्या इतर तरुणींचा वापर, पिल्लेसारखा दलाल याही घटना कार्पोरेट जगताचा एक भाग असतात, ते यातून स्पष्ट होते. परंतु याचवेळी कोकणापासून ते देशापर्यंतचे वातावरण या निमित्ताने कसे होते, कोणकोणत्या प्रकल्पांसाठी कसाकसा विरोध होते गेला, त्यांचे परिणाम काय झाले, कोकणचा इतिहास, संस्कृती काय आहे, येणाऱ्या प्रकल्पाचा आवाका, क्षमता, दूरदृष्टी यांचे स्वरूप स्पष्ट करणारी आकडेवारी, असा व्यापक पट लेखकाने निवडलेला आहे. त्याचे संदर्भ गोळा केलेले आहेत. त्यामुळे ही कादंबरी ललितकृती आणि माहिती अशा दोन स्तरावर आकार घेताना दिसून येते.

अभिजित हेगशेट्ये यांची ही दुसरी कादंबरी. पत्रकार म्हणून असलेला व्यासंग, माणूस समजून घेण्याची समज, घडणाऱ्या घटनांचा अन्वयार्थ जोडण्याची कला आणि लेखनावर असलेले प्रेम यातून ही कादंबरी साकारलेली आहे. त्यामुळे तिच्यातला प्रवाहीपणा, सहजता, डावपेचांचा संघर्ष, व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये आणि कथानकाची गुंफण यांचा सुंदर अविष्कार पाहायला मिळतो. कोकण आणि तिथला निसर्ग ही तर निसर्गाची देणगीच म्हणावी लागेल. परंतु तिच्या अंतरंगात डोकावणारी दृष्टी असावी लागते, ती त्यांच्याकडे असल्याचा प्रत्यय केलेल्या वर्णनातून येतो. एका संघर्षाची गाथा असेच या कादंबरीचे वर्णन करावे लागेल. आणि कुठलाही असा संघर्ष उभा राहील तेव्हा या कादंबरीची आठवण हमखास येईल, इतका प्रभावीपणा तिच्यात सामावलेला आहे.

सतीश भावसार यांनी वीजप्रकल्पाची भट्टी, आक्रोशणारा हात आणि विरोध करणारा माणूस असा एकत्रित परिणाम साधणारे मुखपृष्ठ साकारलेले आहे, जे कादंबरीतील वास्तव स्पष्टपणे साकार करते.


- मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रुपये

॥ग्रंथाली॥

# ग्रंथपान

## पर्यायी मातृत्व

**डॉ. संदीप माने**




१९७८ साली इंग्लंडमध्ये लुई ब्राऊन या पहिल्या टेस्टट्युब बेबीचा जन्म झाला. तेव्हा अनेकांच्या प्रतिक्रिया संमिश्र होत्या. काहींनी स्वागत केले, विज्ञानाचे कौतुक केले, तर काहींनी अचरटपणाखाली त्याची संभावना केली. त्यातून पुढे 'सरोगसी' शब्द आला तो १९८५ साली, जेव्हा पर्यायी गर्भाशयाचा पर्याय यशस्वी झाला. त्यावेळीही प्रतिक्रिया अशीच होती. या दोन्ही शब्दांच्या जन्माने माणसाचा जन्मसिद्ध हक्क आणि त्यापासूनचा आनंद या परंपरिक समजुतींना भूकंपाच्या पातळीवर आणून ठेवल्याची भावना अधिक होती. भुवया उंचावल्या होत्या. कुठल्याही नवीन शोधाबाबत असे घडणे अस्वाभाविक म्हणता येत नाही. टेस्टट्युब बेबीने बाळाच्या जन्मावर शिक्कामोर्तब केले. वंध्यत्वाच्या समस्येला आपल्या आवाक्यात आणले. तर सरोगसीने मातृत्वापासून वंचित असणाऱ्यांना पालकांना आपल्या अपत्याचा आनंद फुलविण्याचे स्वप्न, सत्यात पाहण्याचे आश्वासन दिले. याला विज्ञानाचा चमत्कार म्हणता येईल. अनेक काळ जे असाध्य वाटत होते, ते शक्य असण्याचे आश्वासन दिले ते विज्ञानाने. यात भावनिक, मानसिक गुंतागुंत आहे, हा भाग मान्य केला तरी आज त्याचा स्वीकार करण्यास सर्वांनीच मान्यता दिली आहे, हे वास्तव आहे.

डॉ. संदीप माने हे वंध्यत्वाच्या समस्येचे निवारण करण्यात अग्रभागीअसलेले नाव. प्रजनन औषधोपचार आणि शस्त्रक्रिया सल्लागार, शल्यचिकित्सक अशी त्यांची ख्याती. शिवाय 'ओरिजिन फाऊंडेशन' या संस्थेमार्फत त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि कला या संदर्भातील सामाजिक कार्य सुरू आहे. मातृत्व हा निखळ आनंद देणारा अनुभव. अशीही काही दांपत्ये आहेत, जी या आनंदापासून वंचित आहेत. ही वंचित अवस्था विवंचनेपासून संभावनेपर्यंत जाते, स्वतःचा मानसिक-भावनिक कोंडमारा तर होतोच, शिवाय समाजाकडून होणारी अवहेलनाही क्रूर स्वरूपाची दिसून येते. त्यामुळे या वंध्यत्वाच्या समस्येचे स्वरूप उग्र झाल्याशिवाय राहत नाही. त्यातून डॉक्टरांकडे उपचारासाठी होणारी धावपळ, चाचण्या, त्यातून अपेक्षित फळ न मिळाल्यास पदरी येणारी निराशा, वैफल्य, घटस्फोट, दुसरा विवाह या सारखे यातून पुढे येणारे पर्याय. हा साराच जीवघेणा प्रकार ठरतो. परंतु या सगळ्यांवर उपाय उपलब्ध आहे, त्याचे नाव पर्यायी मातृत्व.

स्वतःचे मूल असणे ही प्रत्येकाची इच्छा असते. ते स्वजनुकाचे असणे ही त्यातील प्रबळ इच्छा. परंतु ज्या स्त्रियांना गर्भाशयाशी संबंधित विविध समस्यांमुळे गर्भधारणा शक्य नाही, वैद्यकीय उपचारांनंतरही त्याची शक्यता शून्य असल्याचे निष्पन्न होते, अशांसाठी मातृत्वाचा उपलब्ध झालेला पर्याय म्हणजे 'पर्यायी मातृत्व'. सक्षम, सुदृढ आणि सर्व वैद्यकीय चाचण्यांतून सिद्ध ठरलेल्या दुसऱ्या दाता महिलेच्या गर्भाशयाचा उपयोग, हा तो मार्ग. अंडबीज आणि वीर्य यांच्या प्रयोगशाळेतील संयोगाने तयार झालेल्या भ्रूणाची सूक्ष्म नलिकेच्या साहाय्याने महिलेच्या गर्भाशयात स्थापना करणे, ही अवलंबिली जाणारी यातली पद्धती. याद्वारे वंध्यत्वावर मात होतेच, शिवाय आपल्या जनुकाचे आपले बाळ, ही अपेक्षाही पूर्ण होते.

या मातृत्वाच्या संबंधाने असणारे अनेक विषय येतात. वंध्यत्व असण्याची कारणे, ती महिला व पुरुष यांच्यात असणारे प्रमाण, त्याचे भावनिक-सामाजिक-वैवाहिक परिणाम, त्यावरील उपचार व त्यांच्या यशस्वीतेचे प्रमाण, भावी पालक आणि त्यांचा पर्यायी मातृत्वाकडे जाणारा प्रवास, पर्यायी मातेला उपलब्ध असलेले अन्य मार्ग, निःस्वार्थी आणि व्यापारी स्वरूपाचे पर्यायी मातृत्व अशा विविध पातळीवरील तपशीलवार माहिती या पुस्तकात दिलेली आहे. हा विषय जास्तीत जास्त सोपा करून त्याची मांडणी केलेली आहे. विषयाचे आकलन सहज व्हावे म्हणून सोबत तक्ते दिलेले आहेत. या पद्धतीचा अवलंब ज्यांनी केलेला आहे, अशा अनुभवी माता आणि पालक यांचे अनुभव, यासंबंधीचे नियम व विधेयके, सर्वेक्षण असा संपूर्ण तपशील एकत्रित स्वरूपात दिलेला आहे. ज्या शब्दांना इंग्रजीतच मान्यता आहे आणि बहुतेकांच्या तोंडी तेच शब्द रूळलेले आहेत, अशा शब्दांची व्याख्या व स्पष्टीकरण वाचकांच्या सोयीसाठी पुस्तकाच्या शेवटी दिलेले आहे. या पुस्तकामुळे मूळ विषयाची अचूक माहिती तर मिळतेच, परंतु त्यामुळे या समस्येने व्यथित झालेल्या अनेकांना यापासून दिलासाही मिळण्यास मदत होईल. एका अनुभवसंपन्न तज्ज्ञाचे समग्र मार्गदर्शनच या निमित्ताने उपलब्ध झाले आहे असे म्हणता येईल.

डॉ. माने यांच्या 'सरोगसी : ड्रीम्स कम ट्रू ' या मूळ इंग्रजी पुस्तकाचा तरलतेने मराठीत उत्तम अनुवाद केला आहे तो श्याम तारे यांनी. वैद्यकीय क्षेत्रातील जवळपास सगळेच शब्द हे इंग्रजीमधून आहेत. आणि त्यांचा सर्रास वापर सर्वत्र केल जातो. परंतु अनुवादकाने या शब्दांची कुठे अडचण येणार नाही याची काळजी घेत या पुस्तकाचा सोप्या, सरळ, सहज आकलन होईल अशा भाषेत सुंदर अनुवाद केलेला आहे. त्यामुळे वाचत असताना हे मूळ पुस्तक इंग्रजीतून मराठीत आलेले आहे, याचे स्मरण होत नाही. 'पर्यायी मातृत्व' हा सरोगसीला दिलेला पर्यायी शब्ददेखील चपखल म्हणायला हवा.

सदर विषयावर असलेले मराठीतले हे पहिले पुस्तक असावे. यास अनुसरून प्रकाशकाची टिप्पणी पहिल्याच पृष्ठावर दिलेली आहे. तिचेही स्वागत करायला हवे. विषयाला न्याय आणि विज्ञानातील प्रागतिकता यांचा हा आदर म्हणायला हवा. डॉ. स्नेहलता देशमुख, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांची या पुस्तकाला प्रस्तावना लाभलेली आहे. विज्ञान आणि डॉक्टर यांच्या साहाय्याने मिळणाऱ्या मातृत्वाच्या निखळ आनंदाचे निर्मळ मनाने केलेले कौतुक, अशी ही प्रस्तावना आहे.

पर्यायी मातृत्वाची कल्पना मुखपृष्ठावर उतरविली आहे ती चित्रकार सतीश भावसार यांनी. एका मातेने आपल्या हाताने दुसऱ्या मातेच्या हाती सोपविलेले बाळ, असे हे मुखपृष्ठ. यातून दिसते ती मातृत्वाचे दातृत्व ही संकल्पना! एक देणारा, जो औक्षवंताचे आशीर्वाद औक्षणाने व्यक्त करीत आहे, तर दुसरा ते दान आपलं म्हणून स्वीकारीत आहे. स्वीकारलेल्या हातावर आहे गोंडस बाळ. अशी परिपूर्ण संकल्पना दोन हातांच्या माध्यमांनी साकारली आहे.

- **मूल्य १८० रु. सवलतीत ११० रुपये**

ग्रंथाली

# ग्रंथपान




'मुक्या जंगलाची गर्जना' हा अर्जुन व्हटकर यांचा निसर्गकथांचा संग्रह. वरवर तो जंगलकथांशी नाते सांगत असला तरी जंगल हा निसर्गाचा एक भाग आहे. त्यापलीकडेही निसर्ग आहे आणि त्याचा आवाका झाडी, प्राणी यांच्यापुरताच मर्यादित नाही, याचे भान या कथा देतात. जंगल हे मुके आहे आणि आपण त्याचा हवा तसा ऱ्हास करू शकतो, याविरोधात जंगल आवाज उठवू शकत नाही, वा त्याला आवाजच नसतो, ही माणसाची समजूत किती भाबडी आहे, याचीही जाणीव या कथा प्रकर्षाने करून देतात. माणसाची वृत्ती ही निव्वळ स्वार्थी तर आहेच शिवाय ती विध्वंसक देखील आहे. कुऱ्हाड नावाचे हत्यार बाळगणे त्याला भूषणास्पद वाटत असले तरी तो केवळ जंगल आणि जंगलातील प्राणी-पक्षी यांचा नायनाट करीत नाही तर स्वतःच्याच पायावर ती कुऱ्हाड मारून घेत आहे. सगळ्यात वाईट हे आहे की त्याला स्वतःच्या पायांवर मारलेल्या कुऱ्हाडीची जखम दिसत नाही आणि दिसत असेल तर तिच्याकडे तो डोळेझाक करतो आहे. परिणामी तो सगळ्यांच्याच नाशाला कारणीभूत होत आहे. त्याच्या या वृत्तीविरोधात शेवटी आवाज उठवण्याची वेळ जंगलावर आली आहे. तो आवाज या कथांमधून आपल्यापर्यंत पोहोचविण्याचे, पर्यावरणाविषयी असलेल्या सजग जाणिवेतून मृत मनाला जागृत करण्याचे मोठे काम लेखकाने अतिशय कौशल्याने केलेले आहे.

या कथांच्या व्यक्तिरेखा आहेत आंबा-चिंच, मोर-लांडोर, राघू-मैना, कावळा-चिमणी, हवा, पाणी, धरती, प्राणी, पक्षी. या सगळ्यांची कैफियत आहे ती त्यांच्या अस्तित्वाविषयी. निवारा नाही. प्यायला हक्काचे पाणी नाही, हे पाणी माणसाने पळवले, अडवले, जिरवले. झाडांकडे, प्राण्यांकडे, पक्ष्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. त्याविरोधात त्यांनी बोलायला सुरुवात केली आहे. माणसाला त्याच्या कृत्याचा जाब विचारण्यासाठी मोर्चा काढला आहे, निवडणूक लढविली आहे, संसदेपर्यंत आपले म्हणणे मांडले आहे. यात अपेक्षा आहे ती आमचा हक्काचा सातबारा कोरा झाला आहे. तो परत आमच्या नावावर व्हावा. आमचे जगणे आमचे असावे. या सातबारावरून माणसाने हद्दपार व्हावे.

या कथांची गुंफण लहान-लहान कथांच्या आधारावर केलेली आहे. चिमणीचे घर मेणाचे, कावळ्याचे घर शेणाचे; एक घास चिऊचा, एक घास काऊचा; थुई थुई नाचरे मोरा; वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती; मैना राघूला घाली मुजरा, आंबट चिंचा खाण्याचे गुपित; गंगा शुद्धीकरणाचा देखावा आहे. अनेक गोष्टी, रूपके, कविता, गाणी, यांचा उपयोग यात केलेला आहे. माणसासारखी निवडणूक, जाहीरनामा, पॅनल, मोर्चा, घोषणा, भाषणबाजी, आवेश, सोबतच बाईमाणसाने पुरुषाच्या डाव्या बाजूला बसण्यासारख्या चालीरिती, अनुनय यांचाही या कथांमध्ये पुरेपूर वापर केलेला आहे. त्यामुळे वातावरण जंगल, पाणी, धरणी, प्राणी, पक्षी यांनी भारलेले असले तरी संवाद आणि त्यातला आशय हा माणसांशी नाते सांगणारा आहे. यात आलेला निसर्ग, त्याची विविध रूपे, बदलत गेलेले वातावरण, ऋतूंप्रमाणे होणारे बदल, दुष्काळ, पानगळ, पडझड याकडे लेखकाने बारकाईने पाहिलेले आहे. प्राण्यांचे-पक्ष्यांचे स्वभाव, वागणे, बोलणे आणि माणसाविषयीची चीड यातून कथांचा आशय अलगदपणे उलगडून दाखवण्याचे कसबही लेखकाने ताकदीने पेलले आहे. भारत सासणे यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे.

या कथांना दिलेली शीर्षके हा सुद्धा एक कल्पक आविष्कार म्हणता येईल. 'काऊ-चिऊचं सेमिनार', 'राघू-मैनेचा अभंग', 'जंगलाची संसद', 'हवाबाईचा जाहीरनामा', 'धरणीमायचं सिझर.' यातूनच कथांच्या अंतरंगाची उत्सुकता आणि आशय लक्षात येतो. या निमित्ताने झाडे, प्राणी, पक्षी यांच्या नावांची संपूर्ण यादीही यात वाचायला मिळते.

'जुन्या ताकतीवर वाढलेली पिंपळाची पानं ग्रीष्माच्या उन्हामुळं खाली उतरू लागली.' 'एकेकाळी हिरवागार असणारा मळा रांडवबाईसारखा उदास आणि नापिक झाला.' 'शिवाराचं हिरवं सौंदर्य पाण्यानं नाहीसं केल्यामुळं कुस्तीच्या फडात हारलेल्या पैलवानासारखा खाली मान घालून शिवार गपचीप बसलेला.' 'एका झाडावर घातलेला कुऱ्हाडीचा घाव समद्या सजीवाच्या आयुष्यावर पडलेला घाव असतो.' 'धरणीमाता तांबूस लालसर करड्या रंगाची दुष्काळी साडी नेसली. कित्येक वर्षापासनं हिरवा शालू नेसताच आला न्हायी.' लेखक निसर्गाकडे किती आत्मीयतेने पाहत आहे, त्याची निरीक्षणाची नजर निसर्गाशी किती एकरूप झालेली आहे, तिचा प्रत्यय ही वाक्ये देतात. ही वाक्ये लेखकाने हायब्रीड पिकासारखी मुद्दाम पेरलेली नसून ती त्यांच्या जगण्यातून आलेली आहेत, असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. या कथांची धाटणी जंगलाच्या आक्रोशाशी नाते सांगत असली तरी लेखकाची आंतरिक तगमग त्यातून अधिक प्रभावीपणे व्यक्त झालेली आहे. नव्हे ती इशारा देण्यासाठी आलेली दिसते. त्यांच्या मनोगतात ते लिहितात, ''किसानवादी आणि कॉर्पोरेटवादी यांचा शिवणापाण्याचा खेळ चालू आहे. हा संघर्ष शेवटी क्रांतीचे रूप धारण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही क्रांती हवा, पाणी, अन्न यासाठी होईल असे वाटते. सृष्टीचा मूलाधार पाणी आहे. पाणी तर आपण विकत घेतोच; पुढे हवासुद्धा मॉलमध्ये विकत घ्यावी लागेल हे अर्ध्यसत्य आहे.''

मुक्या जंगलाची गर्जना हे शीर्षक चित्रातून व्यक्त करण्याची सुंदर कल्पकता मुखपृष्ठावर दिसून येते. जंगलाच्या दाट अंतरंगातून सिंहाचा गर्जना करणारा जबडा दाखविलेला आहे. ही गर्जना सिंहाची आहे तशी ती या जंगलाची आहे, त्यात पूर्वी निवासाला असलेल्या प्राण्यांची आहे. कारण याच जंगलाचा अर्धा भाग उजाड झालेला दिसत असून जंगलातील प्राणी या उजाड भागात वावरताना दिसत आहेत. हे जंगलाचे उजाडपण नसून माणसाने त्यांच्या माथी मारलेले आहे, याची साक्ष हे मुखपृष्ठ देते. सतीश भावसारांची ही उत्तम कल्पकता म्हणायला हवी.


- मूल्य १५० रु. सवलतीत ९० रुपये




# ग्रंथपान

## हिरजेची हिकरणी आणि चुंगीची पोरं

**डॉ. भास्कर थोरात**



आत्मचरित्रांची संख्या मराठी साहित्यात बरीच मोठी आहे. त्यातली अनेक आत्मचरित्रेही दर्जेदार म्हणून नावाजली देखील. याच परंपरेत बसावे असे आणखी एक आत्मचरित्र दाखल झाले आहे, त्याचे नाव 'हिरजची हिरकणी आणि चुंगीची पोरं'. डॉ. भास्कर थोरात हे नॅशनल केमिकल लॅबोरटरी आणि इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, येथे संशोधक, शास्त्रज्ञ आणि अधिव्याखाता आहेत. या क्षेत्रातील अनेक संशोधनांसाठी त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केलेले आहे. अशा थोर व्यक्तिमत्त्वाचे हे आत्मचरित्र आहे. डॉ. अनिल काकोडकर, डॉ. नरेंद्र जाधव, प्रा. डॉ. देवानंद शिंदे आणि प्रा. ए.श्री. पंडित यांच्यासारख्या मान्यवरांनी या आत्मचरित्राविषयी आपल्या परिप्रेक्ष्यातून लिहिले आहे. राजन खान यांच्यासारख्या साहित्यिक, समीक्षकाने त्याचे मूल्यमापन केलेले आहे.

डॉ. थोरात यांचे संशोधन क्षेत्रातले स्थान अद्वितीय असे आहे. तिथपर्यंतचा त्यांचा प्रवास कसा होत गेला, मिळालेले सहकारी, प्राध्यापक यांनी केलेले साहाय्य, त्यातून घडत गेलेले संशोधन, संशोधन पातळीवर निर्माण झालेली यंत्रसामग्री, तिला मिळालेले पुरस्कार, याविषयी वाचक म्हणून वाटणारे कुतूहल येथे पूर्ण करण्याचा प्रयत्न लेखनात झालेला आहे. परंतु डॉ. थोरात यात स्वतःच्या मोठेपणाकडे पाहताना 'मी, मी, मीच, माझं' असा उदोउदो करीत नाहीत. स्वतःच्या हुशारीचा गर्व नाही. उलट या स्थानापर्यंत प्रवास झाला यात इतरांचा वाटा किती मोठा आहे, हे आवर्जून आणि तितक्याच नम्रपणे सांगतात त्यांची आई, सत्यभामाबाई, हे वेगळेच व्यक्तिमत्त्व म्हणावे लागेल. 'वयाच्या पंचविसाव्या वर्षी मी कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन केले बाबांना न सांगता. त्यांचा काय संबंध त्याच्याशी?' अशी प्रगत धाडसी आई. शिक्षण, संस्कार, समज, जबाबदारी, प्रेम, आणि दूरदृष्टीचा धाडसीपणा यांचा जणू च्यवनप्राश असलेली ही माऊली, या आत्मचरित्राचा केंद्रबिंदू आहे. आज आपण जे काही आहोत ते या माऊलीच्या संस्काराचे फळ आहे असे डॉ. थोरात सांगतात. वडील अण्णा- नारायण टीसी, हे गावातले पहिले रेल्वे टीसी. कुटुंब, गावाविषयीची आपुलकी असणारे, कडक शिस्तीचे, संतापी, तरी जबाबदारी आणि शिक्षणाची ओढ असलेले. त्यासाठी वाटेल ते परिश्रम घेणारे, मुलांवर विश्वास ठेवणारे. गुरुवर्य शिवा शिवमूर्ती सलवदे, पोवाडे, ओव्या, गाणी यांचा संस्कार देणारे, घडण्यापोषणात आकार देणारे. धाडसी, सतत मदतीला धावून जाणारी आडकेबाई इत्यादींविषयी डॉ. भरभरून बोलताना दिसतात. त्यांच्या गुणांचा, संस्काराचा, मार्गदर्शनाचा प्रभाव आजही मान्य करतात. त्या सगळ्यांविषयीचा मजकूर पाहता, या पुस्तकातील जवळपास निम्मी पृष्ठे त्यांच्यासाठी दिलेली आहेत. ही कृतज्ञता वेगळीच म्हणायला हवी. शाळा, कॉलेज, संस्था येथे भेटलेले मित्र, सहकारी यांच्याविषयी तितक्याच आपुलकीने कृतज्ञता व्यक्त करतात. त्याचबरोबर सामाजिक बदलांचा आढावा घेताना स्वतःचे चिंतनही देतात. त्यामुळे हे डॉ. यांचे आत्मचरित्र आहे त्यापेक्षा आत्मचिंतन आहे, असे प्रा. डॉ. देवानंद शिंदे म्हणतात, त्याची सत्यता पटते. विशेष या प्रवासात अनेक असेही प्रसंग आहेत, जेथे मनावर जखम केलेली आहे. परंतु त्याविषयीचा खेद करण्याऐवजी ते मानसिकता आणि चिंतन यांचा आधार घेतात.

या पुस्तकाचे शीर्षक गमतीशीर वाटते. परंतु त्याला संदर्भ आहे. आई सत्यभामाबाई यांचे माहेर हिरज या गावचे. त्या गावची ही हिरकणी. तर वडील ज्या गावचे ते गाव चुंगी. परंतु ते आजोळी शिंगडगावात ते मोठे झाले. त्या गावात त्यांच्या मुलांची ओळख म्हणजे 'चुंग्याची पोरं'. म्हणून हिरजेची हिरकणी आणि चुंगीची पोरं.

संस्कार करणारे गाव, त्यात असणारी माणसे, आपला भवताल, त्यावेळची सामाजिक स्थिती, चालीरिती यांचाही वेध या लेखनात घेतलेला आहे. विधवेला, तिने पुन्हा विवाह केला असला तरी हळदीकुंकवाला न बोलवणे, लग्नसमारंभाच्या निमित्ताने गावकरी आणि येणाऱ्या वऱ्हाडी मंडळींचे आपसातले सहकार्य, लग्नातले नवरदेवाचे रुसणे, नवरीला उचलून आणणे, वरात काढणे या परंपरा त्यावेळच्या सांस्कृतिकखुणा ठळकपणे नजरेत भरणाऱ्या आहेत. गाणी, ओव्या, पोवाडे हेही वैभव त्यांना अनुभवता आलेले असल्याने त्यांचा या आत्मचरित्रात समावेश असणे आपसूकच झाले. डॉ. बाबासाहेबांच्या विचारसरणीचा प्रभाव, त्यातून झालेले सामाजिक परिवर्तन यांचे डॉ. भास्कर थोरात वेगळ्या पातळीवर मूल्यमापन करतात, त्याविषयीचे चिंतन करतात, त्यातून त्यांच्या प्रगल्भ सामाजिक जाणिवेची ओळख पटते. एक वेगळेच व्यक्तिमत्त्व उभे राहते. 'वर्ल्ड फोरम फॉर क्रिस्टलायझेशन, फिल्ट्रेशन अ‍ॅण्ड ड्रॉईंग'सारखी संस्था स्थापन करून त्यांनी आपल्या हेतूंना जागतिक पातळीवर नेऊन ठेवले आहे. ते म्हणतात, 'ग्लोबलायझेशनच्या या युगात माझे विद्यार्थी, त्यांचे संशोधन कसे ग्लोबल होईल याचा मी सतत विचार करीत असतो.' पुढील पिढी जातपात या पलीकडे विचार करायला शिकेल हा हेतू ठेवून कितीतरी आंतरजातीय विवाह लावून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे.

उच्चपदस्थ, थोर, व्यासंगी व्यक्तिमत्त्वाला त्याच्याच शब्दात लेखणीबद्ध करणे सोपे काम नाही. त्यातून ते आत्मचरित्र या तंत्रात साकारायचे म्हणजे परकाया प्रवेश करण्यासारखे म्हणावे लागेल. परंतु हे कौशल्य लतिका भानुशाली यांनी दाखविले आहे. आणि हा परकायाप्रवेश कसलेल्या नटासारखा अगदी बरहुकूम वठला आहे.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ साकारले आहे ते चित्रकार पुंडलिक वझे यांनी. हिरजेची हिरकणी, जी कुटुंबाचा आणि संस्काराचा चंद्र आपल्या कर्तव्यनिष्ठ हातात झेलते आहे, त्याच्या प्रकाशात सारे कुटुंब, तिची लेकरंबाळं उजळून निघाली आहेत. आणि आता ते सगळे मिळून तो चंद्र नव्हे सूर्य हाती पेलण्याचा प्रयत्न करीत आहेत, अशी ही कल्पना दिसते.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रुपये**

## ॥ग्रंथाली॥ ॥ पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे




अभिजित हेगशेट्ये लिखित 'रानवीचा माळ' पुस्तक प्रकाशनसमयी नगर वाचनालयाचे अध्यक्ष ॲड. दिपक पटवर्धन, कवी अशोक बागवे, लेखक-कादंबरीकार रंगनाथ पाठारे, लेखक अभिजित हेगशेट्ये, थिंक महाराष्ट्रचे संस्थापक दिनकर गांगल आणि 'ग्रंथाली'च्या धनश्री धारप




संजय शिंदे, भीमराव पांचाळे, जयु भाटकर, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. संदीप माने, श्रीमती देसाई, नीतिन देसाई, श्याम तारे, डॉ. अविनाश सुपे, एम.व्ही. देशमुख आणि डॉ. अलका मांडके



१४ सप्टेंबर २०१७ रोजी महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी, रात्री ८.३० वा. सह्याद्री वाहिनीवरील 'अमृतवेल' या कार्यक्रमात 'मुंबई शहराची पुस्तके' या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम प्रक्षेपित होणार असून यामध्ये सुप्रसिद्ध लेखक-विचारवंत जयराज साळगावकर आणि 'मुंबई ब्रिटिशांची होती तेव्हा' या 'ग्रंथाली' प्रकाशित पुस्तकाचे लेखक माधव शिरवळकर सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे संपादन आणि सूत्रसंचालन करतील रविराज गंधे.

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

कार कर्ज

व्याज दर ८.३५ %* प्रतिवर्ष



• २४ तासात कर्जमंजूरी
• 0% प्रक्रिया शुल्क (ऑफर मर्यादित कालावधीसाठी)
• कमीतकमी कागदपत्र

**अधिक माहितीसाठी ९०२९० ५००४९ वर मिस्ड कॉल द्या.**

सारस्वत बँक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
मिले यहाँ, दोनो जहाँ

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.